# विनायकाची कविता.

## १. ईशस्तवन.

पद [ चाल.—कृष्ण मुरारी... ]

देवि दयाळे प्रणति करिति तुज बाळे ।
तूंचि गगन, उदक, पवन, तूं त्रिभुवन, तेज-किरण ।
अघटित कृति । तव वसुमति । प्रकट दिसाति लोकपाळे ॥ध्रु०॥
तुझिया लीलामात्रें सतत विहरतात खगगण गगनांत. शांत,
जलचर चरती जलांत, तिमिर नाश, कर प्रकाश,
पुरविं आस, धरुनि चरण, तव बहुजन भव उतरुन ।
पार झाले । देवि० ॥ १ ॥

---

REFBK-0019496

## . परापूजा.

आर्यांच्या मूळ संस्कृतावरून )

.--चंद्रकांत राजाची... ]

चराचरीं तूं आवाहन ये काय तुझ्या कामीं ?
सकलाधारा द्यावें तुजला काय आसना मी ? १
निर्मल जो, त्या केले ठरती अर्घ्यपाद्य वाया.
कर वाहेना आचमन तुला शुद्धाला द्याया. २

घालूं कैसें तुला निर्मला देवा ! स्नानातें?
विश्वोदर तूं तुला वहावा पट कवण्या हातें ? ३
निरालंब तूं उपवीताचें महत्त्व तुज नाहीं.
नसे वासना, फुलें सुवासिक निष्फल त्या ठायीं. ४
गंधाची थोरवी कोणती नसे लेप ज्याला,
स्वतां रम्य तूं, फिकी तुजपुढें पडे रत्नमाला. ५
सदा तृप्त तूं, नैवेद्याचीं काय तुला वाणें,
विभो ! तुष्ट तुज कसें करावें म्यां तांबूलानें ? ६
नसे अनंता ! प्रदक्षिणेचें बल माझ्याठायीं,
अभिन्न तूं मी, मग कवणाच्या लागावें पायीं ? ७
तुजला स्तवितां हात टेंकिले जेथें वेदांनीं,
कशी टिकावी तेथें वाणी मग बापुडवाणी ? ८
स्वयंप्रकाशी काय त्यापुढें नीराजनज्योती ?
विसर्जन तुला कोठें ? विश्वें नांदविसी पोटीं. ९
कळून सारें सजलों देवा ! तुझ्या पूजनासी,
भय न लेंकरा वाटे जाया निजजनकापाशीं. १०
चुकले मुकले शब्द मुलाचे गोडच जनकातें,
बालिश लीला बघून त्याच्या मनीं हर्ष दाटे. ११
अजाण मी लेंकरूं, तुजकड जनकाचें नातें,
तव सेवेचा देवा ! ओढा असें मात्र मातें. १२
येईल तशी करितों सेवा गोड करुनि घ्यावी,
पुण्यपदाची जोड वत्सला ! विनायका द्यावी. १३

## ३. शिवराजदर्शन.

पद [ चाल.--उद्यां वघ्न जातें... ]

गुरु नीट ध्याऊं । शिवराजदर्शना लाहूं. ध्रु०

भुललों पूर्व विसरलों सारें,
अंगीं भरलें नूतन वारें,
मूर्खत्वाचे तुटतां तारे,
सत्य ते पाहूं.

REFBK-0019496

आली नयनावर अंधारी,
न दिसे न कळे स्वकर दुपारीं,
सहजच भिस्त परांवर सारी,
स्वरूपा पावूं. २

खान पराचें, पान पराचें,
भान ज्ञान स्थान पराचें,
उरलें अंतीं काय स्वतांचें,
शोधना धांवूं. ३

परतेचा दृढ घेरा पडला,
स्वभाव त्यायोगें अवघडला,
चिंताभृंग मनाला जडला,
घालवूं बाऊ. ४

सद्गुरुविना सोय न दुसरी,
व्यसनसागरीं ती एक तरी,
निर्भय पैल तडीला उतरी,
चला त्या ध्याऊं. ५

आमचा गुरु श्रीशिवराणा,
पुनरुज्जीवनहेतु पुराणा,
महाराष्ट्रवीर्याचा बाणा,
संकटीं बाहूं. ६
देह तयाचा, जीव तयाचा,
नेत्र श्रवण तयाची वाचा,
सर्व तयाचें, ज्याचें त्याच्या,
कारणीं लावूं. ७
घालूं लोटांगण तच्चरणीं,
पाहूं रूप तयाचें नयनीं,
लावूं जीव तद्गुण श्रवणीं,
तद्यशा गाऊं. ८

---

## ४. महाराष्ट्र लक्ष्मी.

पद [ चाल.--जरि कोणा श्रीमंताची..., ]

महाराष्ट्र लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे,
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे. ध्रु०
पुनः पुन्हां परचक्रानें ताडिली बिचारी,
दीर्घ काल खचली होती पारतंत्र्यभारीं,
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी,
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें. १
मावळांत वास न ठावें जया बाह्य वारें,
नेमधर्म ज्यांचे लोकीं कृषीकर्म सारें,

विळा कोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें,
तेच वीर बनले समयीं मावळे मराठे. २
न ये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी,
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ? ३
साधुसंत झाले, असती, तयांची न वाण,
मात्र रामदासा लाधे समर्थाभिधान,
जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण,
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें. ४
कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत,
ढिली कांस ज्यांची म्हणुनी हांसती, हंसोत,
तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट,
खोल गढे परसत्ता ती ढासळली लाथें. ५
पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं मग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्ववाटें. ६

---

## ५. इतिहासाचें मर्म.

आर्या ( गीति )

घटियंत्राचा कांटा घडोघडीं, अंक तेच ते दावी,
नियमच, इतिहासाची आवृत्ति तशी पुनः पुन्हां व्हावी. १

वर्णाचा, रूपाचा, पोषाखाचा नसे नसो मेळ,
मन एक सर्व भूतीं खेळवितें एकसारखे खेळ. २
दुष्ट जसे, सुष्ट तसे, गांवोंगांवीं घरोघरीं असती,
झाले, आहेत, पुढें होणार; समान कालचक्रगती. ३
नलगे कराल दंत दंष्ट्रा शत कर तशीं सहस्र मुखें,
दानव मानवरूपें दीनांवर मौज मारितात सुखें. ४
देव म्हणा, दैत्य म्हणा सत्त्वतमोवृत्ति अन्य शब्दांत.
युद्ध नव्हे त्यांत नवें जें सांप्रत तेंच कीं पुराणांत. ५
झाले सत्त्वतमांचे अवतार असंख्य आजपर्यंत,
होवो आरंभ कसा, सत्त्वाचा गोड जाहला अंत. ६
केलें महा प्रयत्नें व्याप्त जरी सकल गगन मेघांहीं,
सूर्या लोपविण्याची पूर्णत्वें शक्ति त्याजला नाहीं. ७
सत्त्वांश प्रथम तसा दिसला दबला जरी तमाखालीं,
त्याचा प्रकाश भूवर पडावयाचाच कीं यथाकालीं. ८
सत्त्वीं गुण दुसरा, तें तमोगुणाच्या तमोगुणास हरी,
मिळवी निजरूपा त्या वन्हि जसा वन्हिमय समस्त करी. ९
कौरवपांडवरावणराघवबलिवामनप्रबंधांत,
हा बोध, हींच तत्त्वें सर्वत्र भरून पूर्ण दिसतात. १०
अथवा जुन्या कथा ह्या कविलाघवनिर्मिता जयां गमती,
नूतन शिवचरिताचें पठण तयांची करी निरभ्र मती. ११
शिवचरिताचें चिंतन आशेचें रुजवितें मनीं बीज,
केल्या उद्योगाचें, कळवी, केव्हां तरी घडे चीज. १२

## ६. हतभागिनी.

पद [ चाल.--कधिं करिती लग्न... ]

तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली ! ध्रु०

मस्तकीं केश विखुरले,
श्वास चालले, अश्रु लोटले,
गळे जल गालीं—चिंतेनें पोळली ! १

वस्त्रें तीं अपुरीं जुनीं,
तेथ कोठुनी, असावा मणी,
दीनता ल्याली—दुःखानें कावली ! २

दारिद्र्य, घरीं जागतें,
अन्न काय तें, दिसेना कुठें,
वायुजलवाली—गगनाची सांउली. ३

होती ती सिंहासनीं,
भाग्यशालिनी, धनी विजयिनी,
परी तिज खालीं—दुर्दैवें ओढिली. ४

एकाश्रुबिंदुकारणें,
तियेच्या रणें, झुंजले मनें,
असे सुत झाली—जयशाली माउली. ५

कारटीं करंटीं तिथें,
निपजलीं भुतें ! मातृशोणितें—
स्वतांला लाली—आणाया धांवली ! ६

कल्याण काय नेणतीं,
नित्य भांडती, आपसांत तीं,
परां वश झालीं—स्वत्वाला विसरलीं ! ७

गेले दिन यात्रे कसे,
वर्तनें असे, एकदां फसे—
गाय जी गाळीं—चेंपत ती चालली ! ८

## ७. यापुढें.

पद [ चाल.—नृपममता रामावरती.... ]

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें ! १
निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायी धायी—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें, राज्य आपलें, असें व्यापिलें जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें ! २
फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !

वारील छत्रसालाचें
सांकडें ईश्वर कोण—यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढवी बाजी
सर करील त्याची कोण—यापुढें ! ३
अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य—भरारी—यापुढें !
फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी—यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी
झाली ती हाय भिकारी—यापुढें ! ४
ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं—यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरीं, नीज जी भरली—
ती निघेल कवण्या काळीं—यापुढें ! ५

---

## ८. शिवसंदेश.

श्लोक. [ वृत्त. शा. वि. ]

राजा या पदवीस पात्र जगतीं कोणी नसे मानवीं,
राजा ईश्वर; सृष्टिकार्य अवघें इच्छाबलें चालवी;
तो भूपाल कृपालदृष्टि करितो सर्वांस संगोपन,
स्वार्थी मानव राजता मिळवितीं ऱ्हाया स्वतांची धन. १
साधे, देउनि पाय बांधवशिरीं, सिंहासनाची उडी,
होई, राजकिरीट, दीन दुबळे लावून देशोधडी;
पाडावें अबल प्रजेस उघडें, तें राजवाडा उठे,
झाला एक धनी गिळून बसतो सर्वस्व कष्टार्जितें. २
साक्षी देव, न राज्यलोभ धरुनी मीं घोर केलीं रणें,
न व्यक्तीस्तव रक्तपात घडला. साऱ्या जनांकारणें;
मेले कोण म्हणेल बंधु पडले देशार्थ जे संगरीं ?
त्यांची कीर्ति जगांत गाजत असे; सुस्थान त्यांना वरी. ३
स्वर्गीं सर्वजन स्वतंत्र; न कुठें कारागृहें, श्रृंखला,
स्वर्गीं थार न. बांधवां तुडविती सत्तामदें, त्या खलां,
स्वर्गद्वार खुलें न वैरकलहा; प्रेमैक सर्वांतरें,
स्वर्गीं देव पिता; अभेद भजती त्याचीं तया लेंकरें. ४
साहेना परबंधनांत पडली माझी महाराष्ट्रभू,
केला यत्न, निमित्त केवळ तया मीं; साह्य झाला प्रभू;
त्याचें कार्य तयें स्वयें घडविलें; स्वातंत्र्य पात्रां दिलें,
सोसाया परतंतत्रता जगविलीं मागें तियेचीं मुलें. ५
स्वातंत्र्यास्तव कीं उगाच करितां हा आरडाओरडा,
देशाचा अभिमान सर्व तुमचा मातें दिसे कोरडा;

रा. क्र. १०५



स्वर्गी लाजविले स्वपूर्वज तुम्ही, ते आंसवें ढाळिती,
कीं आले खर भारवाहक असे पोटीं मनुष्याकृती. ६
कोठें मालुसरे, सहोदर, कुठें हे मावळे आजचे,
बाजीब्राह्मणवंशजांस बघतां उत्साह सारा खचे;
वीरांनीं पहिल्या स्वभूजननिला जीवंत केलें खरें,
आतां प्रेत तिचें चिरीत बसलीं त्यांचीं मुलें लेंकरें. ७
एकी जाय लया, परस्पर नसे विश्वास तो राहिला,
कोणाला न पुसे कुणी; निजहितीं जो तो दिसे गुंतला;
वाढे मत्सर, लोभदृष्टि अवघे; साहे परोत्कर्ष न.
झालें काय अशा गुणें स्वजनतास्वातंत्र्यसंपादन ? ८
कष्टाचें फळ वांच्छिलें न; नृपता मातें प्रभूनें दिली,
ती त्याची समजून मीं निजशिरीं अत्यादरें वाहिली;
प्रेमें वागविली प्रजा; मजसवें तीही तशी वागली,
होती भूषण तीच दूषण परी आतां दिसूं लागली ! ९
मी माझी म्हणवी तसें बघवतें आतां न ती लोचनीं,
कां हांका मज मारिते? न कळतें, वर्षांत एका दिनीं;
माझी कां प्रतिमा वृथा बसविते बाहेर सिंहासनीं?
देशप्रीति मनीं नसून, यश का येई अशा साधनीं ? १०
मी केलें, करणार काय, अवघी सत्ता प्रभूच्या करीं,
त्याला आळविणें नको, वळखतो तो भक्ति खोटी—खरी;
स्वातंत्र्यक्षम होय सर्व जनतां जाणेल जेव्हां प्रभू,
तेव्हां वेळ नको स्वतंत्र सुभगा व्हाया महाराष्ट्रभू. ११

## ९. हिरकणी.*

### दिंड्या.

सूर्य थकला जलधींत उडी घाली,
सांज खुलली पसरली पुसट लाली;
अंधकाराचें फडकलें निशाण,
निशा चढली दशदिशा करी म्लान. १
वनीं गेल्या ज्या चराया दुपारीं—
धेनु, येउनि थबकल्या बंद दारीं;
धीर न निघे, उकरिती खुरें माती,
कवाडातें ढकलून आंत जाती. २
भेटती त्या हुंगिती वासरांना,
सुतस्पर्शें जननीस फुटे पान्हा;
धेनु अंगा चाटिती स्ववत्साचे,
वत्स पीती जें स्तनीं दुग्ध साचें. ३
वर आंथरिला पिसांचा बिछाना,
अधर झोंपविलें त्यावरी पिलांना
उडत पक्षी भक्ष्यार्थ वनीं गेले,
पिलांपाशीं सांजेस उभे ठेले. ४
ज्यांस पुरतेंहि न उघडवती डोळे,
मृदुल पायां ज्यांचें न अंग तोले,

---

* ही प्रस्तुत कवीची अगदीं शेवटची कविता असावी असा समज आहे व तो खरा असल्यास हृदयांत उत्पन्न झालेली हिरकणी बाहेर न निघाल्यामुळेंच विनायकाचा अंत झाला अशी कविप्रेमवशात् सहजासहजीं कल्पना होते.

पंख नसुनी सर्वथा पराधीन,
कवण ऐशीं वाढवी हरीवीण ? ५
स्वयें चुरिला जो चंचुपुटीं पाला,
खावयाला तो घालिती पिलांला;
जगीं जन्माला आणिलें जयानें
वत्सपोषणकर्तृत्व तोच जाणे ६

---

## १०. अहल्या.

[ खालील गाणें प्रसिद्ध शूर व साध्वी स्त्री श्रीमती अहल्याबाई होळकर यांजवर रचिलें आहे. या देवी अहल्येचें ऐतिहासिक वृत्त सर्वविश्रुतच आहे. आपल्या देशांस भूषणभूत झालेल्या या स्त्रीरत्नाचा इतिहास आपल्या मुली-बाळींच्याहि तोंडीं बसावा म्हणून प्रस्तुत गाणें रचिलें आहे. ]

पद [ चाल---उद्धवा शांतवन कर... ]

श्रीमती अहल्याचरितश्रवण सुखाचा ठेवा.
संसारत्रस्त जिवाला सांपडे तयांत विसांवा. धृ०
पितरांनीं दिधलें ज्याला आनंदराव अभिधान,
कां पडेल आनंदाची सदनांत तयाच्या वाण ?
जाहली कन्यका त्याला जी रूपगुणाची खाण,
तल्लीलें त्या गमला कुग्रामवास सुखधान.
हांसतें--खेळतें जेथें सोन्याचें बाळ लहान,
पावतें झोंपडेंही तें देवेंद्रगृहाचा मान.
अमृताधिक ज्याचें मोल,
बोबडे मुलीचे बोल,

सेवून होय जो लोल,
भाग्याचा तो समजावा. १

उपवनांत सुंदर पुष्पें पावती अनेक विकास;
परि एकाद्यासच घडतो. नृपशिरोभूषणीं वास.
गुणवती अहल्या आली उटजांत जरी जन्मास,
दैवानें लिहिले होते तद्भालीं राजविलास.
तो योग जुळाला, गेले श्रीमंत तिच्या गांवास.
दाखविली दैवबलानें मूर्ति तिची श्रीमंतास,
पाहून रूप तें डोळां,
संतोष मनाला झाला.
वर तिजला निश्चित केला,
जो होळकरांचा छावा. २

लग्नविधि तिचा थाटाचा श्रीमंतकृपेनें झाला.
पोहली सुखांत अहल्या—जी सत्कीर्तीची माला.
पुत्र एक तिजला झाला रूपवती दुसरी बाळा.
संसार फळाला आला—पार नुरे आनंदाला.
फार वेळ परि तें नाहीं पाहवलें सुख काळाला,
घातला तिच्या दुष्टानें सौभाग्यधनावर घाला.
निश्चितता नसे सुखाला,
सौख्य आज—दुःख उद्यांला,
भव सुखदुःखांचा काला,
हा बोध मनांत ठसावा. ३

संसारसुखास अहल्या आंचवली पोरवयांत.
पोरवय, तिनें परि नाहीं मांडिला व्यर्थ आकांत,

पुरुषाची दु:खक्षमता अबलेनें केली व्यक्त.
सौभाग्य लयाला जातां झाली ती पूर्ण विरक्त.
आमरण ठेविलें नाहीं पद तिनें विलासगृहांत.
शुभ्र वस्त्र ऱ्याली न तिनें गोडास लाविला हात.
श्रीरामचंद्रपदकमलीं
मति तिची निरंतर [illegible]

का[illegible]

सेवून होय जो लोल,
भाग्याचा तो समजावा. १

उपवनांत सुंदर पुष्पें पावती अनेक विकास;
परि एकाद्यासच घडतो. नृपशिरोभूषणीं वास.
गुणवती अहल्या आली उटजांत जरी जन्मास,
दैवानें लिहिले होते तद्भालीं राजविलास.
तो योग जुळाला, गेले श्रीमंत तिच्या गांवास.
दाखविली दैवबलानें मूर्ति तिची श्रीमंतास,
पाहून रूप तें डोळां,
संतोष मनाला झाला.
वर तिजला निश्चित केला,
जो होळकरांचा छावा. २

लग्नविधि तिचा थाटाचा श्रीमंतकृपेनें झाला.
पोहली सुखांत अहल्या—जी सत्कीर्तीची माला.
पुत्र एक तिजला झाला रूपवती दुसरी बाळा.
संसार फळाला आला—पार नुरे आनंदाला.
फार वेळ परि तें नाहीं पाहवलें सुख काळाला,
घातला तिच्या दुष्टानें सौभाग्यधनावर घाला.
निश्चितता नसे सुखाला,
सौख्य आज—दुःख उद्यांला,
भव सुखदुःखांचा काला,
हा बोध मनांत ठसावा. ३

संसारसुखास अहल्या आंचवली पोरवयांत.
पोरवय, तिनें परि नाहीं मांडिला व्यर्थ आकांत,

पुरुषाची दुःखक्षमता अबलेनें केली व्यक्त.
सौभाग्य लयाला जातां झाली ती पूर्ण विरक्त.
आमरण ठेविलें नाहीं पद तिनें विलासगृहांत.
शुभ्र वस्त्र ऐयाली न तिनें गोडास लाविला हात.
श्रीरामचंद्रपदकमलीं
मति तिची निरंतर रमली;
भयबाधा तेणें शमली,
सुखहेतु हरीची सेवा. ४
एकाकी दुःख न लोटे येतें तें सहपरिवार,
पति गेल्यावर आटपला श्वशुराचाही अवतार,
त्यामुळें सतीवर पडला राज्याचा सारा भार;
राज्यही तिनें चालविलें दक्षता धरून अपार,
रुजविलें बीज नीतीचें. अन्याया न दिला थार,
माउली स्वप्रजेविषयीं वात्सल्य धरी अनिवार.
पुण्याची राणी मूर्ति,
सर्वत्र गुण तिचे गाती,
दश दिशा पसरली ख्याती,
झाली प्रिय रंकाराया. ५
अनिवार तृषा राज्याची मनुजास करी अविचारी,
चालून अहल्येवर ये एकवार राय भरारी.
अबलेनें त्या केली युद्धाची सज्ज तयारी,
परि बोध करूनिच त्याला फिरविलें तिनें माघारी.
'सहज तुम्ही चिरडाल मला अबला मी काय बिचारी,
काय त्यांत पुरुषार्थ परी? हें करील कोण विचारी;

पारि परिभव तुमचा समरीं,
अबलेनें करितां स्वकरीं,
मिळविली कीर्ति आजवरी,
ती बुडेल कीं भूदेवा ! ' ६

सामान्य जनीं आढळते स्तवनाची आवड मोठी,
हर्ष होय मावेनासा स्तुतिपाठें त्यांच्या पोटीं.
स्वार्थसाधु गुण नसतेंही या स्तुतिभक्तांचे गाती,
स्तुतिसुरासेवनें होते चांगल्या गुणांची माती.
जाणी हें पूर्ण अहल्या तिज खपत नसे स्तुतिपाठी,
स्तुतिपुस्तक तिजला कोणी अर्पियलें स्वार्थासाठीं-
तें तिजला खपलें नाहीं,
अंगाची झाली लाही;
बुडविला ग्रंथ तो डोहीं,
सरितेच्या नामें रेवा. ७

राणीस मुलांपासून फारसें न सौख्य जहालें,
येऊन सतीच्या उदरीं दिग्विजयी पुत्र निघाले.
तरुणपणांतच कन्येच्या वैधव्य कपाळीं आलें,
दृढ निश्चय सहगमनाचा जाहला तिचा ना हाले.
मातेस कन्यका वदली 'मायेचें जगतीं जाळें
गुंफिलें क्षणिक सौख्यानें; आहे चिर सौख्य निराळें-
जातें मी तें भोगाया,
पति वास करी ज्या ठायां;
स्त्रीजन्म पतीविण वाया,
कासया मला तो व्हावा? ' ८

बोधवच अहल्या वदली ' पूर्णत्व प्राप्त कराया
जन्मास घातलें देवें, दिधली ही दुर्लभ काया
दुःखास भिऊन कशाला होमावें तिजला वाया ?
पूर्णताच साधन आहे जन्ममरणदुःख चुकाया.'
गेलीच सती ती कन्या सारून दूर बोधा या
मातेला धक्का बसला—लागे ती नित्य झुराया
परलोका गेली राणी
पुण्याची केवळ खाणी
गुंगून तद्यशोगानीं
स्थिरचित्त विनायक व्हावा. २

---

## ११ राजा भोज.

श्लोक—[ वृत्त-शा.वि. ]

स्वप्नीं गाढ निमग्न भोज असतां ये जागृती त्याजला,
पाहे सुंदर मंदिरांत भरली चंद्रप्रभा सोज्ज्वला;
जैशी कुंदलतां फुलून खुलते तें स्थान शोभे तसें,
योगी तेथ कुणी लिहीत बसला भोजास तेव्हां दिसे. १
' सोन्याच्या नव पुस्तकांत लिहितां योगींद्र हें कायसें ?
राजा धीर धरून नम्र वचनें त्याला विचारी असें;
' ज्यांचा भाव अखंड ईशचरणीं नांवें तयांचीं मुला ! '
प्रेमें सद्वचनें, प्रसन्न वदनें योगी असें बोलला. २
' आहे ना मम नाम संत पुरुषा! मालेंत त्या गोंविलें, '
प्रश्ना उत्तर या प्रशांत मुनिनें राया नकारीं दिलें;

'माझें नांव नसो तयांत नसलें, जे प्राणिमात्रावरी,
सुप्रेमा करिती तयांतचि मला द्या स्थान कोठें तरी' ३
भोजाचें पुरवून ईप्सित मुनी तो होय अंतर्हित,
रात्रीं तो दुसऱ्या पुनः प्रकटला भोजा करी जागृत;
यादी त्याजवळी कृपा प्रभुवरें केली तयांची असे,
तीमध्यें पहिलें स्वनाम नवलें त्या रेखलेलें दिसे! ४

---

## १२ पन्ना.

पद [ चाल—रुचती कां तीर्थयात्रा... ]

थोरकुलीं जन्म घेती त्यांना जे भूषण
आढळती नीच लोकीं केव्हां ते सद्गुण;
विलसावी दिव्यता जी राजाच्या मंदिरीं
करिते ती कचित्कालीं, पर्णकुटी साजिरी. १
नीचांच्या संगतीनें चितुरीचा[१] पालक—
विक्रम हा मग्न झाला दुर्व्यसनीं घातक,
राज्याची-प्रजेचीही पडली त्या विस्मृती,
स्त्रीसंगीं सुरापानीं दंग सदा भूपती. २
करितो जो स्वप्रजेचें प्रेमानें पालन,
सद्भावें चिंतिती त्या भूपाचें हित जन.
करभार प्रजेचा जो स्वसुखाला दे बळी,
समजावें पुरीं त्याचीं शत वर्षें जाहलीं. ३
दुर्व्यसनीं विक्रमानें खोल बुडी मारिली,
त्या योगें मत्त झाली दरबारी मंडळी,

१ चितुर ही मेवाड देशाची राजधानी होती.

सूर्याचें बिंब गेलें असतांना सागरीं,
लागावे काजव्यांनीं चमकाया ज्यापरी. ४
कंटाळे विक्रमाला त्याची हो ती प्रजा,
पाडावा भूप वाटे मंत्र्यांनाही वजा;
घेऊनी निज नृपाचा संधीला त्या वळी,
भागविली राज्यतृष्णा बनेबीरें आपली. ५
एक खुनें राज्यलोभी नाहीं तो तृप्तला,
न दिसे, कीं नृपपदाचा मार्ग तया मोकळा;
सुखरूपें विक्रमाचा असतांना नंदन,
धोक्याचें वाटलें त्या राज्यपदारोहण. ६
फल होतें विषतरूचें नाशाला कारण,
यासाठीं करावा तो तरु मूलीं छेदन;
बनबीरें या विचारें घेऊनी असि करीं,
गेला तो विक्रमाच्या क्षणिं शय्यामंदिरीं. ७
प्रेमानें राजपुत्रा जेवाया घालुन,
जो जो जो करी पन्ना अंकीं त्या घेउन,
आलापी गोड गाणें मंजु रवें सुंदरी,
वाटे कीं सुधा वर्षे गानमिषें त्यावरी. ८
क्षणमात्रें व्यापिलें तें आकांतें मंदिर,
गगनींची वीज जाणों कोसळली त्यावर;
समजेना काय झालें दाईला त्या परी,
गोंधळली; जाहली ती भीतीनें घाबरी. ९

---

१ बनबीर हा पृथ्वीराजाचा दासीपुत्र.

त्या स्थानीं एक आला समयीं त्या चाकर,
तिज कथिलें नृपवधाचें वृत्त तयें दुर्धर;
पन्नेचें हृदय तेणें दुःखानें दाटलें,
अश्रूंचे पूर नेत्रीं सहज तिच्या लोटले. १०
ज्या नीचें राज्यलोभें निज वधिला भूपती,
तिज वाटे नृपसुताची करिलचि तो ती गती;
न पडावें त्या वृकाच्या तोंडीं तें पाडस
यास्तव ती सज्ज झाली दृढ करुनी मानस. ११
कुल बाप्पा राउळाचें वंद्य खरें; अति जुनें,
लोकीं तें बीज त्याचें रक्षायाकारणें,
सजली त्या द्यावयाला स्वसुताचाही बळी;
काय तिची थोरवी ! ती धन्य जगीं माउली. १२
पाटिमधें राजपुत्रा नीट तिनें निजविलें,
पत्रांनीं, फलांनीं त्या झांकोनी टाकिलें,
पाटी ती सेवकाच्या देउनियां करिं; तया,
संकेतस्थळीं एका सांगितलें जावया. १३
पर्यंकीं नृपसुताच्या आवडत्या निज मुला,
निजवोनी जवळ बैसे ती पन्ना व्याकुळा,
तों तेथें खड्गधारी नृपहन्ता पातला,
नवल नव्हे काळसा तो पन्नेला वाटला. १४
'वद कोठें विक्रमाचा आहे तो नंदन ?'
पन्नेला बोलवेना-घेईना तन्मन.
पर्यंकाकडे केलें बोट तिनें काय तें,
त्यासरशीं हाय ! न्हालें रक्तानें बाळ तें. १५

अंतरला नाथ-गेला त्यामागें, पुत्रही,
आकांतें एक केली राण्यांनीं नभमही,
पुत्राचें शव तयांनीं अश्रूंनीं न्हाणिलें;
शोकें स्वप्राण ओष्ठीं कंठींचे आणिले. १६
पन्नाही दृढ मनाची दुःखानें पोळली,
सुतनिधनें हळहळेना कोण जगीं माउली ?
परि धैर्यें तरोनीयां दुःखाच्या सागरा,
मिळवाया निघाली ती राजसुता आसरा. १७
आम्रतरू जो वसंतीं पुष्पभरें शोभला,
नित्य तया गायनानें रंजविती कोकिला,
परि होतां ऋतुपरत्वें निष्कामी तो तरु,
राहीना एक त्याच्या थाऱ्याला पांखरूं. १८
जग हें हो ! वैभवाची पडछाया केवळ,
वेळेला फशीं पाडी मैत्रीचें मृगजळ;
पैशाचे लाल सारे इष्टसखे सोयरे,
कोणीहि प्रसंगाला पाही ना सोय रे. १९
बहु होते विक्रमाचे भूप सखे, त्यांतला-
कोणीही परी नाहीं कर्तव्या जागला,
कोणीहि दिला नाहीं राजसुता आसरा,
जन कोणी विचारीना दुर्दैवी पामरा. २०
जाय पुढें कुमळमेरीं ती आसोसाकडे,
पडलें त्या नृपालाही त्यासमयीं सांकडें,

---

१ आसासा हा कुमळमेरचा राजा असून तो चितोडचा मांडलीक होता.

धर्म खरा, करावें, या बाळाचें रक्षण,
वैराला बनबिराच्या परि होतें कारण. २१
बोधाचे शब्द बोले तन्माता त्याजला,
' न्यायानें धनी आहे हाच खरा आपला,
धर्म असे सेवकाचा स्वामीचें रक्षण,
त्यासाठीं करावें कीं जीवितही अर्पण.' २२
रायानें बालकाला दिधला त्या आश्रय,
मिळतां तें रहायातें स्थल त्यातें निर्भय,
राहे येऊन पन्ना कृतकृत्या निज पुरीं,
बोधाच्या चरित्राचें मनन विनायक करी. २३

---

## १३. पद्मिनी.

पद [ चाल-भूपती खरे तें...... ]

१

करि चातुर्यें जी बंधमुक्त नाथाला,
पद्मिनी असे ती पात्र धन्यवादाला. ध्रु०
मेवाडपती भीमसिंग याची राणी,
पद्मिनी गुणाची, लावण्याची खाणी;
यद्रूपगुणांची गातां गातां गाणीं,
विख्यात कवी भाटांची शिणली वाणी;
तो सौंदर्याचा महिमा पडतां कानीं,
वदनाला सुटलें दिलीशाच्या पाणी;

तिजवीण सुचेना कांहीं त्याजला,
ध्यास त्या चारुगात्रीचा लागला,
चिंतनीं तिच्या रूपाच्या रंगला,
केवळ ती सुंदर पुतळी मिळवायाला,
घातला तयानें चितुरावरती घाला.

२

जो परनारीचा मनीं धरी अभिलाष,
होईल यशाचा लाभ कुठुनि तयास ?
सोत्साह वेढिलें अल्लानें चितुरास,
तत्रापि लागलें व्हावें त्यास हताश.
पावलें तयाचें सैन्य बरेंच विनाश,
पद्मिनीप्राप्तिची सोडी न परी आस.
पद्मिनीवदनचंद्राच्या दर्शनें,
मज फेडूं द्या नयनांचें पारणें,
याशिवाय दुसरें नाहीं मागणें,
प्रार्थिलें तयानें असें भीमसिंगाला,
तो सजला त्याचें अभीष्ट पुरवायाला!

३

प्रत्यक्ष पद्मिनी दाखविली त्या नाहीं,
आदर्शं प्रतिबिंबित स्वरूपानेंही;
तो चकित होय; जात्रया निघे लवलाहीं,
मन गढे पद्मिनीप्राप्तीच्याच उपायीं.
पद्मिनीविना त्याजला दिसेना कांहदीं,
पद्मिनीस्वरूपें दिशा व्यापिल्याही·

विश्वास ठेविला भीमें त्यावर,
पोंचवावयास निघाला सादर,
कुटिलतापूर्ण यवनाचें अंतर,
जातांच तयाच्या भीमसिंग गोटाला,
शृंखलाबद्ध यवनानें केलें त्याला!

४

यवनानें केला विश्वासाचा घात,
गोंविला यापरी भीमसिंग पाशांत;
संदेश धाडिला ' भीम व्हावया मुक्त,
झालीच पाहिजे मला पद्मिनी प्राप्त. '
हळहळले जन जाहला एक आकांत,
परि न विझाली पद्मिनी धिराची ज्योत.
ती म्हणे 'असें पति माझें दैवत,
त्यावरी आणिलें दुष्टें संकट,
मी दूर करीन परी तें निश्चित,
प्राणही बळी देईन आपुले काळा,
लावून न घेइन डाग परी स्वकुलाला. '

५

घेऊन आपल्या मंत्रिजनांस सहाय्या,
चतुरेनें रचिली एक विलक्षण माया;
संदेश गोड धाडविला दिल्लीराया,
पद्मिनी असें वाहिली आपल्या पायां;
आपल्या, तिच्या वैभवास योग्य दिसाया,
सखिसमूह तिजसह असे धाडिला राया !

तळ यवनें दिधला होता ते स्थळीं,
पद्मिनी परिजनासंगें पातली,
टवटवली यवनपतीची मुखकळी,
प्रलयाग्निज्वाला जातिवंत अहिबाला,
पद्मिनी वाटली त्या सुमनांची माला !

६

पद्मिनी लाभली तरी भीमसिंगातें,
सोडूंच नये, यवनास यापरी वाटे;
पद्मिनीस निज कांतातें भेटायातें,
अवकाश दिला अति अल्प देहलीनाथें;
तो स्वतः कल्पनापटावर स्थिर चित्तें,
रंगवीत बसला भावि सुखाचीं चित्रें !
चतुरेनें सखिवेषानें चांगले,
शूर वीर संगें होते आणिले,
वेळेवर सैन्य तयांचें थाटलें,
घातला अरीवर अवचित त्यांनीं घाला,
झडपिती जसे हरि करीस, गरुड व्याला.

७

पद्मिनीरवाची तृषा ज्यास अनिवार,
शिरले यवनाच्या श्रवणीं त्या टंकार;
दर्शनें तिच्या जे व्हावे लोचन गार,
त्यापुढें राहिला उभा सज्ज दलभार;
कंठांत पडावें हात तिचे सुकुमार,
थाटली मिठी त्या घालाया तरवार.

घनघोर यापरी वेळा पातली,
येऊन जिवावर त्याच्या बेतली,
तेधवां तयाची गुंगी उतरली,
वितुळलें सुखाचें अभ्र उघडला डोळा,
युद्धास तत्क्षणीं तोही सज्ज जहाला.

८

लगटले वीर माजला घोर संग्राम,
लागले असंख्य म्हणाया राम! रहीम;
रजपूत रणीं पडले रक्षाया धर्म,
त्यायोगें ते पावले स्वर्गसुखधाम,
अल्लास जरी लाधलें जयश्रीदाम,
झाला न तरी परिपूर्ण तयाचा काम,
कीं त्यास पद्मिनी नाहीं लाधली,
गर्दींत पतीसंगें ती निसटली,
येऊन सुखें स्वपुराला राहिली,
यापरी अरिस जी दिपवी रजपुतबाला,
गाऊन तिच्या चरितास विनायक धाला.

---

## १४. राणी दुर्गावती.

पद [ चाल—लक्ष्मी गर्वें निंदा वोलुनि........ ]

१

वीरशालिनी धन्य धन्य ती राणी दुर्गावती,
सत्कीर्तिध्वज जिचा फडकतो आजवरी भारतीं. ध्रु०

बुंदेलीं जे पराक्रमी नृप थोर थोर जाहले,
महोबाधिपति चंदन त्याचें नांव त्यांत गाजलें.
भगवंताच्या कृपाप्रसादें रायाला चांगलें,
कन्यारत्न प्राप्त जाहलें रूपें जें आगळें.
आनंदाचें भरतें तेणें रायाला लोटलें,
नांव तयें कन्येचें दुर्गावती असें ठेविलें.
चांफयाची कलिका क्रमें क्रमें ज्यापरी,
खुलतांना दिसते नयनातें साजिरी,
तैशी ती वाढे रम्य सुभगमंजिरी,
प्रफुल्ल सुंदर कमलावरती भृंग उड्या घालिती,
तत्प्राप्तीस्तव झटूं लागले असे थोर भूपती.

२८

गढमंडळचा राजा दलपत निश्चित केला वर,
नृपें तयाच्या करीं ओपिला निज कन्येचा कर;
पदरीं पडतां स्त्रीरत्न असें तेजस्वी सुंदर
विलाससरितेमध्यें लागे पोहाया नृपवर;
राज्य विसरला-प्रजा विसरला नित्य सुखीं तो चुर,
त्यायोगें संकट ओढवलें त्याच्या राज्यावर;
स्त्री भूषण-जीवन-संसाराचें खरें,
परि, परिमित सेवन तिचें करावें बरें,
अति लुब्ध न व्हावें तीच्या ठायीं नरें,
स्त्रीच्याठायीं दलपतसम जो होतो लंपटमती,
जीवित्वाला-सर्वस्वाला-मुकतो तो शेवटीं.

३

दिवस सुखाचे सरले; भरली आयुष्याची घडी,
झाली रायावर काळाची दृष्टि पहा, वांकडी;
दुर्गावतिच्या सौभाग्यावर यमें घातली उडी,
दुःखाच्या सागरीं सांपडे अबला ती बापडी;
संकटांतही तिनें उभविली, परि, धैर्याची गुढी,
बुद्धिमतीनें स्वतां बसविली पतिराज्याची घडी;
नृपपदीं बसविलें बाळ तिनें आपलें,
राज्याचें स्वकरीं सर्व सूत्र घेतलें,
सुखविलें प्रजेला चातुर्याच्या बळें,
अबलेच्या राज्यावर डोळा लोभी नृप ठेविती,
अकीर्तिकारक काय लोभ हा! नीचपणा हा किती !

४

अबुल फाजलें हर्षें ज्याचें यशोगान गायिलें,
त्या अकबर रायाचें झालें लोभें मन आंधळें;
न्याय कळेना-नीति कळेना, स्वार्थ मात्र त्या कळे,
अबलेचेंही राज्य तयाला घ्यावेंसें वाटलें !
तीच्या राज्यावरती त्यानें थोर सैन्य धाडिलें,
निकरें झुंजावया लागलीं समरीं दोन्ही दळें.
शौर्यानें लढली राणी दुर्गावती,
पाहून पराक्रम तिचा, अरी लाजती,
त्या न सुचे कांहीं-झाले कुंठितमती.
पडूं लागल्या भरभर त्यांच्या रणयज्ञीं आहुती;
विजयश्री, वाटलें, घालिते दुर्गावतिला मिठी.

५

परंतु एकाएकीं फिरलें युद्धाचें पारडें,
कुमार आवडता राणीचा धारातीर्थी पडे;
तीच्या सैन्याच्या धैर्याचें खचलें तेणें कडें,
रणांत हाहाकार पसरुनी गेला चोंहींकडे;
पुत्र हरपला; परि त्या स्त्रीला फुटलें नाहीं रडें,
कमान वीरत्वाची पुत्रप्रेमावरही चढे !
निकरानें होती तशीच ती झुंजत,
तद्गात्रें झालीं अतिश्रमें विगलित,
अंगांतुनि होतें रक्त तिच्या वाहत,
निज राज्ञीची ऐसी दुर्धर पाहूनीयां स्थिती,
एक तिचा स्वामिनिष्ठ सेवक वदे असें तिजप्रती.

६

'यश:प्राप्तिची आशा आतां धरणें नलगे मनीं,
रणत्याग हा उक्त दिसे पथ या समयीं स्वामिनी !'
वदे तदा ती क्रोधें 'न चुके मृत्यु कधीं या जनीं,
यश:प्राप्ति मग कां न करावी पडून समरांगणीं,
आमरण मला यवन स्पर्श न व्हावा यालागुनी,
या खड्गें हें शिर उतरीं हा देह पडूं दे रणीं.'
या शब्दें सेवक फार चकित जाहला,
गहिवरें तयाचा कंठभाग दाटला,
नेत्रांत तयाच्या अश्रुपूर लोटला,
हात जोडिले-पदर पसरिला, तयें विनविलें अती,
परी निश्चयापासुनि ढळली नाहीं ती स्थिरमती.

७

अभिवंदन खड्गास शेवटीं तीं प्रेमानें करी,
धैर्यें तें स्वकरेंच खुपसुनी घेइ आपल्या उरीं;
वीर्यशालिनी अबलेचा त्या देह पडे समरीं,
सद्यश ती मिळवी इहलोकीं—स्वर्गसौख्यही वरी;
एकनिष्ठ सेवक तो समरीं तोच मार्ग आदरी,
क्षुधित कोण मिष्टान्न यशाचें सारील वदा, दुरी ?
विधिबळें पावला सज्जन निधना जरी,
सत्कृत्य तयाचें चिर वसतें भूवरी,
सामान्य जनमना तें अति उन्नत करी,
सज्जन जे निज देशहिताला तनुमनधन अर्पिती,
यशोगायनीं त्यांच्या व्हावी विनायकाला रती.

---

## १५. संयोगिता.

पद [ चाल—अर्धतनू वारुळीं बुडालीं...... ]

१

ऐका कैसा ओघ भारतीं यवनांचा लोटला,
देश हा परवशता पावला.
कनोजाधिपति-जयचंद्रसुता सौंदर्याची कळा,
चतुरता अंगीं जिच्या बाणली;
जिच्या मुखावर वीरत्वाची प्रभा दिव्य फांकली,
सदा जी विनयानें वांकली;

नामें संयोगिता सती ती उपवरता पावली,
काळजी नृपहृदया लागली;
लालसा धरूनी त्या स्त्रीची अंतरीं,
मागणी घातली तिला बहुत नृपवरीं,
एकही न आला जयचंद्रमना परी,
यास्तव त्यानें स्वयंवराचा घाट तिच्या घातला,
भूपगण सादर आमंत्रिला.

२

गर्वें अव्हेरिलें मागणें जयचंद्रें आपलें,
वृत्त हें पृथ्वीराजा कळे;
अपमानाचें शल्य तयाचे हृदयाला झोंबलें,
पेटलें चित्त क्रोधानलें.
कनोज नगरा गेला नाहीं स्वयंवरा तो बळें,
न हें जयचंद्राला साहलें.
तच्चित्तीं शिरला अनर्थमूलक कली,
सद्विचारशक्ती दूर तयें हांकिली,
अविचारें केली भूपदृष्टि आंधळी,
पृथ्विराजवेषानें पुतळा नृपें एक सजविला,
मंडपद्वारीं तो स्थापिला.

३

दूर दूरच्या भूपें केली रंगसभा साजिरी,
जियेला जोड नसे भूवरी.
नवरत्नांची सुंदर माला घेवोनी ती करीं,
पातली स्वयंवरा सुंदरी.

दृष्टीं पडतां लोकोत्तर लावण्यवती ती परी,
जाहले भूप दंग अंतरीं.
टाकीत चालली मंद मंद पावलें,
ती; तों तों आशा भूपांची मावळे,
तत्प्रयत्न सारे निष्फलता पावले,
येऊन तिनें द्वारीं प्रेमें त्या पुतळ्याच्या गळां,
दिव्य तो रत्नहार घातला. ३

४

यापरि उलंघून अडथळे प्रेमाची निर्झरी,
मिळाली शौर्याच्या सागरीं;
सर्व भूप विस्मयें जाहले तटस्थ चित्रापरी,
निराशा म्लानवदन त्या करी;
कोप जाहला मावेनासा जयचंद्राच्या उरीं,
तयाचें मन निष्ठुरता वरी;
कोपाची संगति जन हो ! बरवी नसे,
सुज्ञही नरां तो करितो वेडे पिसे,
किति अनर्थ घडती जगतीं याच्या वशें,
या कोपाच्या पायीं कन्या नव्हे प्राण आपला
नृपानें कारागृहिं लोटिला. ४

५

क्रोधें चवताळतो ज्यापरी जातिवंत जो फणी,
तयाचा कोणी हरितां मणी;
जयचंद्रावर तैसा गेला पृथ्विराज धांवुनी,
पराभव केला त्याचा रणीं.

वधू आपली बंधविमुक्ता करि दिल्लीचा धनी,
स्वनगरा जाय तिला घेउनी.
मन जयचंद्राचें कोपाग्नीनें जळे,
त्याजला काय तो सूड दिसे; त्यामुळें,
जाऊन भूप तो यवनपतीला मिळे,
राणी—संयोगिताहरण हें नव्हे-नव्हे साधिला,
कलीनें डाव असा आपला !

६

भारत जिंकावयास घोरी आला होता परी,
जाहला पराभूत संगरीं;
त्या समयापासून जयाची मनीं लालसा धरी,
बैसला टपून सीमेवरी;
तों अवचित जयचंद्र तयाच्या गेला असतां घरीं,
कां न तो खुशालेल अंतरीं ?
जयचंद्राच्या सहवर्तमान त्यावर,
घेऊन महंमद निज सेनासागर,
यावया निघाला दिल्ली नगरावर,
पृथ्वीराजाही युद्धाला शीघ्र सज्ज जाहला,
रणीं संग्राम घोर माजला !

७

पुरुषवेष परिधान करुनी राणी संयोगिता,
पातली होता जेथें पिता.
' कन्येच्या सौभाग्यमंदिरा अग्नि कसा लावितां ? '
पित्याला वदे धैर्यदेवता;

'धर्म जनक हा—जन्मभूमिका मूर्त मातृदेवता
तयां कां यवनकरीं आपितां ?
करण्यास्तव निज देशधर्मसंरक्षण,
संगरीं करावें जीवितही अर्पण,
नरजन्मसफलता अन्य नसे याहून,
वृथा धर्म बुडवाया, तसा मातृभूमिचा गळा—
चिराया, शत्रु घरा आणिला ! '

८

बुद्धिमती कन्यका पित्याला बोध करी यापरी
तयें तो वळला नाहीं परी;
लढली, पडली, वीरस्त्री ती स्वपतीसह संगरीं,
अरींतें लोळवून भूवरी;
दिल्लीचें साम्राज्य लागलें महंमदाच्या करीं,
लालसा झाली त्याची पुरी,
जयचंद्र नृपाचें दुष्ट कृत्य त्या नडे,
तद्राज्य हारिलें यवनपतीनें पुढें,
तो देशद्रोही दुःखसागरीं बुडे,
चरिताकृतरू बोधफलांनीं दिसतां आथंबला,
विनायक कूजाया लागला !

---

१. गायत्री.

## १६. तारा.

पद [ चाल–भीमकबाळा म्हणे नृपाळा ! ]

१

रायशूरनाथाशीं केला कपट प्रसंग यवनांनीं,
हरिलें त्याचें राज्य, उडविली ऐश्वर्याची धुळधाणी.
भूपालाच्या सर्वस्वाची दुर्दैवें होतां हानी,
वनमार्ग तयें धरिला साडुन सर्व वंधनांवर पाणी.
छत्र शिरावर जेथ मिरविलें राज्य भोगिलें ज्या स्थानीं
कोण मानधन जन परसेवा पथकरील लाजिरवाणी.
जो निज सदना अपहारी,
बनून त्याचे कैवारी,
तद्धृत[1] निज सदनद्वारीं–
तदंजलीनें कृतज्ञतेनें आपलेंच प्यावें पाणी,
याहुन गमला भला नृपाला वास वनचरांसह रानीं !

२

स्वातंत्र्याची खाणी–राणी–मनोहारिणी वनस्थिती,
स्वावलंबनोन्नति प्रबोधा पदोपदीं मानवांप्रती.
स्वच्छंदानें मंजुळ गाणें गात वात फिरती स्थिरती.
झंझावातें, उत्पातें नग हेलकावती, दडावती.
निर्झर झरझर उडया मारिती, करितां क्रीडा स्वैरगती.
इष्टाशेनें खग गगनीं, मृग विपिनीं, उडती बागडती.

---

1. तत+हत=त्यानें हरण केलेलें.

सृष्टीचीं लाडकीं मुलें,
फुलती, खुलती फुलें, फळें;
कृत्रिमतेला स्थळ न मिळे.
कन्या तारा स्वप्राणाधिक गणी वनीं तो नृप मानी,
राजविलासीं जें वनवासीं तत्सहवासीं सुख मानी !

३

चिंतादुःखें पोळल्या जनां इष्ट प्रियजनसहवास.
तारा सारा ताप निवारी; दे जनकाला उल्हास.
गतराज्यकथा सुतेस कथितां जाती अक्षुण्ण श्वास.
गहिंवर दाटे काळिज फाटे, अश्रुपूर ये नयनांस.
नृपदुःख खळे तारेस कळे—कपटें वळें राज्यग्रास,
कसा खलांनीं केला, आला कसा कपाळा वनवास.
उदात्त सृष्टिग्रंथोक्त,
स्वावलंबनाचे पाठ,
शिकवी कन्येला तात,
काय नवल मग वीरश्रीचें तिच्यांत संचरलें पाणी ?
माघारीं गत वैभव आणी; राखी जनकाची बाणी !

४

वनस्थ ताराख्याति पसरली स्पृहणीय गुणें चोंहिंकडे,
कस्तूरिका कुठेंहि असली, तरी तिचा का गंध दडे ?
राजपुत्रवर वरचेवर यावया लागले तिच्याकडे,
नटले, झटले; उठले, सुटले; कुठलें त्यांचें तेज पडे ?
रूप मनोरम, धनतेजोत्तम; परंतु निष्प्रभ तिच्यापुढें,
उत्साहें आले, परि झाले आशेचे त्यांच्या तुकडे !

राज्याची मोडली घडी,
बसवील पुनः बळें गडी,
मान अरीची जो रगडी,
आजन्म ऋणी नतशिर राहिन त्या नरवीराचे चरणीं,
निर्धार तिचा कीं पितृकार्यीं गेला जावो जीव रणीं!

५

पितृसेवाकर्तृव्यीं दृढमति खरे तनय ते; त्याच सुता,
अन्य तनय, ते अयुक्तनय हो; सुता म्हण त्या त्या व्यसुता,
मूर्तिमंत देवता माउली; इहलोकींचा देव पिता.
अनन्य भावें त्यांस भजावें; सद्धर्म नव्हे यापरता,
कालगतीनें धारण करिते मधुर फलें कर्तव्यलता-
या न्यायानें सिद्धि लाधली पितृपर तारामनोरथा.
मृगयेकरितां एक दिनीं,
फिरतां फिरतां ती विपिनीं,
वीर एक पडला नयनीं,
काय रूप तें! काय शौर्य तें! मुखप्रभा फांके रानीं,
शौर्यें त्याच्या चकितच व्हावें मी मी म्हणत्या वीरांनीं.

६

तिचा गमले परकरगतलक्ष्मी आणीलचि तो परत घरा,
मृगयेमाजीं रमली, दिसली बाला त्याला ती रुचिरा.
नयनीं भरली, मनांत ठमली अनुरूपा ती वीरवरा,
भेट जहाली, मैत्री जडली, इच्छा कळली परस्परां.
झटती, बघती पुरी कराया मार्ग कोणता सुलभ बरा.
विघ्नें आलीं आड तयांचा करुन टाकिला पुरा चुरा,

' परवशतेचें हीन जिणें, '
बरवें त्यापेक्षां मरणें,
अशी बोधिलीं स्वजनमनें,
जनीं घुमविली स्वातंत्र्याची धैर्यें उत्तेजक वाणी,
लोक वळविले, सैन्य जमविलें; पक्ष सबळ केला त्यांनीं.

७

थोडा नगरीं मोहरम सणीं आनंदी—आनंद भरे,
जेतांचा गण विहरे, विधरे वृंद जितांचा दुःखभरें,
म्लेंच्छ नृप जयें हर्षें डोले; दुसरे, विसरे भान पुरें,
तों तारेनें अवचित त्याचें मर्म भेदिलें तीक्ष्ण शरें,
मरे धरेवर पडे, खडें बल तसें तयाचें तें पसरे,
नृपासनीं जनकास बसवितां आलें तोरस स्वकरें,
हेतु मनींचा होय पुरा,
आलें, गेलें राज्य घरा;
पावे तारा योग्य वरा.
आलें उदया सुकृत वाटलें, हर्ष न मावे जनकमनीं,
समुद्धरी कुल, हरी यशोफल, धन्य धन्य रव जनवदनीं !

८

अवनत वंश, ग्राम देशही अशा रीतिनें उद्धरती,
सुकन्यका जर त्यांत निपजल्या, सत्पुत्र तसे धीरमती.
तनयसुतांची कृति अवलंबे पितरांच्या शिक्षेवरती,
बीज सुमतिचें कन्याहृदयीं नृप पेरी काळीं उचितीं.
रुजली, फुलली, फळास आली यथाक्रमें ही तत्सुकृती,
क्षुद्र लता अबला; परि कृतिनें मधुर गुरु फलें ही धरिती;

उगवे म'वळला तरणी,
खाली वर मालिका मणी,
दिसे सृष्टिची ही स'णी,
धीर धरा, उद्योग करा, दृढ नियम वागवा हा ध्यानीं,
उत्तेजन द्या विनायकाला बोधाचीं गाया गाणीं.

---

## १७. कृष्णा कुमारी.

गाणं [ चाल-चंद्रकांत राजाची...... ]

१

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला,
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला !
सुनील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदुकला,
तोंच तिचा निर्घृण राहूंने धरिला हाय ! गळा !
भीम नृपाला प्रियतर बाला कृष्णा वेल्हाळा,
नडली, पडली बळी अकालीं, त्यायोगें, काळा !
स्वार्थ संसृती, लोभपरायण जगताची रीती,
उठे सुतेवर पिता हितास्तव, विसर नयनीती !

२

उपवर झाली भीमकन्यका रूपवती कृष्णा,
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा;
जयपुरराजा म्हणे गुणवती व्हावी मज भाजा,
जोधपूरचा भूप म्हणे तो भाग असे माझा !
शिंद्यांच्या जोरावर चढला मारवाडवाला,
वांच्छी व्हावा प्राप्त आपणा कृष्णेचा माला;

जयपुरची मागणी त्यानें धाकें परतविली,
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली;
कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात,
घोर युद्ध माजलें वाहले रक्ताचे पाट !

३

अमीर नामा पठाण घातक, नीच, अविश्वासी,
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं;
वदे ' हितास्तव करा स्वदुहिता अर्पण मानातें,
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें;
अथवा हें खंडूनच टाका मूळ अनर्थाचें,
कां कारण होतां पाडाया बळी सहस्रांचे ' ?
विचार पडला, कसा पोटचा गोळा तोडावा ?
चुकवावे वा काय उपायें शत्रूंच्या घावा ?
चालक, मंत्री अजित नृपाचा तोचि मार्ग दावी;
' समर्थीच ' म्हणे ' ही अग्नीची ज्योत मालवावी ! '

४

आस जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी,
कोसळून आकाश गमे त्या पडलें काय शिरीं !
' धिक्कार असो !' वदे ' जीविता तुमच्या धिक्कार,
व्यर्थ जन्म घेऊनं जाहलां धरणीला भार !
छत्र शिरीं मिरवितां, म्हणवितां स्वनां लोकपाळ !
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ !
हाच काय पुरुषार्थ ! कुलाचा हाच काय मान ?
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान !

रजपूतांचे छावे आम्हीं अबलांचे साथी,
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं !
वदा कोण, त्या मृणालिनीच्या जिवावर उठला ?
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लाविन खास टिळा !
पडेल जेथें मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड—लेख !
नको बुद्धि ती, नका अमंगल वच तें उच्चारूं,
धीर न सोडा; धर्म आपला रणीं मरूं—मारूं ! '

५

बोध खलास न रुचे, अहिमुखीं दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल !
दौलत थिजला; परि न खलांचा दुष्ट यत्न विझला,
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला !
करूनियां निर्धार मनाचा, धरून तलवार,
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणों करी स्वकरें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं !
हिम धवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
धवल फुलें तीं धवल करानें धवल गुणीं गांठी !
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं,
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जलीं !
तिच्या दिव्य तेजानें दिपला, भरला कंप करीं,
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमिवरी !

टिकलें पुण्यप्रभावापुढें नाहीं पळ दुरित,
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत!

६

गळून पडलें शस्त्र पुढें तें—निशाण मरणाचें!
धरून जें स्वकरीं भूमिवरी स्वैर मरण नाचे!
परि नाहीं तों धैर्यदेवता तिळभर डगमगली,
मधु स्मिताची खळी कपोलीं उलट तिच्या पडली!
परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकांत,
मातृहृदय तें! करील कैसा सहन सुताघात!
पिटी उरःस्थळ, कुंतल तोडी, कर माथां हाणी,
धाय मोकलुनि रड, घरेला अश्रूंनीं न्हाणी.

७

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता,
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता!
शस्त्र न चाले म्हणुनि विषानें भरलेली वाटी,
आणून दिला जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं!
स्मित वदनानें करीं विषाचा धरून तो प्याला,
पदरें नयन पुशी मातेचे, वदे वीरबाला:—
'कां करिसी हा शोक? आणिसी कां नयनीं पाणी?
कवण वांचला सांग, भूवरी आजवरी प्राणी!
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी,
मृत्युबलानें तुटे भवाची दुःखाची गांठी!
वाट जिवाला चिर सौख्याची मृत्यु मात्र दावी,
वद, मग आली मरणाची कां संधि घालवावी?

जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी,
भाग्यवंत तो, पडे संकटीं जनकाच्या कामीं !
धिग् जीवित ! ज्या कारितां पडती बळी असंख्यांचे,
मरण यशाचें, जर त्या योगें देश—धर्म वांचे ! ’

८

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोंट,
मोहमूढ मातेस न वरे अश्रूंचा लोट !
एकदोनदां घोंट विषाचा नाहीं तिज पचला,
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला !
हाय ! कुसुंभ प्याया धरिला पुढें तिच्या ओठीं,
मोलविली या परी खलांनीं ती रत्नज्योती !
केला, अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत,
त्या शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत !
जसें करावें. तसें भरावें; बीज तसे दाणे !
‘ विनायका ’ला करी बोध हा कृष्णेचें गाणें.

---

## १८. ध्यास तो भास.

[ अकबर बादशहाच्या मायावी राज्यकर्तृत्वाला भुलून पुष्कळ नामांकित रजपूत वीरानीं यावनी धर्माची दीक्षा घेतल्याची गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्यांपैकीं एकाचें पश्चात्ताप-चित्र पुढें दिलें आहे. ]

आर्या. ( गीति. )

१

स्तंभासमीप होता तो त्या समयास एकटा बसला.
नव्हती वृत्ति ठिकाणीं; चिंतेच्या सागरीं दिसे फसला. १

तेज मुखावर नव्हतें. गळली होती उरस्थलीं मान.
हृदय उंड, आंत कढे, चिरडे जैसें पडून पाषाण. २
तंतूच्या वाद्यावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात.
भालीं कर तो फिरवी वरचेवर, मग्न निज विचारांत. ३
तेथें एक तयाच्या पडला निःश्वास तेधवा कानीं,
न कळे त्यास उमटला, कैसा, कोठून, कीं तया स्थानीं. ४
हा काय भास झाला, कीं कांहीं खेळ कल्पनाच करी ?
सांदींतून असावी आली कीं काय वायुची लहरी ? ५
शिर वर करून फिरवी दृष्टि तलावाकडे परंतु जल,
स्थिरचि दिसे पडलेला तेजाचा आरसा जसा अचल. ६
तृण वाढलें चळेना—तरुचें हालें न एकही पातें,
दुर्गध्वज न फडफडे—आला कीं झोंप त्याजला वाटे. ७
सर्वत्र दिसे स्थिरता—ऐकूं येई न वायुचें नांव,
निःश्वास मग कशाचा ? कैसा त्याचा कळून ये ठाव ? ८
वर खालीं दृष्टि करी—इकडे तिकडे पुनः पुन्हां पाहे,
चाळा तोच तयाला लागे, त्यांतच तयास सुख लाहे. ९
परि एकदां सहज तो पाहे डावीकडे वळून जसा,
तरुणी रमणी बसली दिसली तो चकित होय त्यासरसा. १०
घेऊन शस्त्र हातीं शत्रु उभा तेथ ठाकला असता,
तत्रापि या परी तो पुरुष भयाभीत जाहला नसता. ११
हें काय चिन्ह ? न कळे स्त्री ही कैसी कुठून अवतरली ?
भरली सौंदर्यानें मूर्तिमती तरुणता पुढें सरली. १२
धन्या रसिकंमन्या हे मंगलदायिनी अमरकन्या ?
अन्यायवर्तिनी कीं श्मशाननिवासी पिशाचिका वन्या ? १३

उकले ना गूढ तया, न फिटे पडली मनास जी भ्रांती,
पाहे, पुन्हां न्यहाळी तें मुख, तें रूप, दिव्य ती कांती. १४
ती मोहना तयाची सखी, तिची खूण त्याजला पटली,
प्रीति करी त्याजवरी; आतां परि सर्वथा तया विटली. १५
परिणय त्यांचा झाला असतां तीं नांदलीं सुखें असतीं,
परि यवनधर्म धरिला तयें, तया बुद्धि जाहली असती. १६

२

होता गुलाब गालीं--ओष्ठावरती तशी तिच्या लाली,
चिंतेचा ढग भालीं धरि त्यावर सांवली परी काळी. १७
नेत्रांत तेज होतें, परि निश्चल त्या सरोवरावाणी,
चंचलता मावळली. शून्यपणा काळजी तया आणी. १८
साधेंसुधेंच पातळ. हिरवी अंगांत कंचुकी ल्याली,
कृष्ण कुरल केश तिचे ते अस्ताव्यस्त विखुरले भालीं. १९
बोलावयास्तव तिनें कर वर केला तयांतुनी पार,
दिसता चंद्र तुम्हांला--असा तिचा काय दिव्यतासार. २०

३

' भक्ति जयावर करितें आलें मी त्याकडे स्थलीं वन्य,
हेतु मला सुख व्हावें--वाटावें त्याजला जगीं धन्य. २१
उल्लंघिलें तटाला--आलें वंचून रक्षका दक्ष,
तुज भेटले सुरक्षित येथ करायास सोक्ष कीं मोक्ष. २२
वदती कुमारिकेच्या पवित्रतेचें अपूर्व तेज जनीं,
विजनीं उग्र मृगेंद्रहि तिज दिपती--लागती तिच्या भजनीं. २३
जो श्वापदांत रानीं राखी ईश्वर तिची अशी लाज,
त्यानेंच मज सुरक्षित यवनचमूंतून आणलें आज. २४

हेतु धरून मनीं मी आलें चालून आपल्या पायीं,
होता तो विफल मला जाण, दिशा शून्य जाहल्या दाही. २५
तूं मुकलास मला; मी अंतरलें तुज अखंड अंतरलें,
ही शेवट भेट समज, येथेंच प्रेम आपलें स्थिरलें. २६
पूज्य स्वधर्म त्याचा नित्य वहावा मनांत अभिमान,
मान तयांतच; धर्म न चळावें कापितां तुणी मान. २७
श्रेयस्कर मनुजातें आलें निज धर्म-क्षणीं मरण,
सिंहासनास्तव नको परि, करणें धर्मबाह्य आचरण. २८
निज धर्म त्यजिला त्वां. यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला,
टाकून अमृतवल्ली-आवडिनें घेतला करीं वुचगा. २९
कर जोडितें; पसरितें पदर; तुझे चरण मस्तकीं धरितें,
आज्ञापिशील तें तें करितें; परतें; न दुजनांत रतें. ३०
हा धर्म नको तुजला, यवनांचा ही नको नको छंद,
नलगे कुराण; बरवें पुराण; भज रामकृष्ण गोविंद. ३१
होईन तुझी दासी—त्वत्पदकमलें विलीन राहीन,
व्हाया सुख उभयाला आड असे यवनधर्म हा हीन. ३२
होऊं उद्याच आपण एकत्र विवाहबंधनें पुण्य,
राहूं आजन्म सुखीं; घेऊं म्हणवून या जगीं धन्य.' ३३

४

'होणार विवाह कुठें? जिथें चितेवर कलेवरें जळती,
मळती धुळींत कोणी—कोणी चीतेतसंशयांनी तळमळती. ३४
कारण हिंदुत्वावर पडणार उद्याच आमची टोळी,
नलगे विलंब तुमची देवदरें व्हावयास वाटोळीं. ३५

बाळ असो, तरुण असो स्त्री किंवा पुरुष अथवा म्हातारा,
त्याजवरी असिधारा धरूं, करूं देश शून्य हा सारा. ३६

तूं प्राणप्रिय मजला, तुझे सखे सोयरे कृपापात्र,
समरांतून उद्यांच्या सत्तनें वांचणार ते मात्र. ३७

तुमच्यांत जन्मलों मी—मजमध्यें हाडमांस तुमचेंच,
तुम्हांस न त्यजावें; परि मज तुमचीच लागला ठेंच. ३८

तुमचा-नव्हेचि-माझा होता जो पूज्य धर्म आजवरीं,
त्याजंवरी मी उठलों—काय करूं? हाय! हृदय लाज वरी. ३९

परि एक देव जाणें याचा माझ्याकडे नसे बोल,
फोल प्रयत्न केले; कळलें माझें न बांधवा मोल. ४०

देशहितास्तव झटलों; धर्माचें वाहिलें शिरीं काज,
माजविला दंभ न मीं, केला न जनांत शुष्क आवाज. ४१

कर्तव्य मनःपूर्वक केलें तें बांधवां न आवडलें,
नडले येऊन मला, ते मम मार्गांत आडवे पडले. ४२

ते नीच मत्सरी ते दुर्व्यसनासक्त, दुर्मती कपटी,
नांव नको, गांव नको त्यांचें; त्यांना असो दुरून नती. ४३

विटलों—विटलों त्यांना; झालों मी त्यांजपासुनी दूर,
होईन शांत जेव्हां त्यांचा पाहीन जाहला चूर. ४४

व्हावा जर मी तुजला, माझा सहवास वाटता गोड,
जोड मला, सोड तयां—हितकर ही सुचविली तुला तोड. ४५

भ्राता मी, भगिनी मी, देव, पिता, माउली तुझी मीच,
माझ्यांत सर्व नातें—मी असतां तुज कशास हे नीच?' ४६

५

स्कंधीं शिर आधारी, त्याच्या ती मृदुल कर गळां घाली,
घ्याली भीरु उसासे, स्फुंदे, अ गुप्ण आसवें ढाळी. ४७
वाहे मंद समीरण; अमृताची वृष्टि तो शशांक करी,
एकांतिं अशा समयीं रमणीची कोण लालसा न धरी ? ४८
त्यांतुनि ही अनपेक्षित, सहज अनाहूत भेटली जर ती,
नाहीं येणार कशी पुरुषाच्या हृदयसागरा भरती ? ४९
परि सुप्रसंग ऐसा त्या वीरा हेतु जाहला असुखा,
भुजवलय नव्हे, पडला, गमलें नागीणिचा गळां विळखा. ५०
झालें प्रशांत मस्तक, होतें जें सागरापरी क्षुब्ध,
हृदय उडना; त्याचे सारे व्यापार तेधवां स्तब्ध. ५१
पाहे त्या स्त्रीचें मुख तों पालट केवढा दिसे त्यांत !
ती मोहना प्रियतमा आहे किं नसे अशी पडे भ्रांत ! ५२
रूप तिचें तेंच असे; फिकटपणा ये परंतु त्याजवरी,
जीवांश त्यांत न दिसे-प्रकाश जो सकल अवयवां वितरी. ५३
वदन निमीलित झालें-कीं वैसे मृत्युची तयास खिळी,
बोले बोल जरी ती, श्वास उमटतां दिसे तिचा न मुळीं. ५४
हृदय न उडे-पडे तें गार-न नाडींत राहिला त्राण,
नेत्रीं तेज लकाके, परि न दिसे त्यांत जीव कीं प्राण. ५५
चित्रें स्वकल्पनेनें वातावरणीं करून निर्माण,
होती छांदिष्ट कवी त्यांच्या अवलोकनांत रममाण. ५६
नटती नवीं नवीं तीं विराटरूपें क्षणोक्षणीं नाना,
तीं कल्पनाविनिर्मित जाणुनिही भय न वाटतें कोणा ? ५७

तैसेंच लाडकीचें स्वरूप एका क्षणांत पालटलें,
अवलोकून भयें त्या तरुणाचें हृदय तेधवां घटलें. ५८

६

‘ छे, छे नको नको हा अविचार करूं; विवेक कर कांहीं ?
ती स्त्री वदली ‘ मम-सत्प्रेमाची क्षिति तुला नसो—नाहीं. ५९
चाड धरीं पितरांची, स्वकुलाची, पूज्य मातृदेशाची,
धर्माची-ईशाची-अनुकंपा नित्य पाहिजे ज्याची. ६०
मी स्त्री अनाथ, अबला, वृक्षाचा कोणत्या तुला पाला ?
एकाकीच तुझ्यास्तव राहीन करीत चिर क्लिापाला. ६१
जन्म दिला, वाढावेलें, तुजसाठीं नित्य वाहिले कष्ट,
त्या मातापितरांना स्वकरें का पाहसी करूं नष्ट ? ६२
तव वीरकुल, जयाच्या शौर्याची गाजते जगीं ख्याती,
त्याची स्वनिंद्य कृतीनें करणार जगांत काय तूं माती ? ६३
देश तुझा ज्यासाठीं वीरांनीं वाहिल्या किती माना !
तूं एक मात्र, त्याच्या, जन्मा आलास, हेतु अपमाना ! ६४
तव धर्म लघु मुखानें म्यां त्याची काय थोरवी गावी ?
तो टाकून हिरा त्वां अंधपणें गार काय ही घ्यावी ? ६५
परमेशप्राप्तीची तीच खरी सुलभ एकटी वाट,
असतिल—असोत दुसरे पंथ नसे तथ्य यापरी त्यांत. ६६
हा निंद्य मार्ग तुजला ईशापासून नेतसे दूर,
पडशिल, रडशील तुझ्या जेव्हां फांकेल दृष्टिचा धूर. ६७
होईल ईश्वराचा कोप तुझ्यावर धरून परशील,
तरशील कसा तेव्हां ? कवणाचें चरण सांग धरशील ? ६८

स्वजन त्यजून धरिले हृदयीं म्हणवून यवन जे आप्त
ते धांवतील तुज, का गमतें, पाहून संकटव्याप्त ? ६९
बुडवून तुझ्या धर्मा, तव देशाची करून रांगोळी
आले हे येथ सुखें पिकवाया नित्य आपली पोळी. ७०
तूं आयताच त्यांना नवसाला पावलास कीं देव
तद्धेतु परी पुरतां होशिल पाषाण समजुनी ठेव. ७१
तुज तुच्छतील मग ते, करितील पदे पदीं तिरस्कार
तेव्हां नको नको हें होईल जिणें तुला तुझें भार. ७२
स्वजन त्यजून धरिली परकीयांची जयें स्वयें कांस
ते परकीय तयाचा धरिती न—धरूं नयेचि विश्वास ७३
स्वजना अंतरलासच; परही होतील पारखे तुजला,
भाग तुझा मग फिरणें भूवर ढाळीत नित्य अश्रुजला. ७४
कां संकटांत पडशी ? करिशी दुःखास कासयास गडी ?
कां घालितोस कळतां, कळतां प्रक्षुब्ध सागरांत उडी ? ७५
हा चंद्रमा विलसतो निजतेजें व्योममंडळीं नील
हा कृष्ण घन जवळचा त्याला एका क्षणांत झांकील. ७६
जें अभ्र आड आलें यथावकाशें पडेल तें पार
चंद्रप्रभा पुन्हां या टाकील करून भूतला गार. ७७
त्या अवधींत तुझें जर मोहापासून या न मन ढळलें
वळलें सुविचारास न, अक्षय तव समज, विमल यश मळलें. ७८
पितरांचे, आप्तांचे, इष्टांचे भोंवतील शाप तुला
ईश्वर कोपून तुझ्या पडतील शिरीं अखंड तप्त शिला. ७९
जागा हो, जागा हो, नको नको हा करूं दुराचार
नाहीं तर दासीचा शेवटचा तुज असो नमस्कार. ८०

८

म्हणती म्हणोत कोणी, विकार गुणरूप होय अभिमान
विस्मरती ते झाली त्याजमुळें जी जगांत धुळधाण. ८१
उदधीनें भूकंपें, विद्युत्पातें अनर्थ जे घडले,
अभिमानवश नराच्या कृतींपुढें सर्व ते फिके पडले. ८२
अभिमानें वाहविले रक्ताचे या जगांत पाट किती !
गळले अश्रु तयांची करवेल सरस्वतीसही न मिती. ८३
किति संसार बुडाले, किति पडलीं नांदतीं घरें ओस;
किति मंदिरें मिळालीं धूळीला माजला असंतोष. ८४
विसरे स्वापत्य पिता; भाऊ भावावरी उठे रुष्ट
स्नेह लयाला गेला; उदयाला कलह पावला नष्ट. ८५
चुकलें कळे, उमजतें चुकणें कवणास या जगीं चुकलें.
'चुकलों' परी न म्हणती अहंपणानें सुखास ते मुकले. ८६
होती पुराणकालीं जन म्हणती, स्वर्गभूमि अविभक्त
भजती परस्पराला भावें देवास ज्यापरी भक्त. ८७
'उभयांत कोण मोठा' उद्भवला सहज वाद त्यांमाजीं
भूमि म्हणे मी मोठी; स्वर्ग वदे थोरवी असे माझी. ८८
कोणीच हार ने घे—उभयांची दृष्टि मीपणें अंध
होय कलह वादाचा—कलहानें प्रीतिचा तुटे बंध. ८९
जीं एकरूप होतीं, रोषें जाऊन दूर तीं बसलीं
फसलीं अहंपणानें; संतोषें परि न आजवर हंसलीं. ९०
स्वर्ग समर्थ बली, तें स्वगुणें वरवरच चाललें आहे
अबला भू खचत असे; परि ताठा केवढा मनीं वाहे ! ९१

जे मातापितरांचे प्राप्त अपत्यांस तेच गुण वाण
वृक्ष तसे पुष्प मिळे; कंठ जसा त्यापरी निघे तान. ९२
माता भू अभिमानी, पुत्र तिचा पुरुष तोहि अभिमानी
भू स्वर्गा अंतरली; पुरुषाचीही तशीच हो हानी. ९३
बोध प्रियकरिणीचा त्या वीराच्या मनास मानवला
तूं स्त्री मी पुरुष अशा अहंपणें तो परी न त्या लवला. ९४
'जें झालें तें झालें; आतां हा बोध होय वायफळ
वदनांतुन निघाला कवण करी ग्रहण तो पुन्हां कवळ ? ९५
धर्म नको मज तुमचा, देश नको, लोकही नकोत मला
वाटेल तर रहा वा जा तूं तव पथ नसेचि आडविला.' ९६
सहज वदून असें तो स्मितवदनें प्रियतमेकडेस बघे
तों ती गुप्त जहाली; न कळे भूमींत वा नभांत रिघे. ९७
चोळी नयन पुन्हां तो पाहे विस्मितपणें समोंवार
परि ती कोठेंचि नसे—न दिसे त्या केवढा चमत्कार ! ९८
आसन नसे तयाचें चळलें, नव्हती परिस्थिती फिरली
होते शांत पहुडले चंद्रकिरण पूर्ववत् तडागजलीं. ९९
नव्हता दुर्ग सरकला स्तंभ जसाच्या तसाच तेथ उभा.
ध्वज आपल्या पटानें होता सप्रेम पालवीत नभा. १००
आश्चर्य थोर; झाली गुप्त कशी तीच एकली रमणी
ऐसा करीत बसला खिन्नपणें तरुण तो विचार मनीं. १०१
आलें कळून त्याला हा सारा खेळ कल्पना नटली
ज्याचा ध्यास मना तो भास सदा होय गोष्ट ही पटली. १०२

## १९ *गणिकोद्धार.

साकी.

रुधिरें सिंचित पटासारखें दिसे पश्चिमाऽऽकाश
सूर्यास्तानें दिसूं लागलें भुवन उदास! उदास.! १
प्रतिनिधनास्तव अशौचदर्शक कृष्णपट दिशा ल्याली
पति प्रकाश स्त्रीचा–त्याविण काळेंच तिच्या भालीं. २
चिता धडकल्या–ज्वाळा उटती–भरे दशादिशा.धूर
कवट्या फुटती, अग्नीमाजीं होय अस्थिचा चूर. ३
घटिका ती राक्षसी–मृत्युचा, श्मशान तें, दरबार,
स्थल देण्याचें इहलोकींचा मानवास करभार. ४
उठे दीर्घ रोदन श्मशानीं त्या समयास भयाण,
निराश्रिता कवितेची जैशी उदासवाणी ताण. ५
प्रत्येक स्वन त्यांत मधुर, परि आर्त, करुणतापूर्ण,
करील ज्याचें श्रवण निश्चयें पाषाणास विदीर्ण. ६
मथुरापुरची वारयोषिता वासवदत्ता नामें,
सौंदर्यास्तव–तारुण्यास्तव जिला भजावें कामें. ७
पुराभरण, सुखवैभवशाली गणिकांची जी राणी,
सेवेस जिच्या सिद्ध संपदा जोडून सदा पाणी. ८
सहज तयावर दृष्टि जियेची पडे, धन्य तो मानी;
तिच्या मधुर भाषणीं, न तें सुख तरुणांस सुधापानीं. ९

---

* श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे बी. ए. याच्या अशोकचरित्रांतून प्रस्तुत कथानक घेतले आहे. अशोकचरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वी ही कथा कवीला माहीत नव्हती. तेव्हां या कवितेचे सर्वांशीं प्रेरक श्रीयुत आपटे हेच होत. त्याबद्दल कवि त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

जन्में गणिका, परी चंद्रिका आचरणें अकलंक;
पर पुरुषस्पर्शे न जियेचा विटाळला पर्यंक. १०
एकासच मानून देवता करी त्यावरी प्रेम,
तोच जिवाचा सखा तियेचा; ती सीता, तो राम. ११
मदनमंजिरी, भुवनसुंदरी तीच त्या स्थलीं वन्य,
धुळींत लोळत पडली होती हाय! छिन्नविछिन्न. १२
मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला,
तीच धरेवर पडली उघडी भुज घेऊन उशाला! १३
अधरस्पर्शे कपोल व्हावे रक्त, असे सुकुमार,
खावा लागे आज त्याजला धूलिकणांचा मार! १४
सेवेस जिच्या तत्पर होत्या संदनीं अगणित दासी,
एकलीच ती त्या समयाला अभागिनी वनवासी! १५
इहलोकींचें नश्वर वैभव–हा क्षणभंगुर खेळ,
जलबुद्बुद–भोंपळा भ्रमाचा फुटे न लागतां वेळ. १६
समृद्धिसागर आज असे जो दीनांचा कैवारी,
तोच उद्यां होऊन भिकारी, फिरतो दारोदारीं १७
प्रकाश झळके आज, उद्यां त्या गृहीं भरे अंधार,
हास्य विनोदस्थलीं क्षणांतच उसळे हाहाकार. १८
घालून मिठी गळां प्रियाच्या निजे जी सुखासीन,
उजाडेल दिन येता दुःखीं तिज गमलें स्वप्नीं न. १९
नाथ स्तनमंडलीं तिच्या शिर ठेवुनि निद्रामग्न,
असतां, कोणीं खड्गें केलें हृदय तयाचें भग्न. २०
विव्हळला, फोडली तयानें एक दीर्घ किंकाळी,
खडबडून त्यासरशीं शयनीं गणिका जागी झाली. २१

गळां घतला हार फुलांचा व्हावा जैसा व्याळ
चांदण्यांत मस्तकीं पडावा कीं आगीचा लोळ. २२
तशी तिची जाहली अवस्था—न सुचे तिजला हाय !
कोसळलें आकाश तिच्यावर, रडे मोकलुनि धाय. २३
कुंतल तोडी, कपाळ फोडी, करी थोर आकांत
कांतविरह तो नव्हे. गमे तिज, सर्वस्वाचा घात. २४
अंकीं घेई नाथाचें शिर, अश्रुजलें त्या न्हाणी,
फुटणें नाहीं जीव मृताला कितीं घालितां पाणी. २५
शव न द्रवलें नवल न, विरले नाहींत जयें जीव
लटकें म्हणती स्फुंदन रोदन, कवणा न तिची कीव. २६
धनलोभास्तव, म्हणती, केला हिनें प्रियाचा घात,
जिरवूं पाही दुष्ट कृत्य तें करून ही आकांत. २७
न्यायदृष्टिनें दोषी ठरली—अपराध तसा दंड,
पडे श्मशानीं होऊन स्तनयुगलनासिका खंड. २८
आप्त, इष्टजन, दास दासिगण धनानुगामी सारे,
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे. २९
बहुत परिजनावरी चालवी जी अप्रतिहत सत्ता,
एकलीच बापडी श्मशानीं पडली वासवदत्ता. ३०
भू शय्या, भुज उशी, ओढणी वातावरण उदास
स्फुंदन कालक्रमण, चितांचा प्रेतांचा सहवास. ३१
स्वभावता मन असतें स्त्रीचें पुष्पासम सुकुमार,
त्यांत जाहला असा त्यावरी दुःखाचा भांडमार. ३२
अधिकच तें अळवार जाहलें—नवस करी मरणास;
परी थरर कांपवी तयाला सहज निघाला श्वास. ३३

जन्में गणिका, परी चंद्रिका आचरणें अकलंक;
पर पुरुपस्पर्शें न जियेचा विटाळला पर्यंक. १०
एकासच मानून देवता करी त्यावरी प्रेम,
तोच जिवाचा सखा तियेचा; ती सीता, तो राम. ११
मदनमंजिरी, भुवनसुंदरी तीच त्या स्थलीं वन्य,
धुळींत लोळत पडली होती हाय ! छिन्नविछिन्न. १२
मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला,
तीच धरेवर पडली उघडी भुज घेऊन उशाला ! १३
अधरस्पर्शें कपोल व्हावे रक्त, असे सुकुमार,
खावा लागे आज त्याजला धूलिकणांचा मार ! १४
सेवेस जिच्या तत्पर होत्या संदनीं अगणित दासी,
एकलीच ती त्या समयाला अभागिनी वनवासी ! १५
इहलोकींचें नश्वर वैभव—हा क्षणभंगुर खेळ,
जलबुद्बुद—भोंपळा भ्रमाचा फुटे न लागतां वेळ. १६
समृद्धिसागर आज असे जो दीनांचा कैवारी,
तोच उद्यां होऊन भिकारी, फिरतो दारोदारीं १७
प्रकाश झळके आज, उद्यां त्या गृहीं भरे अंधार,
हास्य विनोदस्थलीं क्षणांतच उसळे हाहाकार. १८
घालून मिठी गळां प्रियाच्या निजे जी सुखासीन,
उजाडेल दिन येतां दुःखीं तिज गमलें स्वप्नीं न. १९
नाथ स्तनमंडलीं तिच्या शिर ठेवुनि निद्रामग्न,
असतां, कोणीं खड्गें केलें हृदय तयाचें भग्न. २०
विव्हळला, फोडिली तयानें एक दीर्घ किंकाळी,
खडबडून त्यासरशीं शयनीं गणिका जागी झाली. २१

गळां घतला हार फुलांचा व्हावा जैसा व्याळ
चांदण्यांत मस्तकीं पडावा कीं आगीचा लोळ.. २२
तशी तिची जाहली अवस्था—न सुचे तिजला हाय !
कोसळलें आकाश तिच्यावर, रडे मोकलुनि धाय. २३
कुंतल तोडी, कपाळ फोडी, करी थोर आकांत
कांतविरह तो नव्हे. गमे तिज, सर्वस्वाचा घात. २४
अंकीं घेई नाथाचें शिर, अश्रुजलें त्या न्हाणी,
फुटणें नाहीं जीव मृताला किती घालितां पाणी. २५
शव न द्रवलें नवल न, विरले नाहींत जयें जीव
लटकें म्हणती स्फुंदन रोदन, कवणा न तिची कींव. २६
धनलोभास्तव, म्हणती, केला हिनें प्रियाचा घात,
जिरवूं पाही दुष्ट कृत्य तें करून ही आकांत. २७
न्यायदृष्टिनें दोषी ठरली—अपराध तसा दंड,
पडे श्मशानीं होऊन स्तनयुगलनासिका खंड. २८
आप्त, इष्टजन, दास दासिगण धनानुगामी सारे,
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे. २९
बहुत परिजनावरी चालवी जी अप्रतिहत सत्ता,
एकलीच बापडी श्मशानीं पडली वासवदत्ता. ३०
भू शय्या, भुज उशी, ओढणी वातावरण उदास
स्फुंदन कालक्रमण, चितांचा प्रेतांचा सहवास. ३१
स्वभावता मन असतें स्त्रीचें पुष्पासम सुकुमार,
त्यांत जाहला असा त्यावरी दुःखाचा भांडमार. ३२
अधिकच तें अळवार जाहलें—नवस करी मरणास;
परी थरर कांपवी तयाला सहज निघाला श्वास. ३३

जंबूक हुकी करिती प्रेतें स्वच्छंदें उकरीत
घूत्कारें दशदिशा घुमविती विक्राळ दिवाभीत. ३४
पाचोळा तरुतळीं सळसळे गमनानें उरगांचे
झंझावातें अग्नि चितांचा करी गर्जना, नाचे. ३५
नाद भयंकर असे श्मशानीं कांपवितील भयाला !
कां न त्यामुळें सुकून जावी दुःखी अबला बाला ? ३६
वाटे प्रेतें गर्जत आलीं करावयाला ग्रास.
कोरड पडली, धडकी भरली, गुंतत चाले श्वास. ३७
चिंतावें त्यापरी कल्पना पुढें आणिते चित्र.
साच पातलें जवळ, वाटलें तिजला, भूत विचित्र. ३८
जीव नकोसा झाला, तरि तो त्यागवे न कोणाही,
चिटली जीवा मरणभयानें रडली धायींधायीं, ३९
पिशाच दृष्टी–आड करायां घट्ट मिटी नयनांतें,
तळहातें झांकिलें; चिन्ह तरि अदृश्य होई ना तें. ४०
" हाय संकटीं पडलें बुडतें मरतें देवा ! तारीं,
कोण तुझ्याविण जगीं दयाळा ! दीनांचा कैवारी ? ४१
निरपराध मी ठावें तुजला कण्हतें मरणद्वारीं,
घात पातकी करून उलटा विहरे सौख्यागारीं ! ४२
न्यायमूर्ति तूं स्वतां म्हणविसी सत्याचा अभिमानी
तव राज्यीं खल हसती; न खळे सज्जन नयनीं पाणी. ४३
कशी अशानें चालेल जगीं तुवां लाविली रीत ?
सत्याची गत व्हावी कैशी ? कशी टिकावी नीत ? ४४
निरपराध मी मरतें–मेले–किती पुढें मरतील !
कसा भरंवसा मग अस्तित्वीं तुझ्या लोक धरितील ? " ४५

निखंदून यापरी प्रभूला, बघे नेत्र उघडून—
चिन्ह जसेंच्या तसें दिसे तें बसलें जणूं अडून ! ४६
भूत म्हणावें तरी करीना माझा हें कां अंत ?
अंत कोठवर बघे असेलच अवतरला भगवंत ? ४७
"आला समजूं पिशाच आपण घडी भराया माझी ?
दीनेस्तव कीं प्रकट जाहला करुणाघन देवाजी ?" ४८
"मजकरवीं भूतपदापुरता घडला न दुराचार.
लालसा, परी देवपणाचा पतितास न अधिकार. ४९
सामान्य कुलीं जन्म पावलों मी मानव उपगुप्त.
संसाराच्या घोर वादळीं नसतों परी सुप्त. ५०
बुद्धगुरूच्या कृपाप्रसादें झालों गणिक, जागा
जगावेगळी, कळलें, जीवां असे मिळविणें जागा. ५१
उदर पुढें हें परी लागलें आहे सकलापाठीं
जुलमी राजा असह्य, त्याहुनि उदररीति उरफाटी ! ५२
अनयशील नृप करें आकळी मात्र जन व्यवहारी.
विरक्त योग्यांवरही सत्ता उदर करी कांतारीं ! ५३
मी पामर मग उघडच आहें पात्र उदरकरभारा;
माजवून ठेविला नसे परि मीं त्याचा देव्हारा. ५४
यास्तव मजला कधीं करावा लागे ना अपहार.
कामाचा तो काय. मिळविला कपटानें जो हार. ५५
वणिग् वृत्तिनें उपजीवन मम, परि न आचरण खोटें
दीनांस पदीं तुडवून नको मजला होणें मोठें. ५६
मिळेल त्यावर तुष्ट राहतों विलीन भगवन्नामीं
पडेल अंतीं तेंच, न ऐहिक धनदौलत, मज कामीं. ५७

स्मरत असेल, तुवां दर्शविली मम भेटीची आस
क्षमा करावी, केलें तुज मी त्या समयास निराश. ५८
श्वानासम तुजपुढें नाचले जन विभवीं असतील.
मी न त्यांतला; गणिके ! संकटसेवा हें मम शील. ५९
आलों आतां; सेवेस तुझ्या सादर केला काय.
संकोच त्यज; सांग करावी तुझी चाकरी काय." ६०
"गोड बोल हे त्या समयीं मीं धरिले असते माथीं.
मरणानंतर अधरीं धरिली व्यर्थ सुधेची वाटी. ६१
खिडकींत उभी असतां पाहत निज रमणाची वाट
मदनमनोरम मूर्ति आपली आली दृष्टिपथांत. ६२
मंद मंद टाकीत पाउलें होतां मार्गीं जात.
रोंवीत जणूं ध्वज मदनाचे तरुणींच्या हृदयांत. ६३
जलौघ वाहे सभोंवतीचा काय वनश्री त्यास ?
तशी दृष्टि आपली न पाहे तरुणभृकुटिविलास. ६४
अक्ष अचल राहूनि फिरवितो चक्रास सभोंवार;
स्वतां न ढळतां तसें झुरविलें मी बहुतां साचार. ६५
दृष्टीं पडतां रूप आपलें हरला तो अभिमान.
शरण रिघालें हृदय; आपणांपुढें वांकली मान. ६६
वरून मीं फेंकिलें कराया खूण पुष्प आरक्त,
पुष्प नव्हे तें प्रणयलेख तो वा हृदयच अनुरक्त. ६७
न कळत गमतें, पडे आपला पुष्पावर त्या पाय,
हाय ! केवढा तेणें बसला मम हृदयावर घाय. ६८
हृदय तळमळे तरी न माझी दृष्टि आपणां सोडी,
गेलां. झालां आड. तिला तरि त्याच दिशेची गोडी. ६९

अशनीं, शयनीं मज दिनरजनीं आपला निदिध्यास
अखंड चिंतन, घडेल कैसा मला सुखद सहवास. ७०
लज्जा हरली. भीति निमाली. झालें अगदीं धीट.
मदन काय करविणार नाहीं स्त्रीकरवीं विपरीत ? ७१
पुष्पहार धाडून वाहिलें आपणांस बहुमानें.
आपण अव्हेरिलें; हिरकणी त्याजिली अज्ञानानें. ७२
आली चालून घरा लक्ष्मी दिधली तिजला पाठ
परत फिरविलें स्वयें अंगणीं आलें अमृत वहात. ७३
येतां जर त्या समयीं नव्हती आपल्या सुखा जोड.
प्रीतिबलानें केली असती भू स्वर्गाहुनि गोड. ७४
तारुण्याचा भर मम अंगीं; ओसंडे लावण्य.
सहवासीं मम तुच्छ वाटते विषय आपणां अन्य. ७५
अनुरक्तस्त्रीसहवासीं सुख न तें सुरेशपदांत
विश्वामित्रें व्यर्थ मारिली काय तपाला लाथ ? ७६
नव्हती सदनीं द्रव्यसंपदासुखास कांहीं वाण.
आपणांस पुष्पांत ठेविलें मानून स्वप्राण. ७७
उरलें आतां काय ? जाहली ऐश्वर्याची होळी.
आशाप्रेत धरून उराशीं अश्रु येथ मी ढाळीं. ७८
क्षणोक्षणीं वाटते विझाया आयुर्दीपक लागे.
यमपाश गळां पडले. निर्दय दूत लागले मागें." ७९
"म्हणून आलों आतां गणिके, तुजला साह्य कराया.
अज्ञानाच्या पंकीं रुतली धेनू उद्धाराया. ८०
हेतु तुझा, प्याला विषयाचा लावावा मम ओठीं
परि तुज कळलें नाहीं यौवन—रूप—संपदा खोटी. ८१

पडलों असतों तेव्हां जर मी तुझ्या मोहपाशांत
येतां कोण तुला दावाया या अंधारीं वाट? ८२
तूं पतिता मी पतित जाहलों असतों तव संगानें.
बसतें कंठीं अढळ भवाचें माझ्याही रडगाणें. ८३
दृढ करपाशीं धरिलें ज्यांना गणिके त्वां हृदयाशीं,
जिवलग ते तव आहेत कुठें? कवण आज तुजपाशीं? ८४
यौवन चंचल, चंचल जैसा असतो संध्याराग
कसा टिकावा चांचल्यावर केलेला अनुराग? ८५
विकसितकलिकारस चाखाया होय अलींची दाटी.
कोमजतां ती परी विचारी एकही न तिज साथी. ८६
सुंदरपणही भ्रम नयनाचा; मूढ समज हृदयाची!
देशोदेशीं भिन्न कल्पना प्रचरे सौंदर्याची ८७
परि समज सामान्य—हसतमुख; विशाल काळे डोळे
सप्रमाण रचिले मांसाचे अस्थिपंजरीं गोळे. ८८
आच्छादन त्यावरती केलें चर्म गौर सुकुमार;
अधरीं लाली, गुलाब गालीं, शिरीं कृष्ण कचभार. ८९
परिसीमा ही लावण्याची; तया भुलावें काय?
साच मृत्तिकापिंड म्हणविला कोमल सुंदर काय! ९०
गर्भी नरकीं काल कंठिला अज्ञानें नवमास.
दुजा नरक आदरिती ज्ञानी बघून गोंडस मांस! ९१
अमृत नांव देऊन सेविती अधरीं भरली लाला.
रीत जगाची "सोन्या" म्हणणें प्रिय विद्रूप मुलाला! ९२
आणि संपदा काय? वेसवा फिरणारी बाजारीं!
बऱ्या त्या तरी; नसती इतुक्या मूढ, अंध अविचारी. ९३

त्यांतही निधे वसंतसेना गुणलुब्धा एकादी.
परी संपदा मूर्ख. दुर्गुणी जनां मात्र आराधी. ९४
परवा न तिची ज्यांस, उधळिती जे तिजला लाथांनीं,
त्यावर ही चामरें ढाळिते गात यशाचीं गाणीं. ९५
आपली जिला समजून मनीं राहिलीस तूं धुंद
कामीं आली काय शेवटीं ती तुजला स्वच्छंद! ९६
यौवन सरलें. स्वरूप विरलें. दिला धनानें गोता.
पडून मोहीं ज्यांच्या झाला तुझा सर्वथा तोटा. ९७
विसरलीस गणिके! शाश्वत तूं भुलुनी अशाश्वताला.
फेकून सुधा वदनीं धरिला भ्रमें विषाचा प्याला[1]. ९८
गेलें जावो; उरलें थोडें आयु सार्थकीं लाव
स्मर करुणेश्वर; तोच स्वपदीं देईल तुला ठाव. ९९
दुर्विकारविष हृदयीं भरलें अश्रुमिषें तें काढी.
सुविचाराची आतां घालीं हृदया दृढतर आढी. १००
पश्चात्ताप पापें जळतां; निर्मल होय स्वांत.
सहज मिळे फल त्याचें सद्गति पतितांतें निभ्रांत." १०१
उपदेशें ज्या वदतां ज्ञाते झाला गणिकोद्धार,
सादर केलें त्याचें रसिका गोड गमो हें सार. १०२

---

१ हा दाखला देतांना कांहीं कालातिक्रम पडला असल्यास रसिक क्षमा करोत.

## २० वीरमती.

**कथासूत्र**—औरंगजेबाचा प्रसिद्ध मांडलिक जोधपूरचा राणा जसवंतसिंग हा एकदां समरास पाठ दाखवून माघारा फिरला. क्षात्रव्रीदास कलंक लावणारें त्याचें तें कृत्य अर्थातच त्याच्या मानी स्त्रीस खपलें नाहीं. तिनें त्याबद्दल त्याचा मोठा धिक्कार केला. त्याचें वर्णन या कवितेंत, खपेल तेवढीच पदरची भर घालून, केलें आहे. अशा प्रसिद्ध वीरस्त्रीच्या नांवाबद्दल इतिहास मुग्ध आहे, हें मोठें नवल होय. "रूपनगरची राजकन्या" या कादंबरींत ती चंपावती या नांवानें झळकते. वीरबाला या गुजराथी नाटकांत ती महादेवी होऊन आली आहे. असा मोठा मतभेद दिसतो. या कवितेंत तिला तिसरेंच नांव दिलें आहे. पण तें तिच्या स्वभावाचें द्योतक, अर्थात विशेष अन्वर्थक होईलसें वाटतें.

### आर्या. (गीती.)

१

त्या रात्रीं जसवंता घडलें इच्छा नसून जागरण,
निद्रा न ये तयाला मिटून धरिले जरी तयें नयन. १
मोहून बाह्यरूपा राजश्री आणिली गृहीं ज्यानें,
साच तयें हृत्प्रांतीं चिंतेचें अढळ वसविलें ठाणें. २
राजमुकुट कनकाचा त्यावरती जडविले अमोल हिरे;
परि आंत कंटकांनीं खचिला जे पाडिती शिरास घरे ३
चंड किरण मार्तंडासम ज्याचे हालवी जगा सकल,
तो राजदंड काल व्याल, स्वरदें करी नृपा विकल. ४
सिंहासन भूपाचें मृदुल परांचें असें दुरून दिसे,
त्यावर बसे फसे तो, युक्त विषें झोंबती तयास कुसे. ५
परि या न उपाधींनीं विन्मुख निद्रेस जाहला नृपती,
सुख होय आंगवळणीं पडलेलें दुःख जाणते जगती. ६

होती नवीच त्याच्या हृदयाला आज काळजी जडली,
चिंता वैरीण तिची सान्निध पाहून झोंप अवघडली. ७
निद्रेचीं उपकरणें होतीं जोडून हात सिद्ध तिथें
परि तीं निष्फल ठरलीं. चिंतामग्नास सौख्यही रुततें. ८
चंद्रकरें न्हालेल्या गच्चीवर उंच मंचकीं शयनीं,
भूपाजवळ पहुडली होती सर्वांगसुंदरा रमणी. ९
वर मंडप वेलींचा, वायूची डोलवी जया लहरी,
शय्येवरी फुलांची वृष्टि करी; गंध दशदिशा पसरी. १०
रजनी षण्मासाची ऱ्हस्वच कोणासही तदा गमती,
परि दुर्दैव, पळेंही जसवंता भावलीं युगासम तीं. ११
शयनावरी तळमळे, फिरवी कर मस्तकावरी डावा,
ढाल करून कराची चिंतच्या चुकवितो जणूं घावां. १२
उजवा हात तयाचा स्वस्त्रीच्या आडला उशाखालीं,
न तरी त्यानेंही तो शिर निज आच्छादिता तया कालीं. १३
परि झोंपमोड तीची विचार सहवे न त्यास हा नुसता,
हातच काय, तयानें तिजकरितां प्राण खर्चिला असता. १४
प्राणप्रिय दयितेला त्या अंतरणार आज तो होता,
त्याच विचारें त्याच्या हृदयाला पीळ चढविला मोठा. १५
शतदां अतृप्त नयनीं असेल बसला तिला न्यहाळीत,
परि तिजकडे वळाया आज बहुत होय तो भयाभीत ! १६
ती रात्र कांठिता तो पडून अवघडत मंचकीं तैसे
परि नाद दुंदुभीचा हृदयीं वज्रप्रहारसा बैसे. १७
युक्ति करून तयानें सोडविला, हात गुंतला, अधर;
तों नखशिखान्त दिसली निजदयितामूर्ति त्यास रम्यतर, १८

कुंतललकारमंडित भालावर धर्मबिंदु चमचमती,
इंदुकरें रंगविले सर मोत्यांचेच गुंफिले गमती. १९
झालें अंकित सावज; यास्तव जणुं मदन पारधी स्वकरीं,
तूणीर नयन झांकी, भ्रूधनुशीं स्वगुण चढविला उतरी. २०
श्वास सुगंधित वाहे. धर्म उठे रंजित स्मितें गालीं,
ताजी गुलाबकलिका, विलसे ती, दहिंवरें जशी न्हाली, २१
पवनें पदर सरकला, प्रकट तिचा होय रम्य हृत्प्रांत,
दर्शनें करील ज्याचें योग्याचेंही मनास विभ्रांत. २२
टक तिजकडेस लावी; न तयाचा पापणी ढळे–हाले,
भूपास तोडवेना मोहानें दाट पसरिलें जाळें. २३
निजला, उठून बसला, हसला, रडला, पुनः पुन्हा नृपती
आंदोलीं मन पडलें करवी देहाकडून तीच कृती. २४

२

“ राज्य कशाला व्हावें ज्यासाठीं माजती जगांत रणें,
करणें दूर प्रियजन, झुरून विरहांत शेवटीं मरणें ? २५
येतों गरिबा–पोटीं जावें का आज लागतें समरीं
वरितों उटजीं स्त्रीसह सुख, अनुभविलें नसेल जें अमरीं.” २६
केला खेद असा तरि नव्हतें जाणें तयास चुकणार,
यास्तव तेणें केला निघावयाचा मनांत निर्धार. २७
दृढ एकदा धरावी स्वसखीला आवळून हृदयाशीं,
एकच चुंबन घ्यावें म्हणून तो लगटला तिच्यापाशीं. २८
कंठांत मिठी घाली; अधरामृतपान तो करूं लागे,
किति वेळ असा गेला, त्याची न तथापि ती तृषा भागे. २९

कर चंद्रें आंखडिले, रजनीरमणीस लोटिलें दूर;
भरला उतरे न परी मोहाचा भूपलोचनीं धूर. ३०
दुंदुभिरवें उठविली सारी सेना जमे ध्वजाजवळी,
परि भूप बाहुपाशीं प्रियदयितेला पुनः पुन्हा कवळी ! ३१

३

जागी झाली शयनीं; सस्मित वदनें परि न वीरमती.
प्रतिदान पतिकृतीचें करावया विषयलीन वा स्वमती. ३२
लोचन धुंद जहाले, विषयभरानें नव्हे, प्रबल रागें,
आली लाली गालीं चढूनियां रक्त वर, न अनुरागें. ३३
नव्हते खंडित व्हाया स्फुरत अधर, मर्मभेदनास परी
न थंड हृदय जुळाया; द्वेषाच्या त्यांत उमळती लहरी. ३४
नव्हता अप्रिय तिजला कांतसमागम तथापि ती वेळ
योग्य नसे प्रेमाचे ते खेळायास लाडके खेळ. ३५

४

क्षत्रियधर्म—निघावें समरा सांडून वाढलें ताट,
अव्हेरून प्रेमें वा स्त्रीनें घातला गळां हात. ३६
त्यास स्वपति विसरला; पित्त तिचें फार भडकलें तेणें;
तें क्षात्रतेज उज्ज्वल गृहधनरतिसुख रणापुढें नेणें. ३७
“ गेलां असाल समरा रात्रीं समजून शांत मी निजलें;
थिजलें बघून तुम्हा उजाडतां विषयसेवना सजलें. ३८
स्त्रीसह पडून शयनीं, अंकीं घेऊन वा मुलें तान्हीं,
नृपपद काय मिळविलें तुमच्या प्रिय, पूज्य, शूर पितरांनीं ? ३९
मृत्युमुखीं विचरावें, रगडावे बाण संगरीं दांतीं,
तलवारीचें पाणी प्यावें ये राज्य तेधवां हातीं. ४०

जें आयतें मिळालें त्याचा करवे न काय सांभाळ ?
संसार मग कशाला ? बरवी घ्यावी करांत जपमाळ. ४१
कैसे विलास सुचती शत्रूंनीं देश वेढितां सारा ?
काय दिसे न तुम्हास्तव रिपुंनीं उघडून ठेविली कारा ? ४२
रणदेवी सुयशाची अर्पण वीरांस ज्या करी कंठी,
आम्ही क्षत्रियबाला मिठी तयांच्याच घालितों कंठीं. ४३
जा समरीं, फडकूं द्या स्वयशाचा अरिवरी जरीपटका;
जन्मांत न ये कोणा ही सोन्याची पुनःपुन्हां घटका., ४४
तुमच्या जर रणगमना मी दुर्भाग्या असेन आडथळा
पडतें मरून चरणीं, करून देतें तुम्हास मार्ग खुला." ४५

५

यापरि निखंदिला नृप गेला सहकटक संगरीं तडक.
परि मन घरींच ठेवी जरि॰दयिताशब्द झोंबले कडक. ४६
केली समरीं त्यानें लगट परी सर्व होय वायफळ
मन विरहित कायेचे कष्ट वृथा, पावतील काय फळ ? ४७
बल त्याचें बहु खचलें. उरलें दल लागलें पळायाला
आला भूपावरही काळाचा उघड तेधवां घाला. ४८
येतां मरण कशाची दिसते रमणी करी विचार मनीं;
मुख अपयशें मळालें घेऊन निघे घरास वीरमणी. ४९

६

पतिरणविन्मुखतेची दुर्वार्ता आयकून वीरमती
रागेजे; त्याविषयीं होय तिची तेधवां विपण्ण मती. ५०
मान्य न वीरमतीला अयशाचें मळमळीत सौभाग्य
येतें वैधव्य यशें तिज गमतें साच उघडिलें भाग्य. ५१

करिती गजर जयाचा, जर नाथ तिचा रणीं लढत मरता
परि तापद होय तिला वार्ता जीवंत तो फिरे परता. ५२
समरास पुरुष भ्याला सत्य तयें स्वयश मळविलें धवल
मुख झालें तें काळें दूर वरें; अशुभ मज नको जवळ. ५३
चिंतून मनीं ऐसें शीघ्र तिनें बंद करविली वेस
पाठविला जसवंता दूताकरवीं सखेद संदेश. ५४

७

"नृपवंश उदेपुरचा सूर्योद्भव गाजते जगीं ख्याती
ध्याती तयास सारे. तद्यश कवनीं घरोघरीं गाती. ५५
वीर पराक्रमशाली किती उदेले तयांत आजवरी,
गणती करवे कोणा ? कवण तयांचा रणांत हात धरी ? ५६
समरव्रत जागविलें घेऊन शिरें करांत आमरण
कर्तव्य वाटलें त्या वीरां कुलकीर्तिरक्षणीं मरण. ५७

८

गोष्ट असो पुरुषांची, समराचें सहज त्यांजला कृत्य.
त्यासाठीं त्या घडिलें, दिधलें तैसेंच त्यांस सामर्थ्य. ५८
परि तनु कोमल ज्यांची जातिलतेवर जसें हसें सुमन
सुमन प्रेमल ज्यांचें लव ताप सहावया असे क्षम न. ५९
शौर्य रणीं गाजविलें ऐशा सुकुमार सदय अबलांनीं
पुरुषां स्फुरण चढविलें स्वकुलाची राखिली जगीं बाणी. ६०

९

त्या वीरकुलीं वीरोत्पन्ना मी नम्र आपुली दासी
प्रेमें वीरांबेनें मज वाढविलें धरून हृदयाशीं. ६१

खेळ धनुर्बाणाचे शिकवी मज वीर बंधुची जोडी
साहस पराक्रमाची बालपणीं लागली मला गोडी. ६२
वीरपती मिळवावा होता निर्धार हा मनीं केला
प्रेमें तुम्हांस वरितां तो पण सिद्धीस वाटलें गेला. ६३
हर ! हर ! परि मी फसलें—ढासळलें सर्व मम मनोराज्य
धरिला गुलाबभावें निज हृदयीं कर्णिकार मी त्याज्य. ६४
वीर म्हणून जयाच्या अंकीं निर्धास्त झोंप मीं घ्यावी
वीर नव्हे, पुरुष नव्हे, जो दुर्बल भीरुता रणीं दावी. ६५
अबलाच ती म्हणावी; पुरुषाचा मात्र घेतला साज
ओष्ठीं का मिरवावी मिशी ? तिची राखवे न जर लाज. ६६
जन्मून वृथा जगतीं धरणीला मात्र जाहला भार
स्वकरीं धरून निष्फल विटाळली विजयपात्र तलवार. ६७
काय जिणें जर न घडे करणी तुकवी जियेस जग मान
तो वांचला म्हणावा ज्या देती सान थोर जन मान. ६८
अपमानाचें जीवित ! मरण बरें फार फार त्याहून
मान नव्हे प्राण तुम्हीं आलां समरांत आज वाहून. ६९
प्राण प्राणास रुचे; दिसतें बाह्य स्वरूप आवडतें
जातां प्राण; न तेसें होय न का रम्य रूप आवडतें ? ७०
विगतप्राणशरीर प्रेतच ! का आणितां घरां सांगा
प्रियकर शवही अशुभच गृहीं; स्मशानींच त्याजला जागा. ७१

१०.

नव्हतें तुम्हास; परि मी तुमच्या क्षात्रव्रताप्रती वरिलें
जगलां तुम्ही, परी मम सौभाग्य तया व्रतासवें सरलें. ७२

झालें विगतधवा मी; सहगमनच योग्य जी सती तिजला
त्या दुर्लभ पुण्याची करावया जोड जीव हा सजला. ७३
नेलें शव स्मशानीं जीवंत उठे कधीं कधीं म्हणती
गणती पिशाच परि तें, त्याचे जिवलगहि त्यास अवगणती. ७४
विगतक्षात्रव्रत तनु तुमची निर्जीव त्यापरी उठली
डोळांही न पहावी; तिज मग सहगमनपात्रता कुठली! ७५
पतिशव न मिळे तेव्हां स्वपतीची करविती सती प्रतिमा
सेव्य धनुर्बाण मला जी साची क्षत्रियव्रतप्रतिमा." ७६

११

संदेश मर्मभेदी हा, न बसे, पाठवून ती नुसती
क्षात्रव्रतास साजे ऐसी सहगमनासिद्ध होय सती. ७७
कवच तनूवर घाली; चढवी निजमस्तकीं शिरस्त्राण
क्षत्रियशीलप्रतिमा, दृढ हृदयाशीं धरी, धनुर्बाण. ७८
योग्यच शरधनुषासह सहगमना सिद्ध होय वीरसती
कीं शरधनुषाठायीं वीरांचे मूर्तिमंत गुण वसती. ७९
ठेवून पुढें छाती धनुष सदा काढितें रणीं वाट,
गुण भंगला न तोंवरि दावी न रिपूस तें कधीं पाठ. ८०
जीवांत जीव आहे तोंवर तें केवढा धरी ताठा,
जो स्वाभिमान उज्ज्वल सुगुणांचा मानिला जगीं सांठा. ८१
अभिमान ज्या स्वतांचा नाहीं, जो वांकवी भयें मान
कुलदेशधर्म यांचा राखील जगांत काय तो मान! ८२
करिती परस्परांची नित्य धनुर्बाण संकटीं साथ
जे निज संघबलानें शत्रूची फोडती फळी दाट. ८३

सरल गमन सरलाचें, तिळहि नसे वांकडेपणा बाणीं
ढळवी न एकदां जी जडली एकाग्रदृष्टि संधानीं. ८४

जें अल्प सैन्य होतें नगरीं घेऊन संगतीं सर्व
धारातीर्थास निघे ती साधाया जणों महापर्व. ८५

मूर्तिमती वीरश्री जयघोष करीत चालली वाटे
कीं चपला गगनींची स्त्रीवेषें चमकली जगीं वाटे. ८६

कीं प्रलय निवाराया माजविला या जगांत जो असुरीं
वीरमतीच्या रूपें अवतरली आदिशक्ति ही दुसरी. ८७

ज्याचा स्वभावगुण जो नाहीं तो अधिक त्याजला साजे
प्रौढाच्या वचनांत न, सुभाषितीं माधुरी मुलाच्या जे ८८

सौंदर्य यौवनानें शोभे, खुलवी तयास नरवेष,
आणी विशेष शोभा देहीं जो फडकला रणावेश. ८९

स्फुरते अचेतनाचे, तें वीरा रूप पाहतां, बाहू
सेना तिची कशी मग न म्हणेल प्राणसंगरीं वाहूं ? ९०

परि केवा काय तिचा, शत्रुदलाचा अफाट विस्तार,
कामा न ये गजाला बद्ध कराया मृणाल सुकुमार. ९१

सिंहीण उडी घाली मत्त गजावर घरी न भीति मनीं,
तैसी अल्प दलासह ती खलबलसागरीं पडे रमणी. ९२

नव्हते शत्रु असावध; घेरा तिजभोंवती दिला त्यांनीं,
जैसा कळप वृकांचा हरिणीला एकल्या धरी रानीं. ९३

करिते बद्ध तिला रिपु; अथवा समरीं तिचा बळी पडतां,
परि सांवरून घरितो परमेश्वर पक्ष आपला पडता. ९४

१२

व्याघ्र व्यथित जहाला मर्मावर बाण लागतां उलटे,
धांवे शरानुरोधें मागाया मर्मभेदकास झटे. ९५
स्त्रीसंदेशशरानें जसवंताच्या मना घरे पडले,
मंदावलें असे जें वीर्य, नवें तेज त्याजला चढलें. ९६
स्वस्त्री समरीं गेली घेऊन स्वशिर आज तळ-हातीं,
मग काय जगीं उरलें? वांचायाचें वृथा कुणासाठीं? ९७
समरपरित्यागानें धवलतरा कीर्ति जाहली काळी,
प्रेम स्त्रीसह; गेलें उदासता राजवैभवा आली. ९८
उद्वेगून असा तो क्रुद्ध व्याघ्रापरी अरींत शिरे.
वाताहत त्यांस करी खड्गें उडवुनि नभीं असंख्य शिरें. ९९
शौर्यें समजविली स्त्री होती तद्वीरुतेस जी विटली
नटली विजयश्रीनें, हृदयींची तेधवां गुढी सुटली. १००

१३

अनुभव, जेत जिताचें युक्तिबलें क्षात्रतेज मालवती
निःस्वत्व जे तयाचीं सहजच जेतापुढें शिरें लवती. १
आलें न रजपुतांनें परि यवनां सर्व हरवितां पाणी
कारण वीरमतीसम असती जागृत गृहीं स्त्रिया मानी. २

# २१. मोहानंतर.

( **कथासूत्र**:—कर्तव्यपालन म्हणजे खडतर तपाचरणच होय. दोघांच्याहि शेवटीं दिव्यप्राप्ति असते हें खरें आहे. परंतु तें मिळवावयास " भयंकर दिव्य "च करावें लागतें, महत्कार्यें ज्यांनीं शेवटास नेलीं, त्यांना कसकशा अडचणी येत गेल्या हे सर्वांस—कोणास " आपबिती " वरून, तर कोणास " परबिती " वरून—माहीत आहे. ज्यांचा मनोनिग्रह मोठा, ते त्या अडचणींतून पार पडतात; आणि कमी बलाचे असतात, ते कच खातात. तथापि वर्तनक्रम सारखाच चिंतनीय व बोधप्रद होय. आणि म्हणूनच पुराणांत शुकाचा मनाजय आणि विश्वामित्राचा तपोभंग यांना सारखेंच महत्त्व दिलेलें आढळतें. युद्धास जातांना सुधन्वा स्त्रीच्या मोहापाशांत सांपडून कर्तव्यास कसा चुकला, याचें वर्णन या आख्यानांत आहे. कथा " पुराणी " आहे; ती " शेले " च्या उक्तीप्रमाणें नव्या आनंदानें ) To sing old songs with new delight गाइली आहे इतकेंच. )

साक्या.

१

" हाय ! करावें काय, सुचेना प्रमाद घडला थोर,
कळतां कळतां उडी घातली, आज संकटीं घोर. १
आमिषांतला गळ समजेना, म्हणून मरतो मासा,
मात्र धान्यकण पाहुनि भुलले, आडकती खग फासा. २
झेंप दिव्यावर घालून पडे पतंग मरणापाशीं,
त्यापूर्वीं त्या ज्योत वाटते केवळ तेजोराशी. ३
फसतात—फसायाचे प्राणी ज्ञानविचारविहीन,
ज्ञानी म्हणवून जगीं फसती मानव तदधिक हीन ! ४
जाळायाचें ज्ञान काय तें, पडें न जें उपयोगीं ?
धड कांस्यावर घालून बळें, मनुज यातना भोगी ! ५

२

अचिंत्य करणी भगवंताची, अगम्य सारा खेळ
स्वधारणेवर जो तो बसवी विधिघटनेचा मेळ! ६
सुंदर धरणी, सुंदर गगनीं सुंदर सुंदर तारे,
सुंदर पुष्पें फुलती; भ्रमती सुगंध वाहून वारे. ७
बागडति मृग सुंदर; पक्षी गाती मधुर रवानें,
शेतें पिकलीं, वृक्षलतांनीं दिसती हिरवीं रानें. ८
पृथ्वीपोटीं मुक्ता, रत्नें सिंधुजलामाझारीं,
कोणासाठीं करी सिद्धता परमेश्वर ही सारी? ९
कुणा कळेना परमेशाचें हृदय तयांसच ठावें,
परी वाटतें मनुजासाठीं केलें सर्व असावें. १०
गगन खगांस्तव, विपिन मृगास्तव, अब्धि जलचरांसाठीं,
दिसे निर्मिला; परि सकलांचें नियमन मनुजा-हातीं. ११
विहंगमाची जाईलहि नभ—मर्यादेवर धांव,
जलचरांस लागेल कदाचित हा सिंधूचा ठाव. १२
अगाध सागर, अफाट नभ जो परी करी निर्माण,
त्या ईशाचा मार्ग जाणतो मानव मात्र सुजाण. १३

३

उतरुन आलों जगीं, परि असे स्वर्गांत चढायाचें,
अनुभव, उतरण सोपी, तितुकी चढण चढाया जाचे. १४
संचित सरतां प्राणी दिव्य स्वर्गसौख्य अंतरतो;
स्वर्गपात्रता संपादाया भूमावर अवतरतो. १५
हेतु जिण्याचा विसरवितें, परि जगांत भरली माया,
संसाराचे खेळ तेच ते लाववितें खेळाया! १६

भोगविलासस्थल जग नोहे, परी कठोर कसोटी,
तरला तोच, भवाची जाणे जो सुंदरता खोटी. १७
खालीं सुंदर पुष्पें, तारे तेजस्वी आकाशीं;
फुलें घडीचीं, परी तारका अक्षय तेजोराशी. १८
अधोदृष्टि जो, वरचा त्याला अदृश्य होय पसारा,
क्षणिक फुलाला भुलला, न तया दिसती अक्षय तारा. १९
स्वर्गपथावर कनककामिनी विघ्नदेवता सिद्ध,
पडला नाहीं त्याच्या मोहीं तोच जाहला सिद्ध. २०
राजपुत्र मी मज कनकाचा नाहीं लोभ, नसावा—
काय करावें, परी साधिला स्त्रीनें समरीं दावा. २१

४

काय उणें त्या, परमेशानें धरिलें ज्यांना हातीं !
सुवर्णता पावते प्रभूच्या कृपाप्रसादें माती. २२
बलाढ्य कौरव हरले समरीं देवद्वेष करून
विलीन पांडव विजय पावले कृष्णपदांस चुरून. २३
झाला ज्यांचा श्रीपरमात्मा कृष्ण सखा कैवारी,
कां न सजावें त्यांनीं जगती जिंकायातें सारी ! २४
अश्व सोडिला; संगें दिधली विजयशालिनी सेना
नर नारायण सेनानी, ज्या जगतीं जोड दिसेना. २५
गर्विष्ठांचीं नमवीत शिरें, करीत वक्रां नीट,
श्यामकर्ण तो अश्व आमच्या आला नगरा धीट. २६
प्रतापशाली पार्थ, तयाचा श्रीकृष्ण सखा पाठीं;
कसें धजावें रणांगणावर घ्याया त्यांची गाठीं ! २७

क्षात्रधर्महि नव्हे अरिपुढें तृण दातांत धरावें,
परि बाहुबलें मारून दहा, मग समरांत मरावें. २८
मिळवायाचा नाहीं, न मिळो जय, तो हेतु नसावा
समरनिमित्तें परी भुकेल्या नयनां कृष्ण दिसावा. २९
जगन्नाटकीं दिधली देवें भूमिका तया दावूं,
पडोन समरीं चरणीं त्याच्या देह सार्थकीं लावूं. ३०
करून ऐसा सुविचार मनीं, हय बांधविला द्वारीं;
मदीय जनकानें युद्धाची केली शीघ्र तयारी. ३१
शिंग फुंकिलें; ध्वजा रोंविली; पुरीं फिरविली द्वाही
धारातीर्थीं सज्ज असावें सान थोर पौरांहीं. ३२
अनाहूत सुप्रसंग आला न तया जन जो साधी
सुतसतैलकटाहीं त्याची पडेल आहुति आधीं. ३३

५

प्रभुपददर्शन लाहूं—दावूं त्या दो हात करून
धरून ऐसी हूप निघालों मी सावेश धरून. ३४
चरणवंदना गेलों असतां वदली मजला माता,
“ तूंच मुला आम्हां वृद्धपणीं जगतीं कांठी आतां, ३५
आशा नुरली; पूर्ण तृप्तता ये जीवितरसपानें
गळावयाची वाट पहातों आम्हीं पिकलीं पानें ! ३६
रोंप लाविलें; वाढविलें तें घालून करीं पाणी;
वृक्ष तयाचा थोर जाहला, लढला पुष्पफलांनीं; ३७
शिरीं तयाची छाया पडतां कृतार्थ होई माळी.
जन्मसांगता पितरां तैसीं बाळें कर्तीं झालीं, ३८

भोगविलासस्थल जग नोहे, परी कठोर कसोटी,
तरला तोच, भवाची जाणे जो सुंदरता खोटी. १७
खालीं सुंदर पुष्पें, तारे तेजस्वी आकाशीं;
फुलें घडीचीं, परी तारका अक्षय तेजोराशी. १८
अधोदृष्टि जो, वरचा त्याला अदृश्य होय पसारा,
क्षणिक फुलाला भुलला, न तया दिसती अक्षय तारा. १९
स्वर्गपथावर कनककामिनी विघ्नदेवता सिद्ध,
पडला नाहीं त्याच्या मोहीं तोच जाहला सिद्ध. २०
राजपुत्र मी मज कनकाचा नाहीं लोभ, नसावा—
काय करावें, परी साधिला श्वानें समरीं दावा. २१

४

काय उणें त्या, परमेशानें धरिलें ज्यांना हातीं!
सुवर्णता पावते प्रभूच्या कृपाप्रसादें माती. २२
बलाढ्य कौरव हरले समरीं देवद्वेष करून
विलीन पांडव विजय पावले कृष्णपदांस चुरून. २३
झाला ज्यांचा श्रीपरमात्मा कृष्ण सखा कैवारी,
कां न सजावें त्यांनीं जगती जिंकायातें सारी! २४
अश्व सोडिला; संगें दिधली विजयशालिनी सेना
नर नारायण सेनानी, ज्या जगतीं जोड दिसेना. २५
गर्विष्ठांचीं नमवीत शिरें, करीत वक्रां नीट,
श्यामकर्ण तो अश्व आमच्या आला नगरा धीट. २६
प्रतापशाली पार्थ, तयाचा श्रीकृष्ण सखा पाठीं;
कसें धजावें रणांगणावर घ्याया त्यांची गाठीं! २७

केवळ संवर्धनें न होई समुद्धरण वंशाचें,
वंशकीर्तिसंगोपनवर्धन हें मतरण साचें. ३९
पुत्र तोच जो करी कुलाचा स्वकृतिनें उद्धार,
तोच जन्मला, तोच वांचला; अन्य मात्र भूभार ४०
विश्वास तुझा नांव आमचें मागें चालविशील
संधी आली पहावयाची आतांच तुझें शील. ४१
पदकमलें दिसती न जयाचीं आचरून तप भारी,
तो परमात्मा स्वयें आपल्या आला नगरद्वारीं. ४२
निजकर्तव्यपरीक्षा दे त्या; प्रसंग आला नामी !
कसास उतरे, देव तयाच्या, स्वयें रावतो धामीं." ४३

६

उत्साहानें पुढें चाललों समरभूकडे वाटे
ओढ घराची; न कळत वळले चरण परी त्या वाटे. ४४
हृदयामागें स्त्रीच्या सदनीं धांवत गेले पाय.
इच्छा होती समरा जावें हरले परी उपाय ! ४५
झोंपाळ्यावर दिसली पडली कांता रंग महालीं
कृष्ण केश मोकळे विखुरले हृदयीं, स्कंधीं, भालीं. ४६
तळहातावर गाल टेंकिला; दुःखांत दिसे चूर,
दीर्घ उसासे निघती; चाले अश्रूंचा भर पूर. ४७
परदुःखानें हृदय तळमळे, परी स्वतांस्तव आले—
प्रियनयनीं जल बघून. हृदयीं प्राणी कोण न धाले ? ४८
मम विरहानें नयनीं आले अश्रु, तयांच्या लोटें—
प्रिया प्रियतमा झाली; न सुचे ठेवूं तिजला कोठें ! ४९

धीर न धरवे; घट्ट सखीला धरिलें मी करपाशीं
अधर चुंबिला, जसा सेवितो पक्कान्नें उपवासी. ५०
धन्य चतुरता परमेशाची, निर्मी एकच ठायीं—
हितपरिणामीं अमृत, त्यापरी खर विष जीवनदाही. ५१
जैसा ज्याचा अधिकार, तशी तया फलाची प्राप्ती
सागर मथितां अमृत सुरांना, सुरा दानवां-हातीं ५२
स्त्रीच्या ठायीं अन्य वस्तु परि अमृतविषांला थार
स्त्रीच्या पायीं तरले थोडे; बहुत बुडाले ठार ! ५३
कटाक्षपातें दाह जाहला, आलिंगन त्या शांती—
समजून स्त्रीपीनकुचांवर पुरुष घेई विश्रांती. ५४
उणावे न; परि वाढे उलटा, तो अधरामृतपानें
शमवूं जातां धुंदी चढते, सर्व हरपती भानें. ५५
" अमृत " कशाचें ! सुराच भरली आहे स्त्रीच्या ओठीं.
विचार पळवी, निशा तियेची, बुद्धि उपजवी खोटी. ५६

७

द्विधा चित्त जाहलें; कळेना जावें कीं स्थित व्हावें !
सुचे न मजला निरोप घ्याया शब्द काय योजावे. ५७
एक परी मन समरभूकडे उत्साहें घे धांव;
भरी अंतरीं पराक्रमाची, यश-कीर्तीची हांव. ५८
परी पाहतां मूर्ति रतीची चातकी उभी ठेली
सितनयनांनीं अमृत पाझरी; क्षणीं दिसे रागेली. ५९
पराक्रमाला विटे मन—गमे कीर्ति कोरडा भास !
समरभूमिका कशास व्हावी ? तथ्य जगांत विलास ! ६०

रंगमहालीं उंच पलंगीं केली शेज फुलांची
सेवेसाठीं सिद्ध लाडकी पुतळी शृंगाराची. ६१
युद्धोत्साहें पाषाणासम जें मन होय कठोर,
कुसुममृदुलता त्याला आणी विषयलालसा चोर ! ६२
पुनः भुजलता गळां वेढिली ललनेच्या अनुरक्त,
करें हनुवटी हळू उचलिली; अधर चुंबिला रक्त. ६३
सस्मित अर्धोन्मीलितनयनीं रमणी मज अवलोकी.
स्वर्गसौख्य त्या समयीं, गमलें, अवतरलें भूलोकीं ! ६४

८

परी प्रतिज्ञा एकाएकीं आठवली जनकाची
रंग भंगला अपकीर्तीची भीति मानसा जाची. ६५
" येतों आतां; निरोप सखये ! दे मज समरीं जाया
श्रीकृष्णाचें दर्शन घ्याया, यशें तुला नटवाया." ६६
बोलें ऐशा मनीं विरसली, कंठांत मिठी घाली
भ्याली भीरु, उसासे, स्फुंदे, अश्रु मजवरी ढाळी. ६७
स्फुंदत वदली, "फुलें लतेवर सुगंध, कोमल, नामी;
शापाचे दिन तसे कंठितों भूवर अबला आम्ही. ६८
सुगंध, कोमलता, सुंदरता उभयांची परभोगी,
अभुक्ततेनें एक काननीं, दुजी मंदिरीं जोगी. ६९
दिवसरात्र, सणवार आमचे लहरीवर पुरुषांचे
स्त्री पुरुषास्तव जणों सोडिलें रान मोकळें साचें. ७०
मुखीं आमच्या जलबिंदु पडे तृषा जधीं पुरुषास !
पुरुष भुकेले नसतां आम्हीं काढावे उपवास ! ७१

सूर्यकमलिनी सूर्यदर्शना असतां नित्य भुकेली
हाय ! ढगांनीं आड येउनी तिची निराशा केली ! ७२
शुक्ति भुकेली स्वातिजलाची, असतां मुख पसरून—
दुर्दैवचि तें जातां तिजला मेघें अव्हेरून ! ७३
दिव्य तळवटीं नसेल, शिखरीं परंतु भय पतनाचें,
वरी झोंपडी—राजमंदिरीं दुःख काळजी जाचे. ७४
मृदु शय्येवर कंटक खुपती; पक्कान्नीं विप साचें
स्मित सुहृदाचें लटकें; कपटी आलिंगन भावाचें ! ७५

९

हातीं काठी, खांदा कांबळ, वहाण तुटकी पायीं
ओढ्याकांठीं ऐन दुपारीं गोप चारितो गाई. ७६
दुडदुड धांवे, गाई वाळी, भालीं घर्म विराजे
फिके त्यापुढें, रत्नहार जें गळां घालिती राजे ! ७७
दुपार झाली, वेळ भुकेची, आणील स्त्री खाणें—
स्वस्थल, यास्तव, करी ध्वनित तो मुरलीमधुररवानें. ७८
शिरीं शिदोरी, मन्मथ हृदयीं, चंचलता नयनांत,
हंसगामिनी तिथें गोपिका येई गाणें गात, ७९
उभय भेटतीं; मिठी घालिती प्रियकंठास करांनीं;
निर्भय चुंबन घेती रानीं; तो राजा, ती राणी ! ८०
वृक्षाखालीं बसून खाती तिखटभाकरी खाणें,
उभयां देती घास, रिझविती मन, घेऊन उखाणे ! ८१
'रुक्ष भाकरी, तिखटासंगें तिजला गोडी आली;
अरसिक गोपी गोपालाच्या चरणीं पावन झाली. ८२

तिखटावेगळ भाकर न धके जरि तें हृदया जाळी;
गोपगोपिका आजन्म तशा ना होवोत निराळीं. ८३
धन्य ! धन्य ! तें जिणें; त्यापरी नसेल अमरपुरींत
हेवा त्याचा देव अप्सरांसह असतील करीत ! ८४
चढे मस्तकीं मुकुट, त्यासवें पडती शाप उदंड
घडतें पातक, द्यावा लागे त्यास सुखाचा दंड. ८५
म्हणोन आम्ही राजमंदिरीं बसून सौख्यविलासीं—
तळमळ करितों; वाटे आम्हां धन्य गोप वनवासी ! ८६
स्वसुख-विघातक राज्य नको तें ऐश्वर्य जळो मेलें !
त्यांच्या पायीं दिवस सुखाचे फुकट आजवर गेलें. ८७
प्रेमैक्यबळें या विश्वाचा चाले सर्व रहाटी,
प्रेमैक्याचा महिमा यास्तव, सद्धर्म जगीं गाती. ८८
देव प्रेमा, धर्म प्रेमा, प्रेमरूप संसार
पडला प्रेमक्षीरसागरीं परंतु मनुजक्षार. ८९
देव विसरला, धर्म विसरला, सर्व विसरला नातें
आकाशीं फेंकिला दगड, त्या न कळे, फोडी माथें. ९०
कर्तव्य जगीं एक करावा प्रेमाचा विस्तार;
धर्मसूत्र हें मुखीं, परि करीं मनुजाच्या तलवार ! ९१
भावभुकेला ईश्वर आला, तयास भेटायाला—
व्हावी ही तलवार कशाला ? करीं त्यापरी भाला ? ९२
स्वमनीं व्हावें प्रेम, दिसाया ईशरूप नयनास,
प्रेमपूर्ण हृदया न बघवती स्त्रीचे अश्रुश्वास. ९३
अप्रसन्न गृह, अप्रसन्नतर गमेल सुंदर सृष्टी,
पाहूं जातां देव लोचना, दिसेल ललना कष्टी. ९४

चंद्रदर्शनें जैसा होई अमर्याद जलकोश;
असेन वाहविलें मी तैसी; तो प्रेमाचा दोष. ९५

१०

धन्य वाटलें पदरीं पडली ऐशी ललना ज्ञानी,
वचन स्त्रीचें नव्हें, ऐकतों, गमे, शारदावाणी. ९६
भांड सखीची मांडवे न मज; झालों मी रममाण,
मान विसरलों, ज्ञान विसरलों, सर्व हरपलें भान! ९७
लढतां लढतां समरभूवरी व्हावी तनु जी शांत,
शयनीं रमणीसवें पहुडली ती निर्लज्ज निवांत! ९८
मानधनांचा गर्व हरावा समरीं ज्या बाहूंनीं,
स्त्रीसेवेला तयीं घेतलें हाय! आज वाहूनी! ९९
वक्षस्थल जें विंधित व्हावें अरिच्या कठोर बाणीं,
तें मूढें टोचून घेतलें स्त्रीपीनकुचाग्रांनीं! १००
कृष्णवदन हें कैसें दावूं कैसें मम जनकाला?
सैन्यास कसा जाऊन मिळूं? केलें काय कपाळा! १
जनक असेल सचिंत मुलाची समरीं वाट पहात,
म्यां अविचारें येथेंच परी केली रात्र पहाट.
मोह समंजस टाळी, जिंकी शूर मनुष्य तयातें,
ज्ञान शूरता नसतां, बरवें न वघावें त्या वाटे. ३
" मोहानंतर " होय मना, तो पूर्वी होता खेद,
दुरावेल सुरलोक—भूतलांतला खेदकर भेद!" ४

११

खेद यापरी करीत सुधरी समराची तो वाट,
पुढें वर्नली कथा; असे ती पुराणप्रियां ज्ञात. ५

## २२. जोहार.

[ लढाईला जाण्यापूर्वी पाठीमागें पाश न राहिला, तर युद्धास विशेष स्फुरण चढेल किंवा दुर्दैवानें प्राणान्त झाला, तर बायकामुलांची शत्रूच्या हातीं पडून विटंबना होईल म्हणून रजपूत त्यांचा प्रथम निकाल करून नंतर युद्धाला जात. तशा एका प्रसंगाचें हें शब्दचित्र आहे. जोहार म्हणजे शेवटचा निरोप. ]

पद [ चाल—प्रिये पहा रात्रींचा... ]

विलासिनी रमणीसह सुमनाच्या शय्येवर पहुडला ! ध्रु०

हृदयाशीं हृदय मिळे । अधराशीं अधर जुळे
करपाशीं कंठ दिले— भिन्नभाव लोपला. १
स्वप्नसुखीं चित्त दंग । स्वैर करी रंग रंग
सर्वपरीं होय भंग— दुंदुभिरव ऐकिला. २
निद्रा निमिर्षी उतरे । जागृति देहांत शिरे
ललनेपासून त्वरें— दूर वीर जाहला. ३
घेउन तलवार बळी । गेला शेजेजवळीं
प्रेमाची ती पुतळी— भंगाया सज्जला. ४
बघतां ती मूर्ति परी । धडकी भरली तदुरीं
धैर्य गळे; कंपभरीं— खड्ग पडे भूतला. ५
एक चित्त जाय रणीं । एक न सोडी रमणी
एका प्रिय कीर्ति जनीं— एका स्त्री प्रेमला. ६
एकच्च घेईन मुका । केला निर्धार निका
दहशत घेऊन भुका— तो भुकाच राहिला ७
आंवरून मोह धरी । घेई खड्गास करीं
जागृत ललनेस करी— भाव तिला समजला. ८
धैर्यदेवता नवरी । उठे, मनीं भय न धरी
पतिपुढें मान करी— सिद्ध उभी मृत्युला. ९

खड्गाचा हात फिरे । पडला मृत देह धरे
पतिवाधित स्त्रीरुधिरें– भूमिभाग रंगला. १०
सौख्यशांति समाधान । विषयविलासस्थान
होय तें क्षणीं श्मशान– अंधकार पसरला ११
प्रेमाच्या हेतुविणें । शून्य दिशा शून्य मनें
भारभूत होय जिणें– मृत्यु प्रिय एकला. १२
मरणाला जो तयार । तोच अरी करिल ठार
रणदेवी विजयहार– घाली त्याच्या गळां. १३
यास्तव रजपूतकुळीं । देती स्त्रीतनय बळी
धन्य तेच भूमितळीं– पाश जयीं तोडिला. १४

---

## २३. नागपंचमी.

**पद** [ **चाल**—विभव स्वकरें देईन ... ]

मजासि न कळे– मी अथवा हे जन चुकले–ध्रु०
प्रपंच मोठा आपलपोटा
परमार्थाचा पथ वा खोटा
पडलें मज गूढ न उकले. १
मिथ्या का जो प्रपंच भासे ?
परमार्थास्तव मात्र उसासे
टाकून जीव हे सुकले. २
प्रपंचावरी जग आधारें
भासरूप परमार्थ विचारें
स्वहिताला नादीं मुकले. ३

मी, माझेंपण असतें हरलें
'विश्वच घर' जर हृदयीं ठरलें
असतें का जग मग टिकलें ? ४

मी–पण ज्यांच्या हृदयीं बाणे
तेच जगाचे बनले राणे
श्री·विभव त्यांकडे झुकले. ५

परमार्थाच्या पडले पाशीं,
फिरती दारोदार उपाशी;
अश्रुपूर नयनीं न खळे. ६

शत्रु, मित्र समजून उराशीं
धरिले, ते वमले विषराशी
विष अमृततरूवर पिकलें. ७

नागपंचमी सण तरि करिती
आत्मविनाश बळें आदरिती
समजून समंजस चकले. ८

---

## २४. सोंगटीचा खेळ.

पद [ चाल—लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि... ]

खेळ मांडिला जगन्नायकें जगत्पटाच्यावरी.
मानव नरदा, दिवसयामिनी फांसे धरिले करीं.
भिन्नत्वास्तव रंग चढविला हिरवा पिंवळा वरी.
रंगाखालीं साऱ्या नरदा शुष्क लांकडे परी ! १
या भिन्नत्वीं भरली जादू–तिचें नांव संसृती.
भिन्नत्वबलें दिसे चालली जगनाची राहटी.

हिरवीमागें पिंवळी लागे लाल बैसली कटीं.
घरांत राहे पडून काळीं; तिची खुंटली गती. २
पडेल जैसा डाव त्यापरी पटीं सोंगटी फिरे
अभिमानमदें गिळित चालली लाल घरच्या घरें
पिंवळीचा बैसला तडाका, हिरवी पिकली मरे
नशीब फुटकें म्हणून काळी मनीं विचारी झुरे ! ३
मारील कुणा, मरेल कोणी, मागें, कोणी पुढें
न्याय जगाचा जो चढतो, तो यथावकाशें पडे
परम पदाचा लाभ सुदुर्घट, एकादीसच घडे
पदाजवळ पोंचली सोंगटी, फांसा चुकतां बुडे. ४
तिच्या ललाटीं, पुन्हां फिरावीं पटीं वरें तींच तीं
चर्वितचर्वण केल्यावेगळ तिला न दुसरी गती
स्ववलें तरल्या दुसऱ्या नरदा तिज छाया सद्गती
चौऱ्याशींचा चुकला फेरा पुन्हां क्रमूं लागती. ५
स्वतां खेळतां खेळविणारा प्रभु जगाचा पती.
निमित्त नरदा यदृच्छावळें खेळ मात्र खेळती;
परि म्हणती निर्जिव लांकडें 'माझी माझी' कृती
धन्यास भुलली, स्वतांस नसत्या दोषांनीं लिंपिती. ६

## २५. गाण्याचें गाणें.

**पद [ चाल**—वधुनि सुभद्रेला यानि ]

गाण्याचें गाणें— गाऊं गाण्याचें गाणें ! ध्रु०
अंकावरती घेउनि आई,
तनयातें करिते अंगाई,

प्रेमरसाचें गाणें गाई,
हारपती भानें— गाऊं गाण्याचें गाणें ! १
कुटुंबभरणास्तव संसारीं,
कष्ट करी जात्यावर नारी,
स्फूर्त गीत तीचा सहकारी,
श्रम विलयाला ने— गाऊं गाण्याचें गाणें ! २
खवळे जलधी, उडवी गगनीं,
कंदुकापरी सलील तरणी,
नभीं खलाशी पडला व्यसनीं,
गीत समाधानें— गाऊं गाण्याचें गाणें ! ३
स्वच्छंदें मन सोडी ताना,
त्याच पावती कृति रूपांना,
गानरूप ही सृष्टी जाणा,
आत्मज्ञानानें— गाऊं गाण्याचें गाणें ! ४
विहंग गाती, सरिता गाती,
वारे आलापींत वहाती,
गुंगतात नक्षत्रें रातीं,
कोण तया जाणें— गाऊं गाण्याचें गाणें ! ५
कृत्रिम हास्य नको जगताचें,
असत्य गीत नरस्तवनाचें,
पुर नलगे जेथें खल नाचे,
सेवावीं रानें— गाऊं गाण्याचें गाणें ! ६
अखंड हसतमुख सारें वन,
वायु गुंजती वेणुवादन,

मयूर करिती प्रेमें नर्तन,
जेथ जोडप्यानें— गाऊं गाण्याचें गाणें ! ७
वास करावा ऐशा स्थानीं,
फलपुष्पांचीं गावीं गाणीं,
यत्न करावा जेणें ध्यानीं,
ईशरूप बाणे— गाऊं गाण्याचें गाणें ! ८

---

## २६ कवि आणि पोपट.

पद [ चाल—वीरा भ्रमरा ]

कविः—'तुझी पांखरा ! गोजिरवाणी मनोहरा आकृती,
विधीची करणी वानूं किती ! ध्रु०
रंग पारवा, पात्र गौरवा सुंदर पाचूपरी,
मुलामा सोनेरी त्यावरी;
चंद्रकोर सांवळी रेखिली गोंडस कंठावरी,
भ्रूधनू रमणीगर्वा हरी;
अधरसाम्यतेस्तव न धुंडिता कवि विद्रुम सागरीं,
प्रथम तव चंचु देखता तरी;
स्वच्छंद बैसुनी पुष्पित वृक्षावरी,
काढिसी मधुर रव, धन्य तुझी वैखरी,
'वर्षिसी सुधेतें वाटे जगतावरी,
मनीं लालसा, नित्य घडावी तव सुखकर संगती,
वांच्छिते गाणीं गाया मती. १

इष्ट न, निर्जन वनीं वसावा गुणी तुझ्यासारखा,
मुकावा फुका पुरींच्या सुखा !
कोण चहाता तुला या स्थलीं ? कोण जिवाचा सखा ?
वनीं गुण वृथा दवडतोसि कां ?
गुलाबपुष्पें व्यर्थ विकसती नसता मधुमक्षिका,
न सागरतलीं मोल माणिकां;
चल जाऊं आपण सखया ये ये पुरा,
देईन तुला मी सोन्याचा पिंजरा,
बसवीन सुखाच्या शिखरीं तुज पांखरा !
गाऊं दोघे मिळून लावूं चुकले जन सत्पथीं,
सुपुप्तां आणूं नव जागृती ! २
पोपटः—केला आदर, मला बाहिलें आमिषांस दाउनी,
निरंतर केलें मज तूं ऋणी;
नगर कासया आम्हां व्हावें ? भला वास काननीं,
जळो ती जगताची कांचणी !
असते गुणभोक्ते जर नगरीं चतुरा, तर का गुणी,
हिंडते भ्रमिष्टापरी वनीं ?
मज हाल पुराची काय पांखरा कळे !
परि वदती नगरीं अज्ञानचि कोंदलें,
रसिकता सर्व करपली मत्सरानलें,
होईल मुका ऐशा स्थानीं जातां वाचस्पती,
पाड तो मज गरिबाचा किती !
स्वच्छंदानें वनीं विहरतों— गातों स्वीय स्वरीं,

न तें सुख असें राजमंदिरीं;
परवशतेच्या पक्कान्नांस न कंदफलांची सरी,
स्वतांची जीर्ण झोंपडी बरी !
लखलाभ असो तुजलाच तुझी परवशतेची सरी,
तांत ती कंठीं रुतली पुरी;
दुःखाच्या डोहीं रखडत असतां स्वतां,
कां अन्यालाही त्यांत वळें ओढितां ?
पुरुषार्थ वाटतो यांत तुम्हां कोणता ?
आनंदानें तुम्ही मारिता परवशतेला मिठी,
अम्हांला परवश-जीवित मृती ! ४

---

## २७. दसऱ्याचें सोनें.

दैवाची लीला अघटित आहे तेंच बली जगतीं ! ध्रु०
अशक्यास त्याजवळ न थारा
त्याचाच जगीं सर्व पसारा
अघटित घटना घडवी, संतत वागे स्वैरगती. १
'विष-या-घ्या !' 'विषया-घ्या ! होतें
शिर तुटतें अमृताच्या घोटें
अमृत विषाचें, दैवबळें ये जहरपणा अमृतीं ! २
दैवबलानें सागर तरले
अजिंक्य ऐसे दानव हरले
कौरव गेले, रावण गेला त्यांची काय मिती ! ३
नग्न अडाणी फिरले रानीं

तेच पुढें जन ठरले ज्ञानी !
विद्याशास्त्रविशारद पंडित करिती मूढ कृती ! ४
वैभवशाली सत्ताधारी
गुलाम फिरती दारोदारीं
तुलसीपत्रें सुकलीं सबूजा ये सकलांवरती ! ५
धैर्य निमालें भरली भीती,
असत्य पिकलें नुरली नीती
देशप्रीती निंद्य जहाली व्यसनें स्वहितपथीं ! ६
सुवर्णभूची रक्षा झाली
सोन्याजागीं पानें आलीं
'सीमोल्लंघन घडलें दैवा ! बघसी अंत किती ! ७

---

## २८. प्रोफेसर छत्र्यांचा केसरी.

पद चाल—[ अजि अक्रूर हा नेतो ]

तुज वनराजा काय ग्रहदशा आली ॥ परवशता प्राप्त जहाली ॥
तूं विपिनाचा सार्वभौम अधिकारी ॥ मृगकुलें प्रजा तव सारी ॥
तव आज्ञाही वेदवाक्य कांतारीं ॥ तूं राजा थोर विचारी ॥
गर्जना तुझी धैर्या कांपविणारी ॥ चपलेची दृष्टि-भरारी ॥
मदभरें नाग जो नाचे ।
मस्तकीं चढून तयाचे ।
भक्षिसी कवळ मोत्यांचे ।
ऐश्वर्य असें असे तुझें जयकालीं ॥ परि आलें काय कपाळीं ! ॥१॥
दुर्दैव तुझें पडलास कसा आतां ॥ कपट्यांच्या निर्दय हाता ॥

ते थाटानें मिरवितात; तव माथां ॥ हाणिती तडातड लाथा ॥
तूं दुबळ्यांच्या साहसी प्रतोदाघाता ॥ भीसी श्वासा दृक्पाता ॥
निःशंकपणें नरनारी ।
करितात तुझ्यावर स्वारी ।
ये अशी तुला लाचारी ।
तव कर्णाची निर्भय धरुनी पाळी ॥ लवविती तुज मुलंबाळीं !२
स्थिति रुचे कशी तुज ही लाजिरवाणी ॥ कोठें तव दडलें पाणी?
जीवंतपणीं स्वत्वाची होतां हानी ॥ प्रेतकळा पावे प्राणी ॥
मृदुलता अशी धरितां लोण्यावाणी ॥ खातील तुला ओष्ठांनीं ॥
समज हे मानवी कावे ।
कुरवाळित घेती चावे ।
मृगजलास या न फसावें ।
ही इष्ट नव्हे परवशतेंत वहाली ॥ नाच रंग दीस महालीं ॥३॥

---

## २९. चिमा.

श्लोक–[ वृत्त. शा. वि. ]

भाग्याचे समयीं मजा उडविली मत्संगतीनें जिनें;
मातें जी न विसंबिली भटकतां पोटार्थ रानें वनें;
ऐश्वर्यीं व्यसनीं अशी मजसवें जी नांदली सारखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी!१
खालीं मान करून संतत उभी लज्जावती जी असे,
रागेजे न कधीं; सदा मजकडे पाहून गालीं हंसे !

नाहीं सोडुन कोपरा सरकली, माझें सदा आयकी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी! २
नाहीं माहित डामडौल अगदीं साधीसुधी वागली,
नेसायास दिलें जुनें चिर तरी नाहीं असंतोषली;
ल्याली भूषण एकही न, रिझली सेवून पानें सुकीं,
हा! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी! ३
नाहीं चारजणांसमक्ष तिजला मीं चुंबितां लाजली,
हूं कीं चूं न करी उभी तिज जरी मीं विस्तवें भाजली;
ऐशी भक्ति असे जिची मजवरी ठेवी मला जी सुखी,
हा! हा! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ४

---

## ३०. अवंतिके !

पद चाल- [ प्रिये पहा. ]

प्रिये अवंतिके ! नयनहृदयरंजिके ! ध्रु०

तूं जीवन, तूं भूषण, परमार्थाचें साधन
आहे मज तुजवांचुन, सर्व जग फिके ! प्रिये० १
तूं दैवत तूं देवी, परमसुखाची ठेवी,
यास्तव तव पद सेवीं, सौख्यदायिके ! प्रिये० २
तूं मजला खानपान, तूंच शयन तूं आसन,
तूं नसतां सिंहासन, नको लाडके ! प्रिये० ३
रूप तुझें दिनरजनीं, वसतें हृदयीं नयनीं,
दिसतें स्वप्नीं, शयनीं, एकसारखें! प्रिये० ४
रूप तुझें निरखावें, तव वचनामृत प्यावें,
तव गुण गावें, ध्यावें, लालसा सखे ! प्रिये० ५

रात्रीं सरिता-तीरीं, संसारीं व्यवहारीं,
तव चरणीं घरदारीं, लागलों निकें! प्रिये० ६
छंदीं तव मन जडलें, प्रिय तें ज्या आवडलें,
तें मज मार्गीं नडलें, शत्रुसारखें! प्रिये० ७
मज निंदो निंदी जन, धरिलें मी तुझे चरण,
होवो झालें त्रिभुवन, त्यांत पारखें ! प्रिये० ८

---

## २१. चिमणी.

पद [ चाल—धिन्ना धिन्नक धिन्ना धीं. ]

रंग गुलाबी गालांचा, दंत हार कुंदफुलांचा;
ऐशी सुंदर रम्य परी, प्रेमभरें स्मित मधुर करी. १
चढे रंग गालीं गहिरा, विकसित होती ओष्ठ जरा;
झळकुनि सहज रदनपंक्ती, तिची दुणावे मुखकांती. २
गेली विलयाला रात्र, फुटे तांबडें गगनांत;
कोर निघे रविकिरणाची, सादृशता रात्रीवदनाची ! ३
जशी स्फूर्तिकन्या कविता, रविता पसरी जागृतता;
घेती स्वबलें एक परी, वर्तविती जगता स्वकरीं. ४
उडती बागडती पक्षी, तत्परता ठेउनि भक्ष्यीं;
गाती ब्रह्मानंदानें, सृष्टीनें रचिलें गाणें. ५
भाव तयांचे वळखावे, शब्दरूप त्यांला द्यावें;
तोच कवी ज्या ही क्षमता, मी गणमात्रा वर्तविता. ६
बेफिकीर साधी भोळी, ओसरींत चिमणी आली;
टिपावया लागे दाणे, गुंगत 'ची ची ची' गाणें. ७

श्रम उदरास्तव करितांना, स्वच्छंदें मारी ताना;
धन्य जिला धरितां आलीं, व्यवधानें एका कालीं. ८
असें पुण्य गांठीं कोठें ? कुठें भाग्य माझें मोठें !
कीं एके कालीं वाहूं, उदरभार गाणीं गाऊं. ९
एक कराया लागावें, दुज्याकडे तों मन धांवे;
साधेना एकही परी, अपूर्णता मनुजता खरी ! १०
स्वच्छंदें गाणीं गातां, पडते उदराची चिंता;
जातां उदराच्या मागें, शब्द दूर पळती रागें ! ११
सहज आरसा एक तिला, बागडतां दृष्टीं पडला;
उडत तयासन्निध गेली, उभी तेथ विस्मित ठेली. १२
ती चंचलता मूर्तिमती, परी तिची कुंठली गती;
स्वप्रतिबिंबित रूपानें, तिची लया नेलीं भानें. १३
भाग आपला ते दाणे, टिपावयाच्या हेतूनें;
आली वाटुनि ही दुसरी, चढे तिच्या संताप शिरीं. १४
मारुनि चोंचींचे घाव, करूं सवतिचा पाडाव;
या आवेशें ती भोळी, उडी आरशावर घाली. १५
चोंच दुखावे, रक्त निघे, वेडी परि माघार न घे;
पुनः पुनः आरशावरी, चंचुपुटाचे वार करी. १६
श्रमली, ओशाळली मनीं, आले अश्रु तिच्या नयनीं;
सौम्यपणें दर्पण पाही, बिंब त्याच रूपा लाही. १७
द्वेष ओसरे, प्रेम भरे, वैरी तोचि स्नेहि ठरे !
चुंबी, आलिंगी सखिला, होई तेंच प्राप्त तिला. १८
अजाण तें पांखरूं असे, फसे, यांत आश्चर्य नसे;
आम्ही ज्ञानी सुज्ञ गडी. तसेचि चुकतों घडीं घडीं ! १९

दिव्य आरसा जगताचा, ईश्वर निर्मित नवलाचा;
सदैव आम्हांपुढें उभा, दावी सत्य प्रतिबिंबा. २०
हांसूं आम्ही जगा, तसें, करील जग आमुचें हंसें;
कारितां जगताची कींव, देइल तें जीवा जीव ! २१
लोभाचें फल लोभ मिळे, द्वेषानें सद्भाव जळे;
जसें गावया पढवावें, तसे बोल गातीं रावे. २२
कळून हें आम्हां सगळें, मूढ भाव मतिचा न गळे;
करून जातों भलतेंच, पदोपदीं खातों ठेंच ! २३

आर्या.

गतजन्म प्रतिविम्बित झाला इह जन्म दर्पणीं स्पष्ट,
केलें तेंच फळाला आलें देखून, सुष्ट वा दुष्ट. २४
यास्तव मना करावा यत्न तुवां सत्पथास लागाया,
गेले जावोत, पुढें दवडावे दिन न आपुले वाया ! २५

---

## ३२. प्रीति निमाली तर—

श्लोक वृत्त—[शा. वि.]

नादें मंजुल आपल्या रिझवितें जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी !
अंगातें जडवून पंख उसने जाईन कीं सत्वर—
मी येथून उडून उंच गगनीं प्रीती निमाली तर ! १
माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं ?
प्रेमें बालक कोण सुंदर सदा देईल माझ्या करीं ?
आतां भासतसें मला भवन जें सर्वस्व चेतोहर—
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर ! २

अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन,
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर,
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर ! ४

---

## ३३. सुवास.

[ ओसाडींत सहल करीत असतां कवीला मधून कस्तूरीसारखा वास येई. ( हा वास जुन्या भुजंगाच्या श्वासाचा असतो म्हणतात. ) वास कसा आला, कोठून आला, म्हणून त्यानें पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ! त्या नादांत त्याच्या मनाची जी स्थिति झाली, तिचें खालील पद्य हें चित्र होय..]

हिंडत असतां निर्जन रानीं
स्वैरगतीनें गुंगत गाणीं
मधुर सुवास घ्राणीं आला,
त्या योगानें आत्मा धाला.
उद्भवला हा परिमल कोठें ?
पडलें मजला कोडें मोठें.
फिरलों—स्थिरलों ठायीं ठायीं,
मूळ तयाचें कळलें नाहीं.
कार्य आणि कारण या जगतीं,
तीच वस्तु नटलेली दिसती,
तैसें माझें मानस आतुर.
शंका काढी—देई उत्तर. १

सुगंध जो का अंगीं दाटे,
पुष्पमिषें प्रकटावें त्यातें;
पुष्पें—ज्यांना नाहीं जोड-
रंगें, रूपें, वासें, गोड,
हुंगीना परि कोणी त्यांतें,
त्यांच्या आस्वादी न रसातें,
खेळावीं जीं रसिका-हातीं,
होते त्यांची संतत माती
ओसाडींतील गुलाबांतें
खिन्नपणा याकरितां वाटे.
टाकि उसासे सारा वेळ,
त्याचा हा का गंध असेल ? २

* * *

वागविली निज हृदयांतीं
भक्तीनें रमणाची मूर्ती,
भजली अर्पण करुनी त्याला
प्रेमाच्या पुष्पांची माला
काय होय तें परि पुरुषाला,
नव पुष्पावरच्या भ्रमराला ?
विमुख तिला तो हाय ! जहाला,
अंतरली स्त्री सर्वस्वाला.
बाला भग्नमनोरथ झाली,
मौक्तिकांपरी अश्रू ढळी.

दुःखानें एकांतीं स्फुंदे;
काय तेंच या स्थानीं गंधे ? ३

*   *   *

मात्सर्याचा भरला वारा,
अहंपणाचा सर्व पसारा,
अज्ञानाची मिरव द्वाहीं,
रसिकत्वाला थारा नाहीं.
काय अशा जनतेंत रहावें ?
काय पहावें ? काय चहावें ?
बरें राहणें निर्जन रानीं,
ओह्यासंगें गाणें गाणीं.
यापरि वैतागून कवीनें,
ओसाडींत स्वच्छंदानें—
वाजविला जो सुस्वर पांवा,
त्याचा का हा वास असावा ? ४

---

परिमलकारण कळलें नाहीं,
उगमस्थल आढळलें नाहीं;
व्यर्थ हिंडलों झालों वेडा,
वेडा ! वेडा ! वेडा ! वेडा .
परिमलकारण मजला कळतें,
उगमस्थल किंवा आढळतें—
सांठवितों कवितेंत तयाला
वाग्देवीला सुखवायाला !

स्वानुभूत वासाचें दान
करावयाला जोंवर ये न,
तोंवर कवितालतिकेवरतीं
कर्णिकार सुमनांची भरती ! ५

---

## ३४. स्त्री आणि पुरुष.

पद. ( ला बाई ला, वेलाचें पान )

फुलली फुलें— त्यायोगें उपवन खुललें.
दरवळला— परिमल सुखवाया सकलां.
स्वैरगती— अलिगण उडती—बागडती.
मधुनादें— गाती प्रभुगुण आनंदें.
मंदगती— स्त्री तेथें हिंडत होती.
विचराया— पुरुषहि आला त्या ठायां.
कौतुकला— हंसला, बाग मनीं ठसला.
नव फुललें— पुष्प एक त्या आवडलें.
प्रेमभरें— खुडिलें तेणें तें स्वकरें.
हुंगियलें— चुंबियलें—माथां धरिलें.
क्षणमात्रें— होय नकोसें तें त्यातें.
कुसकरिलें— फेंकुनि धरणीवर दिधलें.
सर्व कृती— स्त्री ती अवलोकित होती.
गहिंवरली— टिपें तिचीं टपटप गळलीं.
कां तीं ? तें— कायं कथूं मी रसिकांतें !

## ३५. दोन मार्ग.

आर्या (गीति.)

आयुःपथास फुटले, दिसले मज, दोन वेगळे फांटे,
समजेना मज जावें आपण निःशंक कोणत्या वाटें. १
एकावर वृक्षांची होती घनदाट पसरली छाया,
होता सडा फुलांचा पडला पांथिक जनास सुखवाया. २
स्फटिकापरी जलाचे होते वाहत तयांत रम्य झरे
ठायीं ठायीं खुलती स्वागतपर राजमंदिरें रुचिरें. ३
सुंदर पथशाखा ही ज्या स्थानीं पावली दिसे विलय,
होते चमकत तेथें शब्दत्रय—'सौख्य-संपदा-विजय' ४
मार्गारंभीं होते थवे जनांचे निघावया जमले
थोडेच भाग्यशाली परि दिसले शेवटास विश्रमले. ५
ते थोडकेच होते परि सेवित शांतिसुख समाधान,
ते मानी, तेच धनी, त्यांनाच जगांत 'थोर' हा मान. ६
असती कष्ट कसे ते नव्हते माहीत त्यांजला परि ते—
अप्रतिहत अधिकारी— सत्ताधारी तयांस यश वरितें. ७
सत्तेचा, विभवाचा, जगताचा मार्ग एक हाच असे,
आरंभीं एक फलक संबोधी स्पष्ट अक्षरात असें- ८

* * *

दुसऱ्या पथीं अरेरे ! पथ मी त्याला कशावरून म्हणूं
पदही नसे उमटलें, गेलें न कुणीं तयावरून जणूं ! ९
सर्वत्र खांच खळगे, पाषाणपरंपराच त्या वाटे
कांटे तिखट विखुरले तिजवर पाहून ज्या हृदय फाटे. १०

आल्या मोडकळीला कुटिका तुरळक कुठें कुठें असती
ओसाड भयाण दिसे नांवालाही न त्या स्थलीं वसती. ११
निंदा दुःख पराजय, दारिद्र्य स्वैर तेथ संचरती
कोण बघून तयांना धजेल टाकावयास पद पुढतीं ? १२
क्षितिजावरी दिसेना कोठें तो कष्टमार्ग शेवटला
असलाच अंत त्याला तर होता तो तमांत गुरफटला. १३
न धजे कुणी क्रमाया पंथ बिकट हा परोपकाराचा
त्याजकडेस वळे जन निंदेच्या पात्र होय तो काचा. १४
हा कीं तो पथ ध्यावा न सुचे, मन गोंधळांत सांपडलें,
'कंटक पथच तुझा हा' श्रवणीं मम बोल तेधवां पडले. १५
ने णे मन, नुचले पद, तरि वळवुनि त्या पथाकडे चरण
रडत कढत धीरानें करावया मार्ग लागलों क्रमण. १६

* * *

मध्येंच परि पथीं त्या बसलों मी हात लावुनी भाला
बहु निंदिलें स्वतांला विचार हा मन्मनीं कसा आला ? १७
अविचार काय केला ? का या कंटकपथास अनुसरिलें !
दारिद्र्यदुःख दुर्घट जयांत चोहींकडे दिसे भरलें. १८
धिःकारयुक्त वाणी कानीं मम झणझणूं तदा लागे,
रागें भरे कुणी मज 'बघतोस कसा फिरावया मागें ? १९
पडलास कां विचारीं ? अवघड हा पंथ तुज गमे काय ?
कां हाय हाय करिसी? येथें कां खिळविले तुवां पाय ? २०
कां टाकिसी उसासे ? कां नयनांतून आसवें गळती ?
मूढा भ्याडा पडली ऐसी कैसी तुझी भ्रमांत मती ? ' २१

नीतीची सत्याची द्रव्याढ्यांनीं करून रांगोळी,
गरिबांकडे सचोटी हांकलिली देउनी करीं झोळी. ३४
असतीं अमरपुरींचीं अनुपम सौख्यें धरातलीं पिकलीं
परि मानवभूतांच्या दुष्कृतिनें भूमिसुरलता सुकली.' ३५
'दुःखाच्या डोहीं जन सांपडले, लागले बुडूं खोल
आतां तूंच तयाला' ऐसे मग धीट उमटले बोल. ३६
'आत्मा दिला, दिलें मन परमेशानें जया कळे भेद,
सुखदुःख जया समजे, संस्कारीं ज्यास हर्ष वा खेद. ३७
दुःख पराला झालें, बंधु व्यसनांत गुंतले हाय !
हें समजून जयानें केलें नाहीं तयां कधीं साह्य. ३८
तो नीच, हीन मानवकोटीस कलंक होय जाण, मनीं
तो भार धरेस, तयें कष्टविली व्यर्थ आपली जननी. ३९
अवघड काय पथ गमे अजून झाली न का निरभ्र मती ?
दुःखाच्या भीतीनें आहे त्वां काय रोधिली स्वगती ? ४०
दुःखें बहुत चिरडले त्यांजकडे एकवार दे दृष्टि
घे भार तुझ्या स्वशिरीं, होऊं देऊं नको मना कष्टी. ४१
जो मार्ग तुवां धरिला शेवट त्याचा गड्या मनीं आणीं
प्रेमभरें मजला ती सुचवूं लागे प्रबोधिनी वाणी. ४२
दृष्टि सहज वर मी जों करुनि पुढें वाट पाहिली माझी
नवलप्रकार दिसला—मति पडली थोरे विस्मयामाजीं. ४३
अरुणाची कांति दिसे विराजली व्योममंडलीं दिव्य
सिंहासन सत्याचें त्या स्थानीं स्थापिलें असे भव्य. ४४
लाधेल अंत हा तुज, हें सौख्याचें मिळेल भांडार
जा, जा पुढें, करी ती वाणी मज बोध 'घे न माघार. ४५

## ३५. दोन मार्ग.

आर्या ( गीति. )

आयुःपथास फुटले, दिसले मज, दोन वेगळे फांटे,
समजेना मज जावें आपण निःशंक कोणत्या वाटें. १
एकावर वृक्षांची होती घनदाट पसरली छाया,
होता सडा फुलांचा पडला पांथिक जनास सुखवाया. २
स्फटिकापरी जलाचे होते वाहत तयांत रम्य झरे
ठायीं ठायीं खुलती स्वागतपर राजमंदिरें रुचिरें. ३
सुंदर पथशाखा ही ज्या स्थानीं पावली दिसे विलय,
होते चमकत तेथें शब्दत्रय—'सौख्य-संपदा-विजय' ४
मार्गारंभीं होते थवे जनांचे निघावया जमले
थोडेच भाग्यशाली परि दिसले शेवटास विश्रमले. ५
ते थोडकेच होते परि सेवित शांतिसुख समाधान,
ते मानी, तेच धनी, त्यांनाच जगांत 'थोर' हा मान. ६
असती कष्ट कसे ते नव्हते माहीत त्यांजला परि ते—
अप्रतिहत अधिकारी— सत्ताधारी तयांस यश वरितें. ७
सत्तेचा, विभवाचा, जगताचा मार्ग एक हाच असे,
आरंभीं एक फलक संबोधी स्पष्ट अक्षरात असें- ८

* * *

दुसऱ्या पथीं अरेरे ! पथ मी त्याला कशावरून म्हणूं
पदही नसे उमटलें, गेलें न कुणीं तयावरून जणूं ! ९
सर्वत्र खांच खळगे, पाषाणपरंपराच त्या वाटे
कांटे तिखट विखुरले तिजवर पाहून ज्या हृदय फाटे. १०

आल्या मोडकळीला कुटिका तुरळक कुठें कुठें असतीं
ओसाड भयाण दिसे नांवालाही न त्या स्थलीं वसती. ११
निंदा दुःख पराजय, दारिद्र्य स्वैर तेथ संचरती
कोण बघून तयांना धजेल टाकावयास पद पुढतीं ? १२
क्षितिजावरी दिसेना कोठें तो कष्टमार्ग शेवटला
असलाच अंत त्याला तर होता तो तमांत गुरफटला. १३
न धजे कुणी क्रमाया पंथ बिकट हा परोपकाराचा
त्याजकडेस वळे जन निंदेच्या पात्र होय तो काचा. १४
हा कीं तो पथ घ्यावा न सुचे, मन गोंधळांत सांपडलें,
'कंटक पथच तुझा हा' श्रवणीं मम बोल तेधवां पडले. १५
ने घे मन, नुचले पद, तरि वळवुनि त्या पथाकडे चरण
रडत कढत धीरानें करावया मार्ग लागलों क्रमण. १६

*　　*　　*

मध्येंच परि पथीं त्या बसलों मी हात लावुनी भाला
बहु निंदिलें स्वतांला विचार हा मन्मनीं कसा आला ? १७
अविचार काय केला ! का या कंटकपथास अनुसरिलें !
दारिद्र्यदुःख दुर्घट जयांत चोहींकडे दिसे भरलें. १८
धिःकारयुक्त वाणी कानीं मम झणझणूं तदा लागे,
रागें भरे कुणी मज 'बघतोस कसा फिरावया मागें ! १९
पडलास कां विचारीं ? अवघड हा पंथ तुज गमे काय ?
कां हाय हाय करिसी? येथें कां खिळविले तुवां पाय ? २०
कां टाकिसी उसासे ? कां नयनांतून आसवें गळती ?
मूढा भ्याडा पडली ऐसी कैसी तुझी भ्रमांत मती ?' २१

मृदु बोल मग उमटले 'आली कां दुबळिका तुला बाळ !
आहेत अनंत ज्यांचीं होते उर्मींचा सैदव आबाळ. २२
अन्नान्न दशा झाली शिर टेंकाया नसे जया स्थान
निर्वाहास्तव फिरती रिक्तोदर सोडिती परी प्राण. २३
कां त्रासलास ? कंठीं बहुतांचे प्राण दाटले असती
कां करिसी शोक खुळ्या ? भग्नहृदय सर्व येथली वसती. २४
आत्मविचारांत वृथा भ्रमसी, दे दुर्बलांवरी लक्ष.
व्यसनांत गुंतलेले दिसतील तुला घरातलीं लक्ष. २५
दुःखार्तांची भरली आहे एकच जगांत किंकाळी
अश्रुजलें व्यथितांच्या येईल दिसून तुज धरा न्हाली ! २६
बाप मुलास तुडवितो; भाऊ भावावरी उठे रुष्ट
कलह ! कलह ! कलह ! जगीं आप्तपणा सर्व जाहला नष्ट. २७
सत्ता चिर नांदाया विस्ताराया अखंड जे खपती
त्यांसच तुडवून करी सत्ता ती निश्चय आपुली प्रगती. २८
सुखसदनांच्या द्वारां सोन्याचे घट्ट बसविले डाग
हव्यासासच उघडीं तीं, अन्याचा नसे तिथें लाग. २९
स्वार्थपरायण अल्पच पाषाणापरि करून घट्ट मना,
सर्वापहार करिती, रडवाया लाविती असंख्य जनां. ३०
न्यायाचे क्रयविक्रय बाजारीं धडक चालले उघडे
चोर उदास मिरवतो, निर्दोषी व्यर्थ बंधनांत पडे. ३१
स्वातंत्र्य नामशेष, स्वतंत्र म्हणवून घे स्वतांस बळें
त्यास जड उपाधींचीं जडलीं दृढ बंधनें किती न कळे ! ३२
कोणाच्या देशांवर स्वबलमदें कोण चालवी सत्ता ?
दुबळ्याच्या नम्र शिरीं निर्दय बलवंत हाणिती लत्ता. ३३

नीतीची सत्याची द्रव्याढ्यांनीं करून रांगोळी,
गरिबांकडे सचोटी हांकलिली देउनी करीं झोळी. ३४
असतीं अमरपुरींचीं अनुपम सौख्यें धरातलीं पिकलीं
परि मानवभूतांच्या दुष्कृतिनें भूमिसुरलता सुकली.' ३५
'दुःखाच्या डोहीं जन सांपडले, लागले बुडूं खोल
आतां तूंच तयाला' ऐसे मग धीट उमटले बोल. ३६
'आत्मा दिला, दिलें मन परमेशानें जया कळे भेद,
सुखदुःख जया समजे, संस्कारीं ज्यास हर्ष वा खेद. ३७
दुःख पराला झालें, बंधु व्यसनांत गुंतले हाय !
हें समजून जयानें केलें नाहीं तयां कधीं साह्य. ३८
तो नीच, हीन मानवकोटीस कलंक होय जाण, मनीं
तो भार धरेस, तयें कष्टविली व्यर्थ आपली जननी. ३९
अवघड काय पथ गमे अझून झाली न का निरभ्र मती !
दुःखाच्या भीतीनें आहे त्वां काय रोधिली स्वगती ? ४०
दुःखें बहुत चिरडले त्यांजकडे एकवार दे दृष्टि
घे भार तुझ्या स्वशिरीं, होऊं देऊं नको मना कष्टी. ४१
जो मार्ग तुवां धरिला शेवट त्याचा गड्या मनीं आणीं
प्रेमभरें मजला ती सुचवूं लागे प्रबोधिनी वाणी. ४२
दृष्टि सहज वर मी जों करुनि पुढें वाट पाहिली माझी
नवलप्रकार दिसला—मति पडली थोर विस्मयामाजीं. ४३
अरुणाची कांति दिसे विराजली व्योममंडलीं दिव्य
सिंहासन सत्याचें त्या स्थानीं स्थापिलें असे भव्य. ४४
लाधेल अंत हा तुज, हें सौख्याचें मिळेल भांडार
जा, जा पुढें, करी ती वाणी मज बोध 'घे न माघार. ४५

मृदु बोल मग उमटले 'आली कां दुबळिका तुला बाळ !
आहेत अनंत जगीं होते ज्यांची सदैव आबाळ. २२
अन्नान्न दशा झाली शिर टेंकाया नसे जया स्थान
निर्वाहास्तव फिरती रिक्तोदर सोडिती परी प्राण. २३
कां त्रासलास ? कंठीं बहुतांचे प्राण दाटले असती
कां करिसी शोक खुळ्या ? भग्नहृदय सर्व येथली वसती. २४
आत्मविचारांत वृथा भ्रमसी, दे दुर्बलांवरी लक्ष.
व्यसनांत गुंतलेले दिसतील तुला घरातलीं लक्ष. २५
दुःखार्तांची भरली आहे एकच जगांत किंकाळी
अश्रुजलें व्यथितांच्या येईल दिसून तुज घरा न्हाली ! २६
बाप मुलास तुडवितो; भाऊ भावावरी उठे रुष्ट
कलह ! कलह ! कलह ! जगीं आप्तपणा सर्व जाहला नष्ट. २७
सत्ता चिर नांदाया विस्ताराया अखंड जे खपती
त्यांसच तुडवून करी सत्ता ती निश्य आपुली प्रगती. २८
सुखसदनांच्या द्वारां सोन्याचे घट्ट बसविले डाग
हव्यासासच उघडीं तीं, अन्याचा नसे तिथें लाग. २९
स्वार्थपरायण अल्पच पाषाणापरि करून घट्ट मना,
सर्वापहार करिती, रडवाया लाविती असंख्य जनां. ३०
न्यायाचे क्रयविक्रय बाजारीं धडक चालले उघडे
चोर उदास मिरवतो, निर्दोषी व्यर्थ बंधनांत पडे. ३१
स्वातंत्र्य नामशेष, स्वतंत्र म्हणवून घे स्वतांस बळें
त्यास जड उपाधींचीं जडलीं दृढ बंधनें किती न कळे ! ३२
कोणाच्या देशांवर स्वबलमदें कोण चालवी सत्ता ?
दुबळ्याच्या नम्र शिरीं निर्दय बलवंत हाणिती लत्ता. ३३

नीतीची सत्याची द्रव्याढ्यांनीं करून रांगोळी,
गरिबांकडे सचोटी हांकलिली देउनी करीं झोळी. ३४
असतीं अमरपुरींचीं अनुपम सौख्यें धरातलीं पिकलीं
परि मानवभूतांच्या दुष्कृतिनें भूमिसुरलता सुकली.' ३५
'दुःखाच्या डोहीं जन सांपडले, लागले बुडूं खोल
आतां तूंच तयाला' ऐसे मग धीट उमटले बोल. ३६
'आत्मा दिला, दिलें मन परमेशानें जया कळे भेद,
सुखदुःख जया समजे, संस्कारीं ज्यास हर्ष वा खेद. ३७
दुःख पराला झालें, बंधु व्यसनांत गुंतले हाय !
हें समजून जयानें केलें नाहीं तयां कधीं साह्य. ३८
तो नीच, हीन मानवकोटीस कलंक होय जाण, मनीं
तो भार धरेस, तयें कष्टविली व्यर्थ आपली जननी. ३९
अवघड काय पथ गमे अजून झाली न का निरभ्र मती ?
दुःखाच्या भीतीनें आहे त्वां काय रोधिली स्वगती ? ४०
दुःखें बहुत चिरडले त्यांजकडे एकवार दे दृष्टि
घे भार तुझ्या स्वशिरीं, होऊं देऊं नको मना कष्टी. ४१
जो मार्ग तुवां धरिला शेवट त्याचा गड्या मनीं आणीं
प्रेमभरें मजला ती सुचवूं लागे प्रबोधिनी वाणी. ४२
दृष्टि सहज वर मी जों करुनि पुढें वाट पाहिली माझी
नवलप्रकार दिसला—मति पडली थोरे विस्मयामाजीं. ४३
अरुणाची कांति दिसे विराजली व्योममंडलीं दिव्य
सिंहासन सत्याचें त्या स्थानीं स्थापिलें असे भव्य. ४४
लाधेल अंत हा तुज, हें सौख्याचें मिळेल भांडार
जा, जा पुढें, करी ती वाणी मज बोध 'घे न माघार. ४५

लागो, लागेल तुला दुःखांतच सर्व काल कंठावा
नाहीं होणार न हो सौख्याचा एक शब्दही ठावा. ४६
न मिळो न मिळेल तुला या लोकीं कीर्तिमान आमरण
किंवा न करोत तुझें मरणानंतर जगीं कुणी स्मरण. ४७
कर्तव्यकर्म केलें त्यायोगें होय जें समाधान
तें पारितोषिक तुझें, त्याजपुढें तुच्छ होय धनमान. ४८
जा तर पुढें पुढें मग न श्रम जातील तव कधीं फुकट,
स्वातंत्र्यास्तव केली झाली निष्फल न आजवर लगट. ४९
रात्र सरे दिन उगवे, ऋतुक्रमें वृक्षवल्लि पालवती
सत्कृति यथावकाशें फळास येणार त्यापरी जगतीं. ५०
जे कष्ट वाहिले त्वां जगतास्तव सोशिली स्वयें झीज
धीर न सोड तयांचें वळा होईल शेवटीं चीज. ५१
स्वज्ञाति रक्षिल्याचें, देशा स्वातंत्र्यदान दिधल्याचें,
अंतीं तुझेंचि हें यश; याविण सार्थक न अन्य जन्माचें.' ५२

---

## ३६. नदी आणि कवि.

श्लोक ( वृत्त उपजाति. )

असो कवीचें कुल अप्रसिद्ध ।
होई कवीच्या कवनें प्रसिद्ध.
तसा नदीच्या उगमस्थलाला ।
नदीमुळें गौरवलाभ झाला. १
काव्यें कवीचीं जगतांत गावीं; ।
त्याचें न त्यांच्या परि चोज गांवीं.

नदी सुदूरस्थ जनां पवित्र ।
विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र. २
बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही ।
ठावा नसे आडथळा म्हणोनी;
लागो दरी खोल, उभा पहाड, ।
जातात तीं धावत धाड धाड ! ३
जाई जसें अंतर होत खोल ।
गांभीर्य ये वृत्ति नित्र विलोल.
रेखून मार्ग क्रमितात संथ ।
करीत कल्याण जगीं अनंत. ४
अभंग त्याच्या हृदयीं तरंग ।
निःसंग ते त्यांत सदैव दंग,
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं; ।
ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं. ५
स्वजीवनानें उगवून दाणे, ।
नदी जिवां दे चिर जीवदानें.
तैसें कवीच्या कविताप्रवाहें ।
जीवांत संजीवन दिव्य लाहे. ६
राष्ट्रं बुडालीं नृप थोर गेले; ।
नदी कवी मात्र अनंत ठेले !
भागीरथीला खळ लेश नाहीं ।
अखंड रामायण लोक गाई. ७
महाकवी थोर नदाप्रमाणें; ।
मी बापडा ओघळ अल्प जाणें.

आंत न ओढा झुळझुळ वाहे ।
मांझी तशी ही गुणगूण आहे ! ८

---

## ३७. विरही.

पद ( चाल—कधिं करिती लग्न. )

वदवेना मला लागे हुरहुर जी तुजमुळें ! ध्रु०
चालतों बोलतों घरीं
हांसतो वरी—अंतरीं परी
अश्रु वेल्हाळे ! विरहानें तव गळे. १
तव सहवासीं जे दिन
वाटले क्षण, ते युगाहुन
दीर्घतर झाले. नवल असें वर्तलें. २
नाहींस रूपशालिनी
परी गुणखनी, प्रेमरूपिणी
गुणें प्रिय झालें— रूप तुझें सांवळें. ३
तव अकपट प्रेमळ हंसें
अंतरीं ठसे, बोल गोडसे
श्रुतीचीं पाळें, होउनियां बैसले. ४
तव हालचाल लाडकी
आठवुनी सखी, एकसारखी
जड क्षण झाले, कंठितसे प्रेमळे ! ५

होईल कधीं दर्शन
दृढालिंगन, प्रेमचुंबन
चिंतनीं दोले— मन घेऊं लागलें. ६
अलि असतों तर बैसुनी
वायुवाहनीं, गात येउनी
तुला वनमाळे ! असतें मीं चुंबिलें. ७
परि दुबळी मानवकुडी
व्यर्थ बापडी, तियेची उडी
बेत केलेले, सर्व कुणा साधले ? ८

---

## ३८. स्वप्न.

( आपल्या प्रियेची मूर्ति मनांत आणून स्टेशनवर थंडींत कुडकुडत असलेल्या कवीनें अनुभवलेलें. )

पद ( चाल—नृपममता रामावरती )

कळवितों तुला प्रेमाचे
स्वप्नाचा मम वृत्तांत— मानिनी ! ध्रु०
तव मूर्ति मनीं आणोनी
पडलों मी असतां शयनीं— मानिनी !
तळमळ मम होय जिवाची
येईना निद्रा नयनीं— मानिनी !
क्षणभरी—सहज मज परी—झोंप आदरी
बाहुपाशांत; अनुभविलें स्वप्न तशांत— मानिनी ! १
बसलों मी रंगमहालीं,
सुंदरशा उंच पलंगीं— मानिनी !

पाहिली हात जोडोनी
मजपुढें उभी मृदंगी— मानिनी !
तनुवरी— अनेकापरी—भूषणें धरी—हसे गालांत
प्रेमाचें गाणें गात— मानिनी ! २
घातली उठून जिच्या मी
कंठांत मिठी स्वकरानें— मानिनी !
अनुरंजित केलें गालीं
प्रेमगीत तिज ओष्ठानें— मानिनी !
जागृती—नष्ट दुर्मती—हाय ! शेवटीं करी कीं घात
काळजी दुःखसौख्यांत— मानिनी ! ३
सुंदरी समीप कशाची
स्तंभ उभा जड लोहाचा— मानिनी !
तें प्रेमालिंगन कसलें
जाहला स्पर्श बांकाचा— मानिनी !
ते मुके—वायुचे फिके—एकसारखे डांस कानांत
स्वच्छंद होते गात— मानिनी ! ४
संसार दिसे सुंदरसा
झांकून चालता डोळे— मानिनी !
प्रेमाच्या लीला गमती
जागृतींत चेष्टा चाले— मानिनी !
संसृती—जगाची स्थिती—स्वप्नरूप ती—मानुनी सत्य;
चाललों पहा आहोंत—मानिनी ! ५

## ३९. सृष्टिविवाहमंडप.

( पद चाल–झाली ज्याची )

अस्तंगत दिनकररंजित । मंडप विलसे वर गगनाचा ध्रु०
मंजुळ वाणी मंगलाष्टकें । गण आलापी द्विजराजांचा. १
वृक्षाशिरावर बैसून करी । गंधर्वाद वर्षव फुलांचा. २
लग्नघटी हे अनुरूप स्थल । योग जुळाया युवयुवतींचा. ३

---

## ४०. समरवर्णन.

( पद--चाल--कर नमितसे. )

भयकर असे प्रभावती रण । रोमांचित तनु करी तत् स्मरण ।
ठायिं ठायिं थय थय थय थय नाचतें मरण. ध्रु०
मृत्युरूप असिलता तळपती । चंचलेसमान लोटती शर
तड तड तड तड तड तड तड तड वर्षतात घन. १
गर्जतात, करितात शतघ्नी । तप्त लोहगोलक विक्षेपण
कड कड कड कड कड कड कड कड फाटतें गगन. २
नाग झुंजती रथ आपटती । शस्त्रघाय लागून वीरवर
धड धड धड धड धड धड धड धड पावती पतन. ३

---

## ४१. काय वीर तो !

( पद--चाल--मंडरे यार हां )

काय वीर तो । स्वकुल मळावे, काय वीर तो !
शस्त्र त्यजी जो रणांत. ध्रु०
क्षत्रियबाला जरि अबला मी । त्याजिन कधिं न रण. १

मोक्षा दवडी गणिल मरण जो । पळविल त्या रण. २

## ४२. कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें.

( पद--चाल--यामि हे कमिह शरणं. )

परिभवें स्फूर्ति वीरा । द्विगुणित समर साधितां. ध्रु०
अशुभ चिंती तो । कधिं रणिं भीरु विहरतां.
हत समरिंही न वधवेचि कृष्णवदना. १
वरित यश वीरा । विलसतहि कीर्ति धवला.
परिणायें सुखें युवति घालि कंठीं माला. २

## ४३. रणावेश.

( पद--चाल--सारि पैसेकी बहार. )

सहर्ष रणविहार । करावया तयार.
अरिविंधसैन्यभार मी रणीं करीन ठार.
जिव वरी उदार । प्रसन्न खड्गधार.
विजयहार मग कसा मला न लाधणार.
न हें पडेल पर । तरी जिणें असार.
वाहूं राहूं कशास भूमिभार. १

## ४४. प्रीति.

( पद--चाल--आवो आवो रंगेला. )

प्रीति खोटी म्हणावी आपलपोटी ध्रु०
प्रीतिमिषानें स्वार्थ मिरवितो, जगताच्या पाठीं
अमृत ओठीं तयाच्या विष वसे पोटीं. १
स्त्रिया भावड्या जगतीं कपटी पुरुषांची जाती
वर प्रेमी मिळाला धन्य ती मोठी. २

## ४५. अलंकार.

( पद--चाल--वधुनि उभवना. )

वस्त्राभरणीं देह नटविणें काय त्यांत सार ?
तनूस शोभा देती केवळ सुगुणालंकार. १
शीलाचें परिधान करावें पातळ जरतारी
कुलस्त्रियेला खुले कंचुकी लज्जेची भारी. २
संतसत्कथाश्रवण डुलावीं श्रवणीं कर्णफुलें
पतिवचनाचीं शिरीं करावीं धारण नित्य फुलें. ३
सत्कृत्याच्या दिव्य कंकणीं करशोभा लाहीं
परगृहबंधन ह्याच सांखळ्या विलसाव्या पायीं. ४

---

## ४६. सद्वस्तूची कष्टसाध्यता.

( पद--चाल--मृदु बाल वाक्य. )

कस्तूरिका न साध्य होय मृगवधाविना
मधुलाभ होय हांकलून मक्षिका वना ध्रु०
अहि दुखवावा त्याचा मणि तेधवां मिळे
शतजीवहानि लाधण्यास एक पोंवळें. १

---

## ४७. प्रेमलुब्धता.

( पद--चाल--मजवरीं तरु. )

पद्मरजा त्यजि न भृंग साहि बंधना,
कंटक परि केतकिला । उरग सोडिना. ध्रु०
दीपकास दे पतंग । झणिं आलिंगना
प्राण जाय परि कुरंग ! लुब्ध गायना
त्यंगबलें प्रेम किमपि । न्यून होइना. १

## ४८. आत्म्याचें मंदिर.

( पद—चाल—दिल छीन लियो. )

आहेत दृश्य वस्तु जगीं सर्व नश्वर.
आत्म्याचें केलें त्या म्हणुनि मंदिर.
चिंतोष्णजलें प्रेमें त्या नित्य न्हाणितें.
संतोष उगाळून गंध तिलक लावितें. १
सद्भावरूप सुमनांचा हार अर्पितें.
ओंवळुनियां प्राण तयावरुनि टाकितें. २
नैवेद्यास्तव तयास देह सादर.
आत्म्याचें केलें त्या म्हणुनि मंदिर. ३

---

## ४९. विश्वरंगस्थल.

( पद—चाल—फूले सब ऋतुके. )

रंगस्थल रचिलें जगताचें, नरनारी—
भूमिका सजविल्या खेळाया संसारीं. १
राहून दूर परमेश्वर लीलाधारी
अवलोकी पात्रें कशीं खेळती सारीं. २
नट नटले केवळ धर्माचे अधिकारी.
फलदाता ईश्वर सर्व समर्थ विचारी. ३

---

## ५० दैवदुर्विलास.

( पद—चाल—सार्थकि ते वदती. )

दैवगती फिरली । साची । घडगत मज न दिसे देशाची. ध्रु०
झुंजावे जे देशासाठीं । तेचि परांचे झाले साथी
सांपडलों मी वैऱ्याहातीं । कशी सफलता होय जिण्याची. १

---

## ५१. देशभक्ताचा अपूर्व सोहाळा.

( दिंडी )

देशभक्ता प्रासाद बंदिशाला
शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला.
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत दे अमरता उदंड. १

---

## ५२. कष्टाकुल राजपद.

( पद—चाल—हो जानत. )

तिळभर राजपदीं सुख नाहीं
झुंजावें मृत्युमुखांत शिरावें तेव्हां तें करिं येई. ध्रु०
संरक्षणही असे तयाचें भरलें विघ्नशतांहीं ।
सदा तयाच्या भाविस्थितिची चिंता नृपमन दाही. १

---

## ५३. प्रजाहृदय हेंच राजपद.

( पद—राग-बेहाग-दादरा. )

हृदय खरें स्वप्रजेचें भूपाचें पद असे. ध्रु०
परचक्राच्या वादळें । न तें डळमळे ।
दुणावें बळें । प्रजासंतोषें, अढळपदीं नृप बसे. १
उलटली प्रजा ज्यावरी । स्वपद तो धरी ।
वाळुकेवरी । स्थैर्य त्या कैसें, जलवेगें जें धसे २

---

## ५४. काळाची प्रतिकूलता.

( पद—चाल—झाले बहु दिन. )

मनुजा प्रतिकूल असे काल जोंवरी ।
स्कंधावर मिरवावा तोंवरी अरी । शांत अंतरीं.
रुष्ट दैव सुप्रसन्न जाहल्यावरी ।
तुडवावा चरणानीं तोच भूवरी । मृद्घटापरी

---

## ५५. समाधानमहति

( पद—चाल—लक्ष्मीसम चंचल. )

ज्यास समाधान-कल्पवृक्ष लाधला
भूवरती काय उणें होय त्याजला ध्रु०
संकट त्या उत्सवसे । कोपीं अनुराग दिसे
भरलीं सर्वत्र कुसें । शेज फुलांची विलसे
कारागृह हीन असे । राजमंदिरासरसें
गमती जणुं कुसुमहार । लोहशृंखला.

---

## ५६. विश्वकारागार.

( पद--चाल--बायांनों या. )

प्राणिमात्र कैदी बनले । विश्वरूप कारागारीं
चैान्यांशीं लक्ष कड्यांची । खिळली त्या बेडी भारी
बंधनेंच भरलीं दिसती । मज आहारीं व्यवहारीं
प्रथम बंध गर्भनिवास
आयास पूर्ण नवमास

धन—ललना—संतति पाश,
लागती पुढें संसारीं ।
निधनें न मुक्ति आत्म्याची । बंधाची अन्य तयारी॰ १

## ५७. देशभक्ताचें सामर्थ्य.

( पद—चाल--सुनो प्यारी प्यारी. )

एक देशाभिमानी । महाशत्रु सेनेस भारी
पादचारी असो वा नसो बापुडा शस्त्रधारी ध्रु०
देश गेलाचि जावो परांच्या करीं । नष्ट झाला म्हणावा न तो तोंवरी
एक स्वजनाभिमानी वसे जोंवरी । रविकर सम अंधारीं
तोचि जागी करील प्रजा गाढ निद्रिस्त सारी । पादचारी १

---

## ५८. वैभवाची चंचलता

( पद—चाल—माधवा भगिनी. )

वैभवें नटल्या जयाच्या सौख्यशाला विशाला
काय ही यावी कपाळीं बंदिशाला अशाला ? ध्रु०
सुमन—शयनीं शयन ज्यानें करावें सुखें त्या
भूमिशय्या भुज उशाला वायु शालादुशाला १
दैव हें त्यापुढें न चले पाड मानवाचा
आक्रमी सत्ता तयाची स्वैर दाही दिशांला २

---

## ५९. आयुष्य विषाचा प्याला

( पद--चाल—किती कपटी. )

आयुष्य विषाचा प्याला । आशेनें गोडी त्याला. ध्रु०
सिंह-व्याघ्र-वृकीं वनवासीं । विराट सदनीं खल-सहवासीं

## ५४. काळाची प्रतिकूलता.

( पद—चाल—झाले बहु दिन. )

मनुजा प्रतिकूल असे काल जोंवरी ।
स्कंधावर मिरवावा तोंवरी अरी । शांत अंतरीं.
रुष्ट दैव सुप्रसन्न झाल्यावरी ।
तुडवावा चरणानीं तोच भूवरी । मृद्घटापरी २.

---

२

## ५५. समाधानमहति

( पद—चाल—लक्ष्मीसम चंचल. ) ३

ज्यास समाधान-कल्पवृक्ष लाधला
भूवरती काय उणें होय त्याजला ध्रु०
संकट त्या उत्सवसे । कोपीं अनुराग दिसे
भरलीं सर्वत्र कुसें । शेज फुलांची विलसे
कारागृह हीन असे । राजमंदिरासरसें १
गमती जणुं कुसुमहार । लोहशृंखला. १

---

## ५६. विश्वकारागार.

( पद--चाल--बायांनों या. )

प्राणिमात्र कैदी बनले । विश्वरूप कारागारीं
चौऱ्यांशीं लक्ष कड्यांची । खिळली त्या बेडी भारी
बंधनेंच भरलीं दिसतीं । मज आहारीं व्यवहारीं
प्रथम बंध गर्भनिवास
आयास पूर्ण नवमास

धन—ललना—संतति पाश,
लागती पुढें संसारीं ।
निधनें न मुक्ति आत्म्याची । बंधाची अन्य तयारी• १

## ५७. देशभक्ताचें सामर्थ्य.

( पद—चाल--सुनो प्यारी प्यारी. )

एक देशाभिमानी । महाशत्रु सेनेस भारी
पादचारी असो वा नसो बापुडा शस्त्रधारी ध्रु०
देश गेलाचि जावो परांच्या करीं । नष्ट झाला म्हणावा न तो तोंवरी
एक स्वजनाभिमानी वसे जोंवरी । रविकर सम अंधारीं
तोचि जागी करील प्रजा गाढ निद्रिस्त सारी । पादचारी १

---

## ५८. वैभवाची चंचलता

( पद—चाल—आधवा भगिनी. )

वैभवें नटल्या जयाच्या सौख्यशाला विशाला
काय ही यावी कपाळीं बंदिशाला अशाला ? ध्रु०
सुमन—शयनीं शयन ज्यानें करावें सुखें त्या
भूमिशय्या भुज उशाला वायु शालादुशाला
दैव हें त्यापुढें न चले पाड मानवाचा
आक्रमी सत्ता तयाची स्वैर दाही दिशांला २

---

## ५९. आयुष्य विषाचा प्याला

( पद—चाल—किती कपटी. )

आयुष्य विषाचा प्याला । आशेनें गोडी त्याला. ध्रु०
सिंह-व्याघ्र-वृकीं वनवासीं । विराट सदनीं खल-सहवासीं

पांडवजाया राजविलासीं । आशेवरि कंठीं काला. १
सोडवून असुरांचा विळखा । भेटेल पुन्हां मज रामसखा
या आशेवर जनककन्यका । सहन करी विरहज्वाला. २

---

## ६०. खरें क्षत्रियब्रीद

( पद--चाल--प्रतिकूल होईल. )

धर्मरक्षणाचें आहे व्रत क्षत्रियांना
आजवरी असंख्यांनीं दिल्या त्यास माना. धृ०
स्वर्गप्रियेचि कंठीं पडली मिठी सोडवून
उत्तरिया झोंबे तान्हें दूर तें करून
गृहधनादि ऐश्वर्यातें पार झुगारून
सिद्ध असति समरीं जाया पात्र तेचि माना. १

---

## ६१. भोगमुक्ति.

( पद--चाल--तात तुझा तनया. )

भोग कुणा सुटले जगीं या धृ०
भोग भोगिले वरचे झालें । ऋण त्यांचें फिटलें
श्रीरामानें वनवासाला । काय नको म्हटलें? १
हय खाजवितां कृष्णाचे कर, काय कधीं विटले ?
धैर्यें पांडव दिवस कंठिती । व्यसनीं गुरफटले. २

---

# परिशिष्ट अ.

## हिरकणी.

[ प्रस्तुत पुस्तकाच्या १२ पृष्ठांवर विनायकाची ' हिरकणी ' ही अपूर्ण कविता छापली आहे. ही कविता कवींचे पुतणे रा.रा. ना. वि. करंदीकर यांनीं यथामति पूर्ण केली आहे. रा. नारायणरावजींचा काव्यलेखनाचा हा प्रथमच प्रयत्न असल्याकारणानें ती वठावी तशी वठली नाहीं. असें असतांहि ती परिशिष्टरूपानें प्रस्तुत पुस्तकास जोडिली आहे. हेतु इतकाच कीं, वाचकांना हिरकणीची गोष्ट थोडक्यांत कळावी. ]

### वृत्त—दिंडी.

गोपनारी हिरकणी गडा गेली—
दूध घालाया; परत झाणें निघाली;
पायथ्याशीं तें वसे तिचें गांव,
घरीं जाया मन घेइ फार धांव. ७
घरीं तान्हें तें ठेवियलें होतें,
तया ध्याया उत्कंठ बहुत हो ते;
म्हणुनि उचली ती झपझपां पदातें,
परी दुर्दैवें उशिर होय तीतें ! ८
शिवप्रभुचा निर्बंध एक होता,
तोफ व्हावी अस्तास सूर्य जातां;
सर्व दरवाजे बंद अचुक व्हावे,
कुठें कोणा जाऊं न येउं द्यावें ! ९
येइ काकुळती हिरकणी बिचारी,
अश्रु बालास्तव रडुनि ढाळि भारी;

जरी सैनिकमन विरघळे दयेनें,
कोण राजाज्ञाभंग करूं जाणे ? १०
सर्व दरवाजे फिरुनि परत आली,
तिला भेटेना तेथ कुणी वाली !
" कोण पाजिल तरि तान्हुल्यास आतां "
विचारें या बहु दुःख होय चित्ता. ११
कोण घालिल घुटि भरुनि टाळु चोर्जी ?
कोण अंगाई करिल त्यासि आजी ?
कोण बाई बैसेल पाळण्याशीं,
जरी नाहीं मी तेथ त्याजपाशीं. १२
खिन्न होई या करुनि विचारांना,
मनीं प्रार्थी गोपाळ गोपराणा !
वदे 'जाया सामर्थ्य मला देई,
करीं धरुनी भगिनीस घरीं नेई. ' १३
दयासागर हरि त्यास आठवून,
हृदयवांच्छित पावे न कोण दीन ?
मातृहृदयाला आडवून राही,
असें संकटही कोणतेंच नाहीं ! १४
मार्ग सुचला आनंद फार झाला,
निघे वेगें मग घरीं जावयाला;
नसे रक्षक यद्रक्षणार्थ ऐसा,
एक होता पथ रायगडीं खासा ! १५
भला तुटलेला कडा उंच नीट,
तळीं जाया उतरती फार वाट;

पाय चुकतां निश्चित मृत्यु येई,
परी माता ती तेथुनीच जाई ! १६
उतरूं लागे मन परीं वेधलेलें,
शुद्ध नाहीं जरि तनुस लागलेलें;
अंग खरचटलें वस्त्र फाटलेलें,
अशा वेषीं ती घराप्रती चाले ! १७
घट्ट पोटाशीं धरुनि बालकातें,
चुंबनांनीं संत्रस्त करी त्यातें,
हर्ष झाला; विसरली संकटातें,
करी साहस माता न कोणतें तें ? १८
वृत्त घडलें शिवभूपकार्णी जातां,
वदे आनंदें ‘धन्य धन्य माता !’
कड्यावरती त्या बुरुज बांधियेला,
नांव दिधलें ‘ हिरकणी बुरुज ’ त्याला. १९

REFBK-0019496

# शुद्धिपत्र.

[ अर्थविपर्यास करणाऱ्या अशुद्धांचेंच शुद्धिकरण फक्त खालीं दिलें आहे. ]

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | २० | असें | असे. |
| ५ | १८ | पूर्ववाटें | पूर्ववाटे. |
| ७ | २१ | धांवली | धांवलीं. |
| १२ | १५ | वर | वरी. |
| १३ | १८ | तळीलें | तळीलेनें. |
| १५ | २१ | अबलेनें | अबलेनेंही. |
| १७ | ३ | वाया | वाया. |
| २३ | २१ | कांहदीं | कांहीं. |
| ३७ | १४ | नययीं | नयनीं. |
| ४० | २१ | वुलाचा | कुलाचा. |
| ५२ | २२ | त्याचा | ज्याचा. |
| ५३ | २ | साक्णा | साक्या. |
| ५५ | १ | घतला | घातला. |
| ६१ | १९ | पाडला | घडला. |
| ६२ | ३ | विनें | तिनें. |
| ,, | १७ | भार्तंडा | मार्तंडा. |
| ६४ | १ | धर्म | घर्म. |
| ,, | ५ | ,, | ,, |
| ६५ | १६ | उज्जवल | उज्ज्वल |
| ७३ | ४ | वाहत | वाहाति. |
| ८५ | २ | काळीं | काळी. |
| ,, | ६ | ,, | ,, |
| ११० | १५ | पर | पार. |

# 'अनंततनयां' च्या काव्यकृति.

श्रीशारदादूतिका—( पूर्वार्ध ) किं. १ आणा ट. हं. ०॥'
सदर—[ उत्तरार्ध ] किं. २ आणे ट. हं ०॥' व्ही. पी.
श्रीमन्महाराष्ट्र भगवद्गीता—[ मूळासहित ] किं. दहा आणे व्ही. पी. नें ०१३
झोंपाळ्यावरची गीता—[ मुलींना उत्तम खाऊ ] दुसरी आवृत्ति सचित्र किं. ०४ व्ही. पी. नें ०५
बालगीता—पूर्वार्ध अध्याय १ ते ९ ] ( मुलांना उत्तम खाऊ ) [ सचित्र ] किं. दहा आणे. व्ही. पी. नें ०१३,
*हृदयतरंग—[ पुस्तक १ लें ] किं. दहा आणे. व्ही. पी. नें ०१३
सदर—[ पुस्तक २ रें सचित्र किं. १।' व्ही. पी. नें १०७
अंतर्विद्ध कलिका—[ एक सामाजिक चित्र ] किं. ०२ ट. हं. ०॥'
पुण्याची पर्वती—[ सचित्र पोवाडा ] किं. ०४ ट. हं. ०॥'
सार्थ शृंगारतिलक—[ खंडकाव्य. दुसरी आवृत्ति ] किं. ०२.
या सर्व पुस्तकांवर विद्वानांचे सुंदर अभिप्राय आहेत.

*हें पुस्तक शाळाखात्यानें लायब्ररींकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलें आहे.

विशेष सूचना—सुप्रसिद्ध महाराष्ट्र कवि कै. दत्तात्रेय कोंडो घाटे ऊ. माधवानुज [ काशिनाथ हरि मोडक ] यांच्या कविता संकलित करण्याचे काम हातीं घेतलें असून हीं पुस्तकेंहि लवकरच प्रसिद्ध करण्याचा इरादा आहे. ज्या कोणाचे संग्रहास वरील कवींच्या अप्रसिद्ध कविता, त्यांच्या आख्यायिका, चरित्रविषयक माहिती असेल त्यांनीं ती खालील पत्यावर पाठविण्याची कृपा करावी.

दत्तात्रेय अनंत आपटे.
१२१ बुधवार पेठ, पुणें शहर.



जन्म.
इ. स. १८७२

देहावसान.
इ. स. १९०९